मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

ISSN 0973-8452

मराठी अर्थशास्त्र परिषद
नियतकालिक
(त्रैमासिक)

# अर्थसंवाद

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

भारतीय सौर ज्येष्ठ – भाद्रपद शके १९४३
जुलै – ऑगस्ट – सप्टेंबर २०२१/खंड ४५, अंक २

# ‘अर्थसंवाद’च्या लेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

१. लेखकांनी आपले शोधनिबंध Shree Lipi (२३३५) किंवा Kruti Dev किंवा Unicode यापैकी कोणत्याही Font मध्ये Pagemaker किंवा Ms Word मध्ये टाईप करून पाठवावा. या व्यतिरिक्त कोणताही Font वापरू नये.

२ **संशोधनपर लेखाची प्रत अथवा सीडी पोस्टाद्वारे पाठवू नये.** काही अडचण असल्यास संपादकांशी संपर्क साधावा.

३. **संशोधनपर लेखाची एक सॉफ्ट कॉपी (एक मूळ फाईल व त्याचीच PDF केलेली फाईल अशा दोन फाईल्स्) ई-मेल द्वारे प्रमुख संपादकांकडे rahulmhopare@rediffmail.com या ई-मेल ॲड्रेसवर पाठवावी.** लेखासोबत संपादकांना लेख पाठवल्याची स्वाक्षरी केलेली कव्हर नोट स्कॅन करून पाठवावी. तसेच ई-मेल केल्यानंतर संपादकांशी भ्रमणध्वनीवर (९९२३८७९०२०) संपर्क साधून आपला ई-मेल व्यवस्थित पोचल्याची खात्री करून घ्यावी.

४. संशोधनपर लेख पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सभासद क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल लिहिणे आवश्यक आहे.

५. लेखाच्या शीर्षकाखाली लेखकांनी स्वत:चे संपूर्ण नाव देवनागरीतूनच लिहावे.

६. संशोधनपर लेख खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. लेखात गरजेनुरूप सांख्यिकीय तक्ते व आलेखांचा वापर केल्यास उत्तम. लेखांची गुणवत्ता पाहून तज्ज्ञ परिक्षकांनी केलेल्या सर्व सूचनांची पूर्तता केल्यानंतरच त्याची प्रसिद्धीसाठी निवड केली जाईल.

७. भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा उपयोग करावा. संपादकांना पाठवलेल्या कव्हर नोटसह लेखनाची एक प्रत स्वत जयळ अवश्य ठेवावी.

८. लेखकांनी कृपया संशोधनपर लेख टाईप केल्यानंतर सर्व सांख्यिकी माहिती, शुद्धलेखन आणि व्याकरण अचूक तपासून नंतरच अंतिम प्रत पाठवावी.

९. संदर्भ सूची देताना पूढील पद्धतीने देणे आवश्यक आहे : उदा. पाटील, ज.फा., सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राची बदलती अर्थव्यवस्था, सकाळ पेपर्स लिमिटेड, पुणे, २०१०, (पृष्ठ क्रमांक असेल तर द्यावा.)

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये।
शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तित:।।

# अर्थसंवाद

(तज्ज्ञ परिक्षित नियतकालीक)

मनुष्याणाम् वृत्तिरर्थ:।

www.marthpari.org

(स्थापना वर्ष - १९७७)

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452

जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०२१/ खंड ४५ / अंक २

**प्रमुख संपादक**

राहुल शं. म्होपरे

(देवचंद कॉलेज, अर्जुननगर)

**सहाय्यक संपादक**

चंद्रकांत जाधव

(य.च.वारणा महाविद्यालय, वारणानगर)

**सल्लागार मंडळ**

**(२०१८-२२)**

जनार्दन काकडे

राजू शिंदे

अजय दरेकर

मोहन सदामते

**संपादकीय पत्रव्यवहार**

राहुल शं. म्होपरे

'सर' निवास, रि.स.नं. ३३/क/२,

प्लॉट नं. १८, लेक व्ह्यू कॉलनी,

दीपा गॅस गोडाऊनच्या पाठीमागे,

उजळाईवाडी, ता. करवीर,

जि. कोल्हापूर - ४१६ ००४

भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०

**लेखातील मते लेखकांचीच**

## अनुक्रमणिका

१. **राजाराम पाटील**
भारतातील 'गरिबी हटाव' उद्घोषणेची पन्नाशी : एक अवलोकन ........ ८३

२. **प्रशांत हरमकर**
आर्थिक राष्ट्रवाद ते आत्मनिर्भर भारत ........ ९६

३. **राजकुमार वाईंगडे**
भारताच्या भाववाढ नियंत्रण धोरणातील नवीन बदल ........ १०९

४. **सुरेश श्रावण पाटील, नितीन प्रकाश जैन**
कोविड - १९ चा भारतीय कृषी व्यवस्थेवर होणारा परिणाम आणि कृषी व्यवस्थेला सावरण्यासाठी व्यूहरचनात्मक उपाय योजना ........ ११६

५. **कारभारी भालचंद्र काशिनाथ**
अण्णा भाऊ साठे यांचे आर्थिक कल्याणाचे साहित्यिक विचार ........ १२३

६. **अरुण तवार, बेलुरे विशाल चंद्रशेखर**
समतोल औद्योगिक विकासासंबंधी विदर्भ - मराठवाडा आंतरविभागीय समितीचा अहवाल - एक अभ्यास ........ १२९

७. **जे. एफ. पाटील** : पुस्तक परिचय
भारतावरील आर्थिक संकट ........ १३६

८. **शि. ना. माने** : अर्थ शब्दांची वाट पाहे...
कोरोना लिटरसी ........ १३९

९. **संतोष दास्ताने** : प्रतिक्रिया-प्रतिवाद
महाराष्ट्राच्या कृषी स्मशानाची राजकीय अर्थव्यवस्था... ........ १४०

१०. **भरतकुमार सोलापूरे** : प्रतिक्रिया-प्रतिवाद
सावधान..! माल्थस जागा झालाय ........ १४५

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## कार्यकारी मंडळ २०२१-२२

- **अध्यक्ष**
  **अनिल बा. सूर्यवंशी (सोलापूर)**
- **कार्याध्यक्ष**
  **कैलास के. पाटील (परभणी)**
- **कार्यवाह खजिनदार**
  **मारोती वि. तेगमपुरे (अंबड)**
- **प्रमुख संपादक-अर्थसंवाद**
  **राहुल शं. म्होपरे (कोल्हापूर)**
- **विश्वस्त**
  **आप्पासाहेब पुजारी (मंगळवेढा)**
  **रामकृष्ण टाले (नागपूर)**
  **अजय दरेकर (बारामती)**
- **सदस्य**
  **विजय भोपाळे (नांदेड)**
  **स्नेहा देशपांडे (नागपूर)**
  **बळवंत कोरे (कराड)**
  **गणेश मांगडे (दापोली)**
  **माधव शिंदे (अहमदनगर)**
  **सुरेश ढाके (भुसावळ)**
  **शिवाजी काकडे (बीड)**
  **अरुण पिसे (धुळे)**
  **राजाराम पाटील (सोलापूर)**
  **दयाळू राठोड (अकोला)**
  **मनीषकुमार कायरकर (बल्लारपूर)**
- **स्वीकृत सदस्य**
  **जयवंत इंगळे (विटा)**
  **गोरक्षनाथ सानप (संगमनेर)**
- **स्थानिक कार्यवाह**
  **संजय जगदेव कोठारी (नांदगाव)**



**कार्यालयीन पत्रव्यवहार:**
(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)
मुद्रक-प्रकाशक : **मारोती वि. तेगमपुरे**
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
'संगाई', घर नं. २२, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपामागे, पारनेर रोड, अंबड, जि. जालना.
पिन - ४३१ २०४ भ्रमणध्वनी : ९४२३९९३१३७


**अर्थसंवाद वर्गणी :**

- **परिषदेचे सदस्य :**

| | |
|---|---|
| आजीव सदस्य | : रु.३०००/- (एकरकमी) |
| इमारत निधी | : रु. २०००/- |
| सदस्य सूची | : रु. १००/- |
| एकूण | : रु. ५१००/- |

- **संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:**

  शैक्षणिक संस्था
  व्यावसायिक संस्था
  ग्रंथालये
  } रु.२०००/-(त्रैवार्षिक) रु.३०००/-(पंचवार्षिक)

- **वर्षगणना :** १ एप्रिल ते ३१ मार्च
- संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.
- कृपया आजीव सदस्य वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.
- अर्थसंवादची वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्ट किंवा NEFT (BOI खाते क्र. 094720110000368, IFSC - BKID0000947, राजारामपुरी, कोल्हापूर) द्वारे प्रमुख संपादकाकडे पाठवावी.
- मनीऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.


**'अर्थसंवाद'साठी अनुदानाबद्दल आभार:**
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
टीप : म. रा. सा. सं. मंडळाने अनुदान दिले असले, तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

हे त्रैमासिक, प्रकाशक मारोती वि. तेगमपुरे (प्रमुख संपादक राहुल शं. म्होपरे) यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता भारती मुद्रणालय, शाहुपुरी, कोल्हापूर येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपाच्यामागे, पारनेर रोड, अंबड - ४३१ २०४ येथे प्रसिद्ध केले.

# भारतातील 'गरिबी हटाव' उद्घोषणेची पन्नाशी : एक अवलोकन

**राजाराम पाटील** †

**प्रास्ताविक :**

कोणत्याही देशातील लोकसंख्या ही त्या देशातील साधनसंपत्तीचा हिस्सा असते. देशाचा आर्थिक विकास साधताना इतर संसाधनांबरोबर मानवी संसाधनांचा योग्य वापर करावा लागतो. यासाठी मानवी संसाधनांच्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष द्यावे लागते. आर्थिक कल्याणाच्या दृष्टीनेही मानवी संसाधनांचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. कोणत्याही देशाचा आर्थिक विकास आणि लोकसंख्येचे आकारमान यांच्यात निकटचा संबंध असतो. देशाची लोकसंख्या वाजवी असेल तर उपलब्ध नैसर्गिक साधनांचा पर्याप्त वापर होऊन आर्थिक विकासाला मिळणारी चालना ही मानवी विकासाला पोषक ठरते. याउलट, लोकसंख्या अवाजवी अथवा अतिरिक्त झाल्यास आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत अडथळे निर्माण होऊन त्यातून अनेक समस्यांना जन्म दिला जातो. भारतासारख्या विकसनशील देशात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मानवी संसाधनांत झालेल्या प्रचंड अशा अतिरेकी वाढीमुळे अनेक समस्यांनी उग्र रूप धारण केले आहे. सद्य:स्थितीत देशात वाढत्या बेरोजगारीच्या समस्येने अवलंबित लोकसंख्येच्या प्रमाणात वाढ होत आहे. त्यामुळे लोकसंख्येच्या भरणपोषणावर सरकारच्या होणाऱ्या अवाढव्य खर्चाचा प्रतिकूल परिणाम देशाच्या आर्थिक विकास कार्यावर होत आहे. भारतातील अशा विविध मूलभूत समस्यांच्या मुळाशी असणारा सर्वांत महत्त्वाचा घटक म्हणजे भारतातील गरिबी अथवा दारिद्र्याची स्थिती होय.

अर्थात, 'दारिद्र्य म्हणजे उत्पन्नाचा अभाव', अशी सोप्या शब्दात दारिद्र्याची व्याख्या केली जाते. परंतु देशाचा आर्थिक व सामाजिक विकास विचारात घेताना दारिद्र्य ही संकल्पना फक्त उत्पन्नाशी संबंधित नसून त्यापलीकडे चांगले सामाजिक जीवन, चांगले शिक्षण, आरोग्य, राजकीय स्वातंत्र्य आणि अशा अनेक घटकांशी निगडित असते. भारतामध्ये गरिबी किंवा दारिद्र्य हा शब्द सर्वश्रुत आहे. एखाद्या व्यक्तीला गरीब म्हणून तेव्हाच संबोधले जाते, जेव्हा त्या व्यक्तीचा उपभोग किंवा उत्पन्नाची पातळी घसरते. अलीकडील काळात भारतातील सर्वसाधारण राहणीमान आणि उत्पन्न वाढले असले, तरी जगामधील गरीब देशांच्या क्रमवारीमध्ये भारताचा समावेश होतो, ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. दारिद्र्य हा भारतीय अर्थव्यवस्थेचा दीर्घकाळापासून अस्तित्वात असलेला आणि अनेक उपाय करूनही लवकर बरा न होणारा असा दुर्धर

† सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, वसुंधरा कला महाविद्यालय, सोलापूर
आजीव सभासद क्र. १३४३, भ्रमणध्वनी : ९८५०८३७१३०, ई-मेल : rajaramkpatil@gmail.com

आजारच आहे. हजारो वर्षांपासून ही स्थिती भारतीय समाज अनुभवत आहे. समाजातील एखादा घटक जीवन जगण्यासाठी आवश्यक असणाऱ्या अन्न, वस्त्र आणि निवारा यांसारख्या किमान प्राथमिक गरजाही आपल्या उत्पन्नातून भागवू शकत नाही, तेव्हा तो दारिद्र्यात आहे असे म्हटले जाते. त्यामुळे दारिद्र्याची व्याख्या करताना त्याचा संबंध आवश्यक गरजा भागविण्याच्या जीवनमूल्यांशी जोडला जातो. दारिद्र्य ही अशी अवस्था आहे की ज्या अवस्थेत व्यक्तीला अथवा व्यक्तिसमूहाला जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा बराच काळ नियमितपणे मिळविणे अशक्य असते.

प्रस्तुत लेखन हे भारतातील दारिद्र्याच्या संदर्भात सरकारने सन १९७१ मध्ये 'दारिद्र्य निर्मूलन' अर्थात 'गरिबी हटाव'ची उद्घोषणा केली होती, या वर्षी त्याला पन्नास वर्षे पूर्ण झाली आहेत. त्या पार्श्वभूमीवर दारिद्र्याची संकल्पना, व्याख्या, 'दारिद्र्य निर्मूलन' अर्थात 'गरिबी हटाव' ची घोषणा, दारिद्र्याचे मोजमाप, भारतातील दारिद्र्याची कारणमीमांसा, दारिद्र्य निर्मूलनासाठीच्या योजना आणि कार्यक्रम तसेच या कार्यक्रमाचे मूल्यमापन अशा पद्धतीने लेखाची मांडणी दुय्यम तथ्य संकलनावर आधारित केली आहे. तसेच आकडेवारीच्या विशेष खोलात न जाता आवश्यक त्या ठिकाणी विविध अभ्यास गटांच्या अहवालाद्वारे उपलब्ध असलेली आकडेवारी दिली असून तक्त्याद्वारे माहिती दिली आहे.

**दारिद्र्याची संकल्पना :**

दारिद्र्य ही एक आर्थिक व सामाजिक संकल्पना आहे. समाजातील ज्या व्यक्तीला किमान उपभोगाचा दर्जा गाठता येत नाही त्या व्यक्तीस दरिद्री असे म्हटले जाते. भारतात दारिद्र्याच्या संकल्पनेत व्यक्तीच्या राहणीमानाच्या किमान पातळीवर भर दिला आहे. यावरून दारिद्र्य म्हणजे अशी स्थिती होय की, या स्थितीत समाजाचा एक मोठा गट विशिष्ट उपभोग पातळीपर्यंत पोहचत नाही. दारिद्र्याच्या संकल्पनेचा अभ्यास करताना निरपेक्ष दारिद्र्य आणि सापेक्ष दारिद्र्य या दोन संकल्पना अधिक महत्त्वपूर्ण आहेत.

**अ) निरपेक्ष दारिद्र्य :**

दारिद्र्याच्या प्रमाणाचे निरपेक्ष मोजमाप करण्यासाठी देशातील राहणीमान खर्चाचा विचार करून त्या आधारावर किमान उपभोग खर्च निर्धारित केला जातो. म्हणून दारिद्र्याच्या निरपेक्ष संकल्पनेनुसार निर्वाहासाठी अत्यावश्यक असे एक निरपेक्ष मानक किंवा प्रमाण असते. जसे की, जीवन जगण्यासाठी अन्नधान्य, कपडालत्ता, निवारा यांची काही किमान वास्तव परिमाणे असतात. या परिमाणांचे चालू किंमतीनुसार पैशात रूपांतर केले जाते आणि दरडोई किमान उपभोगाचा पैशातील आकडा ठरविला जातो. या विश्लेषणाच्या आधारे ज्या लोकांची उत्पन्नाची पातळी किंवा खर्चाची पातळी पैशात व्यक्त केलेल्या किमान आवश्यक उपभोग पातळीपेक्षा कमी असते असे लोक दारिद्र्यरेषेखालील आहेत, असे मानले जाते. म्हणजेच किमान आवश्यक गरजा भागविण्याची क्षमता नसणे म्हणजे निरपेक्ष दारिद्र्य होय. निरपेक्ष या शब्दाचा अर्थ कोणाशीही तुलना न करणे असा होतो. म्हणजे निरपेक्ष दारिद्र्य म्हणजे गरीब व श्रीमंत अशी तुलना न करता किमान आवश्यक गरजा पूर्ण करण्यासाठी आजच्या किंमतीनुसार किती खर्च येईल हे होय. एकंदरीत, व्यक्तीच्या आर्थिक स्थितीची विशिष्ट पातळी निश्चित करून त्याद्वारे 'निरपेक्ष दारिद्र्य' काढले जाते.

**ब) सापेक्ष दारिद्र्य :**

सापेक्ष दारिद्र्याची संकल्पना आर्थिक विषमतेवर आधारित आहे. उत्पन्न पातळीनुसार गट पाडल्यास त्यातील शेवटच्या गटातील आर्थिक स्थिती म्हणजे सापेक्ष दारिद्र्य होय. या पद्धतीनुसार एखाद्या व्यक्तीचे किंवा कुटुंबाचे दारिद्र्य लक्षात घेताना त्याच्या आर्थिक स्थितीची इतर लोकांशी तुलना केली जाते. जसे उच्च

उत्पन्न गटातील ५ ते १० टक्के लोकसंख्येच्या राहणीमानाची तुलना तळातील उत्पन्न गटातील ५ ते १० टक्के लोकसंख्येच्या राहणीमानाशी केली जाते. वरच्या उत्पन्न गटातील लोकसंख्येपेक्षा तळाच्या उत्पन्न गटातील लोकसंख्या सापेक्षपणे दारिद्र्यात आहे असे मानले जाते. म्हणजेच समाजाच्या उपभोगातील किंवा उत्पन्नातील अंतर म्हणजे सापेक्ष दारिद्र्य होय.

**दारिद्र्याची व्याख्या :**

दारिद्र्य ही सापेक्ष स्वरूपाची संकल्पना असल्याने दारिद्र्याची सर्वसमावेशक अशी काटेकोर व्याख्या करणे कठीण आहे. ढोबळमानाने आर्थिक गरिबीची स्थिती म्हणजे दारिद्र्य असे म्हणता येईल. पुढील काही व्याख्यांवरून दारिद्र्याचा अर्थ स्पष्ट होतो.

१. **मानव अधिकार आयोगाच्या अहवालानुसार,** 'किमान पायाभूत सुविधा मिळविण्यातील अपयश किंवा बराच काळ अशा पायाभूत सुविधांपासून वंचित राहणे म्हणजे दारिद्र्य होय.'

२. **सी. टी. कुरियन यांच्या मते,** 'दारिद्र्य म्हणजे अशी अवस्था की, ज्यामध्ये देशात उपलब्ध असलेली साधनसामग्री आवश्यक पूर्ततेसाठी वापरण्याऐवजी अमर्याद गरजांचा पाठलाग करण्यासाठी वापरली जाते.'

३. **सन २०००-०१ च्या जागतिक विकास अहवालानुसार,** 'दारिद्र्य म्हणजे योग्य पद्धतीने अन्न व निवारा यांचा अभाव, ही अशी स्थिती आहे की, त्या व्यक्तीस सुयोग्य पद्धतीचे राहणीमान, सुव्यवस्थित राहण्याची घरे, आरोग्य सुविधा, पिण्याच्या पाण्याची सुविधा मिळत नाही.'

४. **डॉ. अमर्त्य सेन यांच्या मते,** 'एखाद्या व्यक्तीला त्याने जोपासलेल्या मूल्यांप्रमाणे जगता न येणे म्हणजे दारिद्र्य होय.'

५. **६१ व्या राष्ट्रीय नमुना पाहणी सर्वेक्षणानुसार,** 'ज्या व्यक्तींना दरमहा ग्रामीण भागात रुपये ३६५.३५ आणि शहरी भागात रुपये ५३८.६० इतके उत्पन्नसुद्धा मिळत नाही, ती व्यक्ती दारिद्र्यामध्ये जीवन जगते असे समजावे.'

**'दारिद्र्य निर्मूलन' अर्थात 'गरिबी हटाव'ची उद्घोषणा :**

सन २०२१ च्या सुरुवातीला साधारणपणे भारतामध्ये ८ कोटी ६८ लाख लोक दारिद्र्यरेषेखाली होते. गरिबी अथवा दारिद्र्य हा नेहमीचाच काळजीचा विषय असला, तरी त्याच्या शास्त्रशुद्ध अभ्यासाची सुरुवात आधुनिक भारतामध्ये दादाभाई नौरोजी (सन १८७६) यांच्यामुळे झाली. त्यांनी त्यांच्या 'Poverty and Unbritish Rule in India' या ग्रंथात भारतातील दारिद्र्याचे भयावह चित्र मांडून त्याची कारणे व परिणाम लोकांसमोर स्पष्ट केले. स्वातंत्र्यानंतर विशेषतः सन १९५० पासून देशात सरकारने दारिद्र्य निर्मूलनासाठी अन्नधान्यावर सूट, कर्ज पुरवठ्याची सुविधा, शिक्षणाचा प्रसार, कुटुंब नियोजन, दुष्काळावर उपाययोजना इत्यादी कार्यक्रम हाती घेतले होते. वास्तविक पाहता, स्वातंत्र्यानंतर भारतीय नियोजन मंडळासमोरील अनेक आव्हानांपैकी एक दारिद्र्य निर्मूलन हे होते. दारिद्र्याच्या वर नमूद केलेल्या व्याख्यांचा विचार करता, एखादी व्यक्ती आपल्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी सक्षम नसणे, अशी करता येईल. या गरजा म्हणजेच अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य होय. भारताच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी मार्च, १९७१ मध्ये सर्वप्रथम या समस्येचे गंभीर स्वरूप मान्य करत, 'दारिद्र्य निर्मूलन' अर्थात 'गरिबी हटाव'ची उद्घोषणा केली. हा कार्यक्रम पाचव्या पंचवार्षिक योजनेचा एक अविभाज्य भाग बनला होता. सध्या मार्च, २०२१ मध्ये या कार्यक्रमाला पन्नास वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यामुळे या कार्यक्रमाची व्याप्ती सर्वव्यापी असल्याने त्याचे थोडक्यात अवलोकन केले आहे.

नियोजन आयोगाच्या स्थापनेनंतर सन १९५१ पासून सर्वांगीण आर्थिक विकासासाठी पंचवार्षिक योजनांना सुरुवात केली. कृषी आणि औद्योगिकदृष्ट्या राष्ट्राला सक्षम करण्याच्या दृष्टीने योजनांवर भर देण्यात आला. पण सन १९६० च्या दशकाच्या अखेर, सरकारने आखलेली आणि कार्यवाहीत आणलेली आर्थिक धोरणे व योजना यांचे आर्थिक विकासातील योगदान फारसे परिणामकारक दिसून आले नाही. माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या दृष्टीने झिरपत्या सिद्धांतातून आर्थिक विकासाची फळे समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहचणे अपेक्षित होते. त्याचा लाभ मात्र मोजक्या वर्गालाच मिळाला असून समाजातील एक मोठा वर्ग त्यापासून वंचित राहिला होता. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांना याची जाणीव होती. देशातील सातत्याने वाढणाऱ्या किंमती, बेरोजगारी, अल्प उत्पन्न, अशिक्षितपणा, परंपरावाद इत्यादींमुळे देशातील गरिबांसमोर चरितार्थाची मोठी समस्या असून तिचे निराकरण करणे अत्यंत आवश्यक होते.

सन १९६९ मध्ये काँग्रेस पक्षात फूट पडल्यानंतर त्यांनी आपल्या राजकीय धोरणांची पुनर्रचना केली. चौथी पंचवार्षिक योजना तयार करताना, त्यांनी मागास आणि कमकुवत घटकांवर अधिक लक्ष केंद्रित करतानाच 'दारिद्र्य निर्मूलनाचा निर्धार' हाच आपला मुख्य उद्देश असल्याचे स्पष्ट केले. विकास धोरणे अधिक कटाक्षाने, गंभीरपणे आणि परिणामकारकरित्या राबविण्याचा निर्धार केला. त्यामुळे 'गरिबी हटाव' उद्घोषणेचे पुढे जाऊन 'गरिबी हटाव देश बचाव' अशा प्रेरक घोषणेत रूपांतर झाल्याचे दिसून येते. या कार्यक्रमामुळे देशात सर्वदूर विखुरलेला ग्रामीण भारत प्रथमच प्रकर्षाने पुढे आला. त्यामुळे इंदिरा गांधींच्या त्या काळातील विशिष्ट अशा धोरणामुळे त्यांच्याबद्दल आस्था असलेला एक समाजगट असून मुख्यत्वे तो आर्थिकदृष्ट्या मागासलेला आहे.

**भारतातील दारिद्र्याचे मोजमाप :**

सद्य:स्थितीत भारतात नीती आयोगाद्वारे दारिद्र्याचे मोजमाप केले जाते, ते राष्ट्रीय नमुना पाहणी (National Sample Survey) कार्यालयाकडून उपलब्ध झालेल्या सांख्यिकी आकडेवारीवर आधारित असते. भारतात दारिद्र्याचे मोजमाप उत्पन्नाच्या पातळीवर आधारित नसून ते उपभोगावरील खर्चावर आधारित आहे. दारिद्र्याचे प्रमाण मोजण्यासाठी, एकूण लोकसंख्येच्या किती प्रमाणात गरीब लोक राहतात याची आकडेवारी पाहिली जाते. भारतातील दारिद्र्यासंदर्भात काही तज्ज्ञांनी आणि अभ्यास गटांनी केलेले अंदाज अथवा दारिद्र्याचे मोजमाप पुढीलप्रमाणे विचारात घेता येते.

१. पी. डी. ओझा यांच्या मते, दररोज सरासरी २२५० उष्मांक मिळवून देण्यासाठी सन १६६०-६१ च्या किंमतीनुसार ग्रामीण भागात दरडोई ८ ते ११ रुपये आणि शहरी भागात १५ ते १८ रुपये इतका आवश्यक उपभोग खर्च विचारात घेता, भारतात एकूण १९ कोटी लोक दारिद्र्यरेषेखाली राहात होते. त्यापैकी १८.४ कोटी लोक ग्रामीण भागात आणि ०.६ कोटी लोक शहरात जीवन जगत होते.

२. पी. के. बर्धन यांच्या मते, सन १९६०-६१ च्या किंमतीनुसार ग्रामीण भागातील जनतेसाठी दरडोई खर्च दरमहा १५ रुपये व शहरी जनतेसाठी १८ रुपये इतका व्यक्त केला. त्यांच्या अभ्यासानुसार, सन १९६८-६९ मध्ये भारतातील ग्रामीण आणि शहरी जनतेपैकी अनुक्रमे ५५ टक्के आणि ४१ टक्के जनता दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत होती.

३. डॉ. मिन्हास यांच्या अभ्यासगटानुसार, सन १९६०-६१ च्या किंमती गृहीत धरून भारतातील दारिद्र्याचा अंदाज व्यक्त केला. त्यांच्या मते, सन १९६३-६४ साली ५७.८ टक्के ग्रामीण जनता दारिद्र्यरेषेखाली होती. सन १९६९-७० मध्ये हे

प्रमाण ५०.६ टक्क्यांपर्यंत कमी झाले.

४. एम. अहलुवालिया (सन १९७७) यांनी सन १९६०-६१ च्या किंमतींच्या आधारे ग्रामीण व शहरी भागातील प्रत्येक व्यक्तीसाठी प्रत्येक वर्षी अनुक्रमे १८० रुपये आणि २४० रुपये किमान उपभोग खर्च आवश्यक मानून त्या आधारे १९७३-७४ मध्ये ग्रामीण भागातील ४६.१ टक्के जनता दारिद्र्यरेषेखालील जीवन जगत होती.

५. दांडेकर आणि निळकंठ रथ यांनी भारतीयांसाठी दररोज २२५० उष्मांकाचा निकष विचारात घेऊन सन १९६०-६१ च्या किंमतीनुसार दरडोई दरमहा खर्च ग्रामीण व शहरी भागासाठी अनुक्रमे १५ रुपये आणि २२.५० रुपये गृहीत धरला. त्यानुसार सन १९६०-६१ ते १९६९-७० या कालावधीत ग्रामीण भागात ४० टक्के आणि शहरी भागात ५० टक्के लोकसंख्या दारिद्र्यात जीवन जगत होती.

६. डॉ. लकडावाला समितीने दारिद्र्यात अन्न या घटकाला महत्त्व दिल्याने उष्मांक हा निकष जसाच्या तसा राहिला. त्यांच्या मते, सन १९७३-७४ मध्ये भारतातील ३२ कोटी लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली होती.

७. मिन्हास-जैन-तेंडुलकर यांच्या पाहणीनुसार सन १९८७-८८ मध्ये भारतातील एकूण गरिबीचे प्रमाण ४२.७ टक्के होते. तर ग्रामीण व शहरी भागात दारिद्र्याचे प्रमाण अनुक्रमे ४४.८ व ३६.५ टक्के होते.

८. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संस्थेच्या ६१ व्या फेरीनुसार सन २००४-०५ मध्ये भारतात २७.५ टक्के लोक दारिद्र्यात होते. यापैकी ग्रामीण भागात २८.३ टक्के तर शहरी भागात २५.७ टक्के लोक गरीब होते.

९. सुरेश तेंडुलकर समितीने (सन २००९) सन २००४-०५ साठी नवीन दारिद्र्यरेषा निश्चित करताना त्यात शिक्षण आणि आरोग्यासाठी लागणारा खर्च मिळवून खर्चाची पातळी ग्रामीण आणि शहरी भागासाठी अनुक्रमे ४४६.६८ रुपये आणि ५७८.८० रुपये अशी केली. यांच्या अंदाजानुसार सन २००४-०५ मध्ये देशातील दारिद्र्याचे प्रमाण ३७.२ टक्के होते, तर ग्रामीण भागात ते ४१.८ टक्के आणि शहरी भागात २५.५ टक्के होते.

१०. नियोजन आयोगाने (मार्च,२०१२) सन २००९-१० मधील राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संस्थेच्या ६६ व्या पाहणीवरून तेंडुलकर समितीने शासनाला सादर केलेल्या आकडेवारीनुसार नियोजन आयोगाने मार्च, २०१२ मध्ये प्रेसनोटद्वारे प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार ग्रामीण आणि शहरी भागासाठी अनुक्रमे खर्चाची पातळी ६७२.८ रुपये व ८५९.६ रुपये ठरविण्यात आली. त्यानुसार सन २००९-१० मध्ये भारतात एकूण २९.८२ टक्के लोक दारिद्र्यात होते. ग्रामीण भागात ३३.८ टक्के आणि शहरी भागात २०.९ टक्के होते.

११. नियोजन आयोगाने (जुलै,२०१३) सन २०११-१२ मधील तेंडुलकर समितीच्या निकषावर आधारित नियोजन आयोगाने जुलै, २०१३ मध्ये प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार ग्रामीण आणि शहरी भागासाठी अनुक्रमे खर्चाची पातळी ८१६ रुपये व १००० रुपये ठरविण्यात आली. त्यानुसार सन २०११-१२ मध्ये भारतात एकूण २१.९ टक्के लोक दारिद्र्यात होते. ग्रामीण भागात २५.७ टक्के आणि शहरी भागात १३.७ टक्के होते.

१२. रंगराजन समितीने (सन २०१२) आपला अहवाल ३० जून, २०१४ रोजी शासनाकडे सादर केला. या अहवालानुसार दारिद्र्याचे मोजमाप हे मासिक दरडोई खर्चावरून केले गेले. शहरी भागात १४०७ रुपये आणि ग्रामीण भागात ९७२ रुपये उत्पन्न

असल्यास त्या व्यक्तीला गरीब समजण्यात येईल. त्यानुसार भारतात सन २०११-१२ मध्ये एकूण २९.५ टक्के लोक दारिद्र्यात जीवन जगत होते. ग्रामीण भागात ३०.९ टक्के तर शहरी भागात हे प्रमाण २६.४ टक्के होते. रंगराजन समितीने 'दारिद्र्याच्या टोपलीत' (Poverty Line Basket) जीवनावश्यक घटकांबरोबर इतर घटकांचाही समावेश केला आहे.

१३. जागतिक बँकेने सन २०११ मध्ये प्रतिदिनी १.९ डॉलर खरेदीशक्ती दारिद्र्यरेषा निश्चित करण्यासाठी प्रमाण म्हणून ठरवली. या निकषानुसार, जगातील दारिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण १२.७ टक्के होते. भारतात हे प्रमाण २१.७ टक्के होते.

१४. नीती आयोग - भारतात दारिद्र्याची समग्र व्याख्या तयार करून दारिद्र्य निर्मूलन करण्यासाठी नीती आयोगाअंतर्गत 'भारतीय दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम कार्यदल' (Task Force Elimination of Poverty in India) १६ मार्च, २०१५ रोजी स्थापन केले असून नीती आयोगाचे तत्कालीन उपाध्यक्ष राजीव कुमार या कार्यदलाचे अध्यक्ष होते.

वरीलप्रमाणे विविध समित्या व तज्ज्ञांनी भारतातील दारिद्र्याचे मोजमाप अथवा अंदाज व्यक्त केले आहेत. अर्थात, सरकारने सन १९७१ मध्ये 'गरिबी हटाव'ची घोषणा केल्यानंतर दारिद्र्य निर्मूलनासाठी कृती कार्यक्रमांची आखणी व अंमलबजावणी परिणामकारकपणे करण्यास सुरुवात झाली. तत्पूर्वी, पी. के. बर्धन यांच्या अभ्यासानुसार, सन १९६८-६९ मध्ये भारतातील ग्रामीण आणि शहरी जनतेपैकी अनुक्रमे ५५ टक्के आणि ४१ टक्के जनता दारिद्र्यरेषेखाली होती. त्यानंतर डॉ. लकडावाला समितीने सन १९७३-७४ मध्ये भारतातील ३२ कोटी लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली होती असे स्पष्ट केले. मिन्हास-जैन-तेंडुलकर यांच्या पाहणीनुसार, सन १९८७-८८ मध्ये भारतातील एकूण गरिबीचे प्रमाण ४२.७ टक्के होते. म्हणजेच सन १९७३-७४ च्या तुलनेत या वर्षात वाढ झाल्याचे दिसून येते. तेंडुलकर समितीच्या आकडेवारीनुसार, सन २००४-०५ मध्ये देशातील दारिद्र्याचे प्रमाण ३७.२ टक्के होते. नियोजन आयोगाने सन २०११-१२ मध्ये प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार, एकूण २१.९ टक्के लोक दारिद्र्यात होते असे नमूद केले आहे. त्यामुळे वरवर पाहता दारिद्र्याचा आलेख घटतो आहे असे दिसते, मात्र वाढत्या लोकसंख्येतील एकूण गरीब लोकांची संख्या विचारात घेता हा निव्वळ आभास असल्याचे जाणवते. कारण सन २०१९ आणि २०२० च्या जागतिक बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक (Global Multidimensional Poverty Index - MPI) अहवालानुसार, भारतात २१.९ टक्के लोक दारिद्र्यरेषेखाली असून त्यांची एकूण संख्या २६९.८ दशलक्ष इतकी होती. थोडक्यात, दारिद्र्याच्या एकूण टक्केवारीत घट दिसत असली, तरी स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सन १९५१ ते सन २०२१ या कालावधीतील लोकसंख्या वाढ विचारत घेता दारिद्र्याची तीव्रता आपल्या लक्षात येईल.

भारतातील दारिद्र्याचा अभ्यास करताना वरीलप्रमाणे दारिद्र्याच्याबाबतीत अहवालाद्वारे उपलब्ध आकडेवारीची मीमांसा केली असून तिचा सखोल अभ्यास केला नसला, तरीही विषयाच्या गरजेनुसार पुढील तक्त्यात भारतातील राज्यनिहाय दारिद्र्याची स्थिती दर्शवली आहे.

**भारतातील दारिद्र्याची कारणमीमांसा :**

एकूणच दारिद्र्याच्या स्थितीची कारणमीमांसा करताना कोणताही एक घटक त्यास जबाबदार असत नाही. कारण, मूलतः ही संकल्पनाच बहुआयामी व सर्वव्यापी अशा स्वरूपाची आहे. ती व्यक्तिगत, सामाजिक आणि राष्ट्रीय पातळीवर अनुभवास येऊ शकते. भारतातील वाढत्या दारिद्र्याला ब्रिटीश राजवट

**तक्ता क्र. १ : भारतातील दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येची संख्या आणि टक्केवारी - २०११-१२**

(Based on MRP Consumption)

| राज्य / केंद्रशासित प्रदेश | ग्रामीण | | | शहरी | | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | व्यक्ती संख्या (हजारात) | प्रमाण (%) | दारिद्र्यरेषा (रुपये) | व्यक्ती संख्या (हजारात) | प्रमाण (%) | दारिद्र्यरेषा (रुपये) | व्यक्ती संख्या (हजारात) | प्रमाण (%) |
| आंध्रप्रदेश | ६,१८० | १०.९६ | ८६०.०० | १,६९८ | ५.१८ | १००९.०० | ७,८७७ | ९.२० |
| अरुणाचल प्रदेश | ४२५ | ३८.९३ | ९३०.०० | ६६ | २०.३३ | १०६०.०० | ४९१ | ३४.६७ |
| आसाम | ९,२०६ | ३३.८९ | ८२८.०० | ९२१ | २०.४९ | १००८.०० | १०,१२७ | ३१.९८ |
| बिहार | ३२,०४० | ३४.०६ | ७७८.०० | ३,७७५ | ३१.२३ | ९२३.०० | ३५,८१५ | ३३.७४ |
| छत्तीसगढ | ८,८९० | ४४.६१ | ७३८.०० | १,५२२ | २४.७५ | ८४९.०० | १०,४११ | ३९.९३ |
| गोवा | ३७ | ६.८१ | १०९०.०० | ३८ | ४.०९ | ११३४.०० | ७५ | ५.०९ |
| गुजरात | ७,५३५ | २१.५४ | ९३२.०० | २,६८८ | १०.१४ | ११५२.०० | १०,२२३ | १६.६३ |
| हरियाणा | १,९४२ | ११.६४ | १०१५.०० | ९४१ | १०.२८ | ११६९.०० | २,८८३ | ११.१६ |
| हिमाचल प्रदेश | ५२९ | ८.४८ | ९१३.०० | ३० | ४.३३ | १०६४.०० | ५५९ | ८.०६ |
| जम्मू आणि काश्मीर | १०७३ | ११.५४ | ८९.०० | २५३ | ७.२० | ९८८.०० | १,३२७ | १०.३५ |
| झारखंड | १०,४०९ | ४०.८४ | ७४८.०० | २,०२४ | २४.८३ | ९७४.०० | १२,४३३ | ३६.९६ |
| कर्नाटक | ९,२८० | २४.५३ | ९०२.०० | ३,६९६ | १५.२५ | १०८९.०० | १२,९७६ | २०.९१ |
| केरळ | १,५४८ | ९.१४ | १०१८.०० | ८४६ | ४.९७ | ९८७.०० | २,३९५ | ७.०५ |
| मध्यप्रदेश | १९,०९५ | ३५.७४ | ७७१.०० | ४,३१० | २१.०० | ८९७.०० | २३,४०६ | ३१.६५ |
| महाराष्ट्र | १५,०५६ | २४.२२ | ९६७.०० | ४,७३६ | ९.१२ | ११२६.०० | १९,७९२ | १७.३५ |
| मणिपूर | ७४५ | ३८.८० | १११८.०० | २७८ | ३२.५९ | ११७०.०० | १,०२२ | ३६.८९ |
| मेघालय | ३०४ | १२.५३ | ८८८.०० | ५७ | ९.२६ | ११५४.०० | ३६१ | ११.८७ |
| मिझोराम | १९१ | ३५.४३ | १०६६.०० | ३७ | ६.३६ | ११५५.०० | २२७ | २०.४० |
| नागालँड | २७६ | १९.९३ | १२७०.०० | १०० | १६.४८ | १३०२.०० | ३७६ | १८.८८ |
| ओडिशा | १२,६१४ | ३५.६९ | ६९५.०० | १,२३९ | १७.२९ | ८६१.०० | १३,८५३ | ३२.५९ |
| पंजाब | १,३३५ | ७.६६ | १०५४.०० | ९८२ | ९.२४ | ११५५.०० | २,३१८ | ८.२६ |
| राजस्थान | ८,४१९ | १६.०५ | ९०५.०० | १,८७३ | १०.६९ | १००२.०० | १०,२९२ | १४.७१ |
| सिक्कीम | ४५ | ९.८५ | ९३०.०० | ६ | ३.६६ | १२२६.०० | ५१ | ८.१९ |
| तमिळनाडू | ५,९२३ | १५.८३ | ८८०.०० | २,३४० | ६.५४ | ९३७.०० | ८,२६३ | ११.२८ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| त्रिपुरा | ४४९ | १६.५३ | ७९८.०० | ७५ | ७.२४ | ९२०.०० | ५२४ | १४.०५ |
| उत्तर प्रदेश | ४७,९३५ | ३०.४० | ७६८.०० | ११,८८४ | २६.०६ | ९४१.०० | ५९,८१९ | २९.४३ |
| उत्तराखंड | ८२५ | ११.६२ | ८८०.०० | ३३५ | १०.४८ | १०८२.०० | १,१६० | ११.२६ |
| पश्चिम बंगाल | १४,११४ | २२.५२ | ७८३.०० | ४,३८३ | १४.६६ | ९८१.०० | १८,४९८ | १९.९८ |
| अंदमान आणि निकोबार | ४ | १.५७ | - | - | - | - | ४ | १.०० |
| चंदीगड | - | १.६४ | - | २३४ | २२.३१ | - | २३५ | २१.८१ |
| दादर आणि नगर हवेली | ११५ | ६२.५९ | - | २८ | १५.३८ | - | १४३ | ३९.३१ |
| दमण आणि दीव | ० | ०.०० | - | २६ | १२.६२ | - | २६ | ९.८९ |
| दिल्ली | ५० | १२.९२ | ११४५.०० | १,६४६ | ९.८४ | ११३४.०० | १,६९६ | ९.९१ |
| लक्षद्वीप | ० | ०.०० | - | २ | ३.४४ | - | २ | २.७७ |
| पुडुच्चेरी | ६९ | १७.०६ | १३०१.०० | ५५ | ६.३० | १३०९.०० | १२४ | ९.६९ |
| भारत | २,१६,६५८ | २५.७० | ८१६.०० | ५३,१२५ | १३.७० | १०००.०० | २,६९,७८३ | २१.९२ |

संदर्भ - Reserve Bank of India - Handbook of Statistics on Indian Economy, 18th September, 2020.

टीप - - माहिती उपलब्ध नाही. १. तेंडुलकर यांच्या संमिश्र संदर्भ कालावधीच्या (Mixed Reference Period -MRP) आधारे गणना करण्यात आली आहे. २. सन २०११ च्या जनगणना अहवालानुसार, १ मार्च, २०१२ ची लोकसंख्या विचारात घेऊन दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण काढले आहे. ३. अंदमान आणि निकोबार मधील दारिद्र्य मोजमापासाठी तमिळनाडूतील दारिद्र्यरेषेचा वापर केला आहे. ४. दादर आणि नगर हवेली मधील दारिद्र्य मोजमापासाठी महाराष्ट्रातील दारिद्र्यरेषेचा वापर केला आहे. ५. दमन आणि दीव मधील दारिद्र्य मोजमापासाठी गोव्यातील दारिद्र्यरेषेचा वापर केला आहे. ६. लक्षद्वीप मधील दारिद्र्य मोजमापासाठी केरळमधील दारिद्र्यरेषेचा वापर केला आहे. ७. चंदीगड मधील ग्रामीण आणि शहरी दारिद्र्य मोजमापासाठी पंजाब मधील शहरी दारिद्र्यरेषेचा वापर केला आहे.

कारणीभूत असली तरी, इ. स. १०२५ मधील महंमद गझनीच्या सोमनाथवरील आक्रमणापासून दारिद्र्य हे भारताच्या आर्थिक इतिहासाची ओळख बनले आहे. परकीय आक्रमण, राज्याराज्यांतील युद्ध, डोंगराळ व आदिवासी जनतेची दुरवस्था, जातीसंस्था, शेतसारा वसुलीतील दोष, निसर्गावरील अवलंबित्व, अज्ञान इत्यादी कारणांनी ब्रिटिशपूर्व भारतात दारिद्र्याचे अस्तित्व होतेच. अर्थात, भारतातील दारिद्र्यास विविध घटक कारणीभूत आहेत. जसे, लोकसंख्येचा विस्फोट, कुटुंबाचा आकार, अवलंबित लोकसंख्येचे वाढते प्रमाण, बेरोजगारी, जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमती, भूमिहीनता, रूढीपरंपरा, जमीनमालकीतील विषमता,

नैसर्गिक साधनसामग्रीचा अपुरा वापर, दरडोई उत्पन्नातील वाढीचा अल्प दर, अल्प उत्पन्न, संपत्तीचे असमान वाटप, सामाजिक विषमता, शेतीची अल्प उत्पादकता, भांडवल निर्मितीचा अल्प दर, शिक्षणाचा अभाव, झिरपत्या सिद्धांताचे अपयश, वाढते शहरीकरण, जागतिकीकरण आणि उदारीकरण इत्यादी घटक महत्त्वपूर्ण ठरतात.

भारतातील दारिद्र्य निर्मूलनाच्या संदर्भात भारतीय नियोजनाने समाजवादी समाजरचनेचे उद्दिष्ट मान्य करून त्या दृष्टीने कार्यनियोजन केल्याचे दिसते. परंतु, प्रत्यक्षात मात्र साधनसंपत्तीच्या वितरणातील असमानताच अधोरेखित होते. सद्य:स्थितीत काही मूठभर श्रीमंतांच्या हातात अधिक संपत्ती असून समाजातील एक मोठा समाजगट संपत्तीपासून वंचित असल्याचे दिसून येते. लोकांचे उत्पन्न कमी असल्याने त्यांचा अधिकचा खर्च उपभोगावर होतो. त्यामुळे मूलभूत घटकांपैकी आरोग्य आणि शिक्षण या घटकांपासून हा समाज स्वातंत्र्याची सत्तरी पार केली तरी अद्यापही दूरच असल्याने दारिद्र्य निर्मूलनाबाबतीत फारशी प्रगती झाल्याचे दिसून येत नाही. शेती क्षेत्रातील जमिनीच्या असमान वितरणाने अल्प भूधारक व भूमिहीन शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती बिकट आहे. एकूणच, उत्पादित शेतमालाला योग्य बाजारपेठ आणि हमीभाव न मिळाल्याने शेतकऱ्यांत कर्जबाजारीपणा वाढला आहे. त्याचबरोबर शेतीचे आधुनिकीकरण आणि व्यापारीकरण होत असल्याने शेतीत मोठ्या प्रमाणावर यंत्रसामग्री, औषधे, खते व रसायनांचा वाढता वापर आणि त्यांच्या किंमतीत प्रचंड वाढ झाल्याचे दिसते. त्या तुलनेत शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ न होता खर्चाचे प्रमाण मात्र वाढत असल्यामुळे कृषी क्षेत्रात दारिद्र्य पूर्वापार राहिल्याचे दिसते. विकास प्रक्रियेत विशेषतः सन १९९१ च्या नव्या आर्थिक धोरणाने भारतातील औद्योगिक क्षेत्राची रचनाच बदलल्याचे दिसून येते. जागतिकीकरण आणि उदारीकरणाने मोठ्या औद्योगिक ग्रहांचे प्राबल्य वाढल्याने देशातील बहुसंख्य लघू व मध्यम उद्योगधंदे बंद पडले. त्यामुळे स्वयंरोजगार आणि एकूणच बेकारीच्या प्रश्नाने गंभीर रूप धारण केल्याने भारतातील ग्रामीण भागाबरोबरच शहरी दारिद्र्याच्या स्थितीत फारसा बदल झाल्याचे दिसून येत नाही.

दारिद्र्याच्या कारणमीमांसेत आणखी एक संदर्भ नमूद करणे महत्त्वाचे आहे. प्रसिद्ध फ्रेंच अर्थतज्ज्ञ थॉमस पिकेटी यांनी आपल्या 'कॅपिटल' या ग्रंथात उत्पन्नातील विषमता वाढण्याचे महत्त्वाचे कारण मांडले आहे. त्यांनी १८ व्या शतकापासून युरोप आणि अमेरिकेतील संपत्ती आणि उत्पन्नातील विषमतेचा अभ्यास केला आहे. त्यांच्या मते, 'भांडवल गुंतवणुकीवरील नफ्याचा दर दीर्घकाळपर्यंत आर्थिक वाढीच्या दरापेक्षा जास्त असल्यास त्याचा परिणाम म्हणजे संपत्तीचे केंद्रीकरण होणे होय. संपत्तीचे हे असमान वितरण सामाजिक आणि आर्थिक अस्थिरतेस कारणीभूत ठरते.' म्हणजेच याचा सरळ अर्थ असा की, भांडवलदारांच्या अथवा संख्येने कमी असलेल्या श्रीमंताच्या वाट्याला नफ्याच्या रूपाने अधिक उत्पन्न गेल्याने ते अधिकच श्रीमंत बनले. परिणामी, गरीब आणि श्रीमंतांतील दरी वाढून दारिद्र्यात घट होण्यापेक्षा वाढच झाली. यावर उपाय म्हणून ते पुढे म्हणतात, संपत्तीच्या वितरणातील ही असमानता कमी करण्यासाठी आणि त्याचा लाभ समाजातील शेवटच्या घटकांना मिळण्यासाठी श्रीमंतांवर संपत्तीकराची पुरोगामी पद्धतीने म्हणजेच अधिक दराने आकारणी करण्याची त्यांनी शिफारस केली आहे. भारतात मात्र अधिक दराने संपत्ती कराची आकारणी न करता, उलट निगम करात सवलत देण्यात आली. अर्थात, सन २०१७ मधील क्रेडिट स्विसनं प्रकाशित केलेली आकडेवारी थॉमस पिकेटी यांच्या विधानाला पुष्टीच देते. भारतात फक्त ९ जणांकडे भारतातल्या तळातल्या ५० टक्के लोकांपेक्षा जास्त संपत्ती होती. भारतातल्या १ टक्के

लोकांकडे भारतातील ५८.४ टक्के संपत्ती होती, तर भारतातल्या तळातल्या ३० टक्के लोकांकडे खूपच कमी संपत्ती होती आणि भारतातल्या ९२ टक्के लोकांकडे तर सरासरी दरडोई फक्त ७.३ लाख रुपयांपेक्षा कमी संपत्ती म्हणजे त्यांच्या आयुष्यभराची बचत होती. याचा अर्थ, या कमालीच्या आर्थिक विषमतेतून भारतासारख्या विकसनशील देशात दारिद्र्याचे अविभेद असे दुष्टचक्र निर्माण झाल्याचे दिसते.

**दारिद्र्य निर्मूलनासाठी योजना व कार्यक्रम :**

स्वातंत्र्यानंतर सन १९५० ला नियोजन मंडळाची स्थापना करून एप्रिल, १९५१ पासून पंचवार्षिक योजनांद्वारे नियोजित आर्थिक विकास प्रक्रियेस सुरुवात झाली. भारत सरकारने देशातील दारिद्र्य निर्मूलनासाठी विविध योजना व कार्यक्रम अंमलात आणले. आपल्या घटनेत आणि राबविण्यात येणाऱ्या पंचवार्षिक योजनांमध्ये सामाजिक न्याय हे सरकारच्या विकास धोरणाचे प्राथमिक उद्दिष्ट असल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे बहुतेक सर्व धोरणांमध्ये दारिद्र्य निर्मूलनावर भर देण्यात आलेला आहे. दारिद्र्य निर्मूलनासाठी सरकारने त्रि-आयामी दृष्टिकोन स्वीकारला असून त्यात (अ) वृद्धिधारित दृष्टिकोनानुसार आर्थिक वृद्धीचे परिणाम समाजाच्या सर्व गटापर्यंत पसरतील की, जे गरीब जनतेपर्यंत झिरपत जातील. (ब) दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम, वृद्धिधारित दृष्टिकोनाला पर्याय म्हणून धोरणकर्त्यांनी दारिद्र्यावर प्रत्यक्ष हल्ला करण्यासाठी दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमांच्या राबवणुकीवर भर देण्यास सुरुवात केली. सामाजिक मालमत्ता निर्माण करण्याच्या प्रक्रियेदरम्यान कामांची निर्मिती करून गरीब जनतेसाठी उत्पन्न आधारित रोजगार निर्माण करता येईल. या दृष्टीने, दारिद्र्य निर्मूलनासाठी स्वयंरोजगाराचे कार्यक्रम, मजुरी रोजगार कार्यक्रम आणि स्वयंरोजगार व मजुरी रोजगारांचे एकत्रीकरण असलेल्या योजनांचा समावेश होतो. (क) किमान मूलभूत सुविधांची तरतूद, या कार्यक्रमानुसार जनतेला किमान मूलभूत सुविधा उपलब्ध करून देऊन दारिद्र्याचा प्रश्न हाताळण्यावर भर देण्यात आला. विशेषतः सामाजिक उपभोगाच्या गरजांवर जसे, अनुदानित दराने अन्नधान्य पुरवठा, शिक्षण व आरोग्य सोयी, पाणीपुरवठा व स्वच्छता, गरिबांच्या अन्न व पोषणाचा दर्जा सुधारणे इत्यादी सार्वजनिक खर्चाच्या माध्यमातून जनतेचे राहणीमान उंचावण्यावर भर देण्यात आला.

सरकारने दारिद्र्य निर्मूलनासाठी स्वीकारलेल्या दृष्टिकोनानुसार विविध योजना व कार्यक्रम राबविले आहेत. जसे, स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना, वीस कलमी कार्यक्रम, स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना, गरिबी हटाव कार्यक्रम, ग्रामीण रोजगारासाठी धडक कार्यक्रम, किमान गरजा कार्यक्रम, स्वयंरोजगारासाठी ग्रामीण युवकांना प्रशिक्षण, सीमान्त शेतकरी आणि शेतमजूर विकास कार्यक्रम, एकात्मिक ग्रामीण विकास योजना, जवाहर रोजगार योजना, इंदिरा आवास योजना, कामासाठी अन्न योजना, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, प्रधानमंत्री ग्रामोद्योग योजना, सार्वजनिक वितरण व्यवस्था, एकात्मिक बाल विकास योजना, राष्ट्रीय मध्यान्ह आहार योजना, प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना, प्रधानमंत्री जनधन योजना, भारत निर्माण योजना इत्यादी. थोडक्यात, भारतातील दारिद्र्याचा विचार करता, दारिद्र्य निर्मूलनासाठी सरकारने राबविलेल्या या सर्व योजना किती परिणामकारक ठरल्या अथवा राबविण्यात आल्या आणि त्यांनी काय साध्य केले हा एक वेगळाच अभ्यासाचा विषय होऊ शकतो.

**दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमांचे मूल्यमापन :**

सार्वत्रिक दारिद्र्य हा स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळचा भारतापुढील महत्त्वाचा आर्थिक व सामाजिक प्रश्न होता. सन १९५१ नंतर नियोजनकारांनी आर्थिक नियोजनाचा कार्यक्रम आखताना प्रत्येक पंचवार्षिक योजनेत दारिद्र्य

निर्मूलनाच्या उद्दिष्टाला अग्रक्रम दिल्याचे दिसते. दारिद्र्य रेषेखालील लोकांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणण्यासाठी विविध योजना आखून त्या कार्यान्वित केल्या, तरीही आवश्यक तेवढे यश मिळू शकले नाही ही बाब गंभीर आहे. सत्तेत येणारे सरकार कोणत्याही पक्षाचे असो, त्यांची प्राथमिकता सामाजिक कल्याण आणि सर्वांगीण आर्थिक विकास हीच असणे आवश्यक आहे. सरकारने आपल्या सोयीनुसार दारिद्र्य निर्मूलनाचे कार्यक्रम राबविल्यास त्यांच्या यशस्वितेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होते. दारिद्र्याच्या वृद्धीदर दृष्टिकोनानुसार निवडक प्रदेशांमध्ये वेगवान औद्योगिक विकास आणि हरित क्रांतीच्या माध्यमातून कृषी विकास घडवून आणल्यास न्यून-विकसित प्रदेशांना तसेच समाजातील मागास गटांना त्याचा फायदा होऊन दारिद्र्यात घट होईल असा उद्देश होता. मात्र एकंदरीत वृद्धी आणि कृषी व औद्योगिक क्षेत्रातील वृद्धी अपेक्षित वेगाने होऊ शकली नाही. तर दुसऱ्या बाजूला, लोकसंख्येच्या विस्फोटामुळे दरडोई उत्पन्नातील वाढ अत्यल्प ठरली. हरितक्रांतीमुळे प्रादेशिक तसेच वैयक्तिक विषमतेत भरच पडली. त्यामुळे आर्थिक वृद्धीचे फायदे गरीब जनतेपर्यंत झिरपून न पोहचल्याने दारिद्र्यात फारशी घट झाली नाही.

भारतातील दारिद्र्य निर्मूलनाच्या विविध योजना आणि कार्यक्रमांचे मूल्यमापन केल्यास असे आढळून येते की, भारतात सापेक्ष व निरपेक्ष अशा दोन्ही प्रकारचे दारिद्र्य आढळून येते. विशेषतः देशाच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकांच्या उत्पन्नातील विषमतेत घट घडवून आणण्यासाठी रोजगार वाढीवर भर देण्यात आला होता. मात्र डॉ. अमर्त्य सेन यांच्या दारिद्र्याच्या निकषांनुसार पुरेसा आहार, आरोग्य, शिक्षण इत्यादी बाबींकडे लक्ष पुरविल्याचे दिसून येत नाही. देशाच्या वाढत्या लोकसंख्येबरोबर सार्वत्रिक दारिद्र्याची व्याप्ती वाढत आहे. ग्रामीण दारिद्र्य कमी करण्यासाठी भूमिहीन शेतमजुरांना रोजगार संधी किंवा शेती कसण्याची संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. देशाच्या ग्रामीण व शहरी भागातील कमी उत्पन्न गटातील लोकसंख्येला स्वयंरोजगाराकडे वळविण्यासाठी मार्गदर्शनाची नितांत गरज असल्याचे दिसते. आजच्या आधुनिक काळात उत्पन्नाची नवनवीन साधने उपलब्ध झाली असूनही रोजगारात सातत्याने होत असणारी घट, मागणीमध्ये होणारी वाढ, राजकोषीय तूट, भाववाढ, औद्योगिक मागासलेपणा, निर्यातीचा अभाव, वाढती आयात, सेवाक्षेत्राचा वाढता प्रभाव इत्यादीमुळे भारतातील गरिबीची समस्या अधिकच जटिल आणि गुंतागुंतीची होत चालली आहे. यावरून असे म्हणता येईल की, देशात दारिद्र्य निर्मूलनासाठी राबविण्यात येत असलेल्या योजना आणि कार्यक्रमांचे अपयश अधोरेखित होते. याचे प्रतिबिंब, 'जागतिक बँके'च्या सन २०२१ च्या आकडेवारीत दिसते. बँकेच्या अहवालानुसार, जगातील ७१ ते ८६ कोटी, तर भारतातील ८ कोटी ६७ लाख ९९ हजार ४९८ इतकी लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली असल्याचे स्पष्ट होते.

भारतातील दारिद्र्याचे अवलोकन करताना आणखी एक मुद्दा नमूद करणे महत्त्वाचे ठरते. कोविड-१९ महामारीच्या पार्श्वभूमीवर भारतातील आर्थिक विषमतेविषयी 'ऑक्सफॅम' या आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्थेच्या अहवालातील आकडेवारी खूपच बोलकी आहे. कोरोना विषाणूचा फैलाव रोखण्यासाठी मार्च, २०२० मध्ये जगभरासह भारतातही टाळेबंदी लागू करण्यात आली होती. त्यामुळे लाखोंनी रोजगार गेले आणि हजारोंच्या नोकऱ्या गेल्या, तर काहींचे उत्पन्नाचे स्रोत कायमचे बंद झाले. परिणामी, भारतातील ८४ टक्के कुटुंबांच्या उत्पन्नात कोणत्या ना कोणत्या स्वरूपात घट झाली. मात्र दुसऱ्या बाजूला याची झळ देशातील १०० अब्जाधीशांना बसली नाही, उलट त्यांच्या उत्पन्नात ४ लाख ८९ हजार कोटी रुपयांची भर पडली. ही भर पडलेली रक्कम देशातील सर्व राज्यांच्या आरोग्य व

शिक्षण तरतुदींवर खर्च झाल्यास, ८५ टक्के उद्दिष्टपूर्ती होऊ शकते किंवा हीच रक्कम १३ कोटी ८० लाख अतिगरिबांना वाटायची असती तर, प्रत्येकाच्या वाट्याला ९४,०४५ रुपये आले असते. याचा अर्थ, या पराकोटीच्या आर्थिक विषमतेचे वैषम्य कोणालाच वाटेनासे होणे हे ती वाढण्यामागील सर्वांत मोठे कारण आहे. हा दोष जसा प्रवृत्तीतला, तसाच तो काहीअंशी भारतात राबविण्यात आलेल्या विविध धोरणांच्या अपयशाचाही आहे.

खरेतर दारिद्र्याची सर्वव्यापकता रोखण्यासाठी सरकारने वाढत्या लोकसंख्येवर नियंत्रण, उत्पन्नाच्या पर्याप्त साधनांचा शोध, आरोग्याच्या सोयीसुविधांत सुधारणा, बचत-गुंतवणुकीत वाढ, किंमत वाढीवर नियंत्रण, वाढत्या भ्रष्टाचारावर नियंत्रण, वाढत्या तेलाच्या किंमतीवर नियंत्रण तसेच नवनवीन, पर्याप्त आणि सर्वसमावेशक योजनांची आखणी, कार्यान्वित योजना व कार्यक्रमांची सर्वसमावेशक गुणवत्ता आणि परिणामकारकता इत्यादी उपाययोजना उपयुक्त ठरू शकतात. सी. टी. कुरियन यांच्या मते, दारिद्र्य निर्मूलनाच्या कार्यक्रमाची यशस्विता ही प्रामुख्याने राजकीय इच्छाशक्ती व प्रशासन यंत्रणेवर अवलंबून आहे. त्याचबरोबर दारिद्र्याच्याबाबतीत जागतिक बहुआयामी दारिद्र्य निर्देशांकातील घटकांचाही विचार होणे आवश्यक आहे. तसेच दारिद्र्य निर्मूलनासाठी 'युनिव्हर्सल बेसिक इन्कम' या योजनेनुसार देशाचा अधिकृत नागरिक असलेल्या प्रत्येक व्यक्तीस प्रति महिना काही विशिष्ट रक्कम सरकारकडून देण्यात येईल. त्याचा परिणाम म्हणजे, ज्या लोकांचे उत्पन्न विशिष्ट पातळीपेक्षा कमी आहे, त्यांना आपले उत्पन्न संतुलित करण्यासाठी मदत होईल. आजच्या स्पर्धेच्या युगात आणि आर्थिक कार्यक्रम सुधारणेच्या काळात भारतातील सामाजिक व आर्थिक संरचनेत व्यापक स्वरूपात बदल केल्याशिवाय दारिद्र्याचे उच्चाटन होणे अशक्य आहे. दारिद्र्य निर्मूलनासाठी राबविलेल्या योजना सर्वसमावेशक असतात, परंतु त्या किती प्रामाणिकपणे आणि परिणामकारक राबविल्या जातात यावरच त्यांचे यश अवलंबून असते. भारतात 'गरिबी हटाव'ची घोषणा देऊन पन्नास वर्षे पूर्ण झाली, तर नियोजनाच्या बारा पंचवार्षिक योजना पूर्ण झाल्या तरीही आपल्या देशातील दारिद्र्याचे प्रमाण आपणास कमी करता आले नाही. उलट, नवनवीन योजनांची चर्चा करावी लागते, हे गरिबीचेच दुर्दैव म्हणावे लागेल. वास्तविक पाहता, गरिबी हा केवळ भावनिक विषय नसून, त्याची व्यापकता प्रचंड मोठी असून दारिद्र्याचा आलेख मात्र उंचावत चालला आहे. तिच्यावर प्रभावी लस म्हणून तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी मार्च, १९७१ मध्ये 'गरिबी हटाव'चा नारा दिला खरा, मात्र वास्तवात 'गरिबी हटाव' हे स्वप्न स्वप्नवतच राहिले असून अद्यापही त्याच्यावर प्रभावी अशी लस कोणत्याही सरकारला सापडली नाही हेच वास्तव.

**संदर्भ सूची :**


१. Datt Gaurav and Mahajan Ashwani, 'Datt & Sundharm's Indian Economy,' S. Chand Publication- New Delhi.

२. Economic Survey of India - 2019-20 and 2020-21.

३. Gaur Seema & Rao Srinivas N. , 'Poverty Measurement in India : A Status Update, Working Paper No. 1/2020, Ministry of Rural Development.

४. Global MPI Report, 2019 and 2020.

५. OXFAM India- The Inequality Virus-Global Report - 2021.

६. Reserve Bank of India - Handbook

on Statistics on Indian economy, 18th September, 2020.

७. Thomas Piketty, ‘Capital’ - in the Twenty-first Century, Editions duseuil - Harvard University Press, 2013.

८. करंडे संदीप भगवान, ‘भारतातील दारिद्र्याचा एक अभ्यास,’ अर्थसंवाद, ऑक्टोबर- डिसेंबर २०१२/ खंड ३६, अंक ३.

९. कुरुलकर, ‘भारतीय अर्थव्यवस्था,’ विद्या प्रकाशन, नागपूर.

१०. गिरगांवकर, ‘भारतातील दारिद्र्याची समस्या : एक अवलोकन,’ इंडियन जरनल ऑफ मॅनेजमेंट रिव्ह्यूव, २०१३.

११. गोखले रामचंद्र, ‘भारतीय अर्थव्यवस्था रचना आणि समस्या,’ भाग १, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे.

१२. गोडबोले अच्युत, ‘अनर्थ विकासनीती : सर्वनाशाच्या उंबरठ्यावर’, मनोविकास प्रकाशन.

१३. घाटगे आणि वावरे, ‘भारतीय अर्थव्यवस्था,’ निराली प्रकाशन, पुणे.

१४. जगताप आणि वाणी, ‘भारतीय अर्थव्यवस्था,’ एस. चाँद पब्लिकेशन्स, नवी दिल्ली.

१५. दामजी-कदम-पाटील, ‘भारतीय अर्थव्यवस्था,’ फडके प्रकाशन, कोल्हापूर.

१६. निमकर आशिष सुधाकर, ‘पश्चिम विदर्भाच्या दारिद्र्यव्यवस्थेचे चिकित्सक अध्ययन,’ अर्थसंवाद, ऑक्टोबर- डिसेंबर २०१७ / खंड ४१, अंक ३.

१७. मुंडेकर तेजस्विनी बी., ‘दारिद्र्याचे प्रतिबिंब,’ अर्थसंवाद, जानेवारी-मार्च २०१२ / खंड ३५, अंक ४.

१८. दै. लोकसत्ता, २८ जानेवारी, २०२१.

१९. महाराष्ट्र टाइम्स, मुंबई, रविवार, ४ एप्रिल,२०२१.

२०. https://www.mpscacademy.com/2017/05/poverty.html - दि. १५ /०८/२०२१

२१. https://ww.theglobalstatistics.com/poverty-in-india-statistics-2021 - दि. १५ /०८/२०२१

◆

---

‘‘नियोजन करा नाहीतर नष्ट व्हा.’’

***- सर एम. विश्वेश्वरअय्या***

---

**निवेदन : अर्थसंवाद**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ज्या आजीव सदस्यांना अंक मिळत नसेल किंवा पत्त्यात बदल झाला असेल तर त्यांनी प्रमुख संपादक, अर्थसंवाद यांच्याकडे तशा आशयाचे पत्र पाठवून त्या पत्रात आपला नवीन पत्ता लिहून पाठवावा; मात्र या पत्रात आजीव सदस्य क्रमांकाचा उल्लेख असणे अत्यंत गरजेचे आहे.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# आर्थिक राष्ट्रवाद ते आत्मनिर्भर भारत

**प्रशांत हरमकर** †

**प्रस्तावना :**

राष्ट्रवाद ही भावना आहे. ती विचारधारा आहे. राष्ट्रवाद ही राष्ट्राच्या प्रति असणारी आत्मीयता आहे. यामधून प्रेरणा घेऊन इतर हितापेक्षा राष्ट्रहिताला महत्त्व दिले जाते. राष्ट्रवाद म्हणजे राष्ट्राप्रति अगाध निष्ठा देखील आहे. राष्ट्रवादाचा उदय अठराव्या शतकाच्या शेवटी झाला. मध्ययुगीन युरोपमध्ये भाषा व संस्कृतीच्या आधारावर राष्ट्रवादाची भावना वाढीस लागली. यामधून फ्रान्स आणि इंग्लंड यांच्यामध्ये दीर्घकाळ संघर्ष चालला होता. फ्रेंच राज्यक्रांती (१७८९) मध्ये राष्ट्रवादाची अभिव्यक्ती समोर आली. राष्ट्रवादाचे सर्वोत्तम निरूपण जर्मन तत्त्वज्ञ जी. एफ. डब्ल्यू. हेगेल आणि इटलीचे विचारवंत ज्योसिपी मॅझिनी यांनी केले आहे. हेगेलने राष्ट्रवादाला विश्व चेतनेच्या विकास यात्रेचे वाहक म्हटले आहे तर मॅझिनी यांनी राष्ट्रवादाला नवीन विश्व व्यवस्था असे म्हटले आहे.

## विभाग 'अ'

**आर्थिक राष्ट्रवाद :**

आर्थिक धोरणे देशांतर्गत राबविताना जेव्हा राष्ट्रहिताला सर्वोच्च स्थान दिले जाते तेव्हा आर्थिक राष्ट्रवाद उदयास येतो. पारंपरिक आर्थिक राष्ट्रवाद फ्रेडरिक लिस्ट व अलेक्झांडर हॅमिल्टन यांनी मांडला. त्यांचा संरक्षणवादी मापकाद्वारे व्यापारवादी लक्ष प्राप्ती करण्यावर भर होता. दुसऱ्या बाजूला आर्थिक उदारीकरण आहे. याचे मूळ ॲडम स्मिथच्या विचारांमध्ये आहे. ॲडम स्मिथ यांनी मुक्त व्यापाराचा पुरस्कार राष्ट्राची संपत्ती वाढविण्याकरिता केला होता. नवउदार राज्य किमानवादी (Mininalist) राज्य नाही. मात्र, कृतिशील हस्तक्षेप करणारे राज्य आहे. राज्यहस्तक्षेप हा आर्थिक लक्ष प्राप्ती ते आर्थिक व्यवस्थेचा प्रकार लक्षात घेऊन केला जातो.

आर्थिक राष्ट्रवाद हा दृष्टिकोन आहे. आर्थिक राष्ट्रवाद आर्थिक उदारीकरणाच्या परंपरेमधला भाग आहे. आर्थिक उदारीकरणामध्ये समस्या निर्माण झाल्या, तर आर्थिक राष्ट्रवाद नेतृत्व करीत असतो. त्यामुळे आर्थिक राष्ट्रवाद हा आर्थिक उदारीकरणाला पूरक आहे. त्यानुसार, आर्थिक धोरणामध्ये बदल केले जातात. प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीचा ऱ्हास होऊ लागतो तेव्हा राष्ट्रीयता जोर पकडू लागते. आर्थिक राष्ट्रवाद मार्फत राज्य अटीच्या विशिष्ट संचातंर्गत आर्थिक लक्ष्याचा पाठलाग करीत असतो व त्याची निष्पत्ती दिसून येते.

† विभाग प्रमुख, पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग, या.द.व. देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तिवसा, जि.अमरावती.
आजीव सभासद क्र.: १३७९, भ्रमणध्वनी : ९४२०६३३१२८, ई-मेल : haramkarprashant380@gmail.com

आर्थिक राष्ट्रवाद दोन मोठ्या निर्णयांनी ठरत असतो. एक, राष्ट्र आणि राज्य भिन्न असतात. आर्थिक धोरणे राज्याद्वारे सुरू ठेवलेली असतात. त्याचा परिणाम म्हणजे आवश्यकतेनुसार राष्ट्रवाद वैशिष्ट्याची गरज असते. याउलट नेहमीच राष्ट्रवाद वैशिष्ट्याची गरज नसते. राष्ट्र लोकांना एकत्रित करते. भाषा, समाज, परंपरा, प्रदेश इत्यादी सामान्य घटकांमुळे लोक एकत्रित येतात. याकडून राष्ट्रवाद राज्याला आकार देत असतो. राज्य म्हणजे राजकीय व्यवस्था आहे. राज्य केवळ राष्ट्र नसते, तर यामध्ये राज्य स्वत:चा शोध घेत असते. राष्ट्रहित लक्षात घेऊन आर्थिक धोरणे स्वीकारली जातात. विशिष्ट वर्ग व उद्योगाचा विकास केला जातो. दुसरा, आर्थिक उदारीकरणाला प्रत्युत्तर म्हणून आर्थिक राष्ट्रवाद ठरविला जातो.

जागतिकीकरण विशद करताना आंतरराष्ट्रीय पातळीवर एकीकरणाची प्रक्रिया स्पर्धात्मक आहे. याकडून व्यापार, गुंतवणूक आणि तंत्रज्ञानाचा प्रवाह अर्थव्यवस्थेमध्ये येतो. यामुळे परस्पर अर्थव्यवस्थांमध्ये विस्तृत आणि तीव्रतेने आंतरजोडणी होते. जागतिकीकरण म्हणजे राष्ट्रीय भांडवलशाही विस्तारीकरणाची प्रक्रिया आहे. समांतर वेळी आर्थिक राष्ट्रवाद उदयाला आला आहे.

आर्थिक राष्ट्रवादामध्ये जागतिकीकरण माघार घेत आहे. याचा संबंध राज्याची कृती, धोरण, व्यूहरचना, खाजगी भांडवल आणि राजकीय सहकार्याशी आहे. सामान्यपणे संघटित श्रमिकांना संरक्षण व प्रोत्साहन देऊन राष्ट्रीय आर्थिक हित जपले जात आहे. श्रमिकाच्या वेतन आणि उत्पन्न प्राप्तीमुळे सुधारणा घडून येत आहे. राष्ट्रीय स्पर्धात्मकतेचे पोषण होत आहे. राष्ट्रीय विजेते होण्याकरिता प्रोत्साहन दिले जात आहे. विकसित देशांमधील उद्योग प्रौढावस्थेत आहेत. विविध प्रकारची संरक्षण मापके लावून भूतकाळात उद्योग उभारले गेले आहेत. याच उद्योगांना विकसित देशांमधील शासन संरक्षित बाजार प्रवेश देत आहे. सोबतच पारंपरिक विदेशी स्पर्धकासोबत स्पर्धा केली जात आहे. विशेषत: ही स्पर्धा विकसनशील देशांसोबत आहे.

**आर्थिक राष्ट्रवाद : भारत व अमेरिका**

अमेरिकेतील आणि भारतातील शासन आर्थिक राष्ट्रवादाला सबळ प्रोत्साहन देत आहे. याबाबत दोन्ही देशांमध्ये दीर्घकालीन मानववंशशास्त्रीय संशोधन झाले आहे. यामुळे दोन्ही देशांतील आर्थिक राष्ट्रवादाच्या धोरणाची तुलना करता येते. दोन्ही देशांमधील नेत्यांनी आव्हान करून संघटनात्मक पातळीवर ब्रिटिश वसाहतीकडून स्वातंत्र्य मिळविण्याकरिता आर्थिक राष्ट्रवादाचा उपयोग त्याच्या राजकीय भाषणामध्ये केला. बहुतांश गेली दोन शतके हा त्याचाच भाग होता. भारत व अमेरिकेमध्ये सीमान्त श्रमिकांनी उत्पादित केलेल्या, भारतीय निर्मित किंवा अमेरिका निर्मित वस्तूलाच महत्त्व व खरेदीला प्रोत्साहन देण्यात आले. आर्थिक राष्ट्रवादाचा दोन्ही देशांच्या व्यूहरचनेमध्ये फरक आहे. अमेरिकेचा भर हा देशीय उपभोग आणि व्यावसायिक न्यूनतम कर प्रोत्साहनावर आहे. 'अमेरिकेमध्ये रहा व व्यावसायिकांनी परत या' असे म्हटले आहे. भारताची व्यूहरचना ही बहुराष्ट्रीय निगमांना आकर्षित करण्याची आहे. इतर देशातील बहुराष्ट्रीय निगमांनी भारतामध्ये येऊन उत्पादन करावे. या बहुराष्ट्रीय निगमांमध्ये लागणाऱ्या श्रमिकांना कौशल्य भारत अभियानामार्फत प्रशिक्षण दिले जाते. दोन्ही देशांमध्ये राष्ट्रीय उच्चप्रत (Branding) वैशिष्ट्याची करायची आहे. दोन्ही देशांमधील सामाजिक माध्यमाची भूमिका प्रशासकीय शक्ती वाढवणारी आणि आर्थिक राष्ट्रवादाच्या कार्यक्रम पत्रिकेला प्रोत्साहन देणारी आहे.

**आर्थिक राष्ट्रवादाची मोहीम :**

अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आर्थिक राष्ट्रवादाची मोहीम लाल टोपीसह 'मेक अमेरिका ग्रेट अगेन' या ब्रीदवाक्याने केली होती. त्यांचा आर्थिक राष्ट्रवादाची धोरणे जुलै २०१८ पासून सुरू झाली. १७

जुलै, २०१८ हा अमेरिका दिवस प्रशासकीय आर्थिक राष्ट्रवाद धोरणाकरिता वैशिष्ट्यपूर्ण ठरला. या वेळी ट्रम्प असे म्हणाले की, या आर्थिक धोरणामुळे अमेरिकेच्या निर्माणी, बांधकाम, कृषी, खनिज आणि उद्यमीसह राष्ट्राची संपदा निर्मिती आणि आर्थिक चैतन्य निर्माण होणार आहे. अमेरिकेने निर्माण केलेली उत्पादने उच्चतम गुणात्मक पातळीची आहे. नवप्रवर्तने, कारागिरी आणि उच्चतम कौशल्यनिपुण श्रमिकांद्वारे उत्पादन केले जाते. यामुळे अमेरिकेतील कामगार आणि रोजगार टिकून राहणार आहे. यामधून अमेरिकेच्या स्वप्नांना प्रोत्साहन मिळणार आहे. ट्रम्प यांनी भाषणामधून अमेरिकेतील आर्थिक व राष्ट्रीय सुरक्षिततेची जोडणी प्रस्तुत केली होती.

भारतामध्ये २०१४ मध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'मेक इन इंडिया'ची मोहीम सुरू केली. १५ ऑगस्ट २०१४ च्या भाषणामध्ये त्यांनी म्हटले की, 'संपूर्ण जगाच्या लोकांनी या आणि भारत तयार करा' (Make in India) भारतामध्ये निर्माणी वस्तूचे उत्पादन करा. कौशल्यनिपुण, प्रतिभावान, शिस्त आणि प्रबळ इच्छाशक्ती असणाऱ्या लोकांना 'मेक इन इंडिया' तयार करण्याची संधी देत आहोत.

मोदीच्या 'मेक इन इंडिया' मोहिमेची दोन प्रतिकात्मक वैशिष्ट्ये आहेत. सिंह हा औद्योगिक प्रतीक आहे तर दुसरे चरख्याचे प्रतीक आहे. भारतीय लोकांची उत्पादकशक्ती वाढावी व दशलक्ष लोकांना कौशल्य प्राप्त व्हावे याकरिता प्रधानमंत्री वचनबद्ध आहेत. २०२२ पर्यंत ४०० दशलक्ष लोकांना नव्याने कौशल्य प्राप्त करून निर्माणी क्षेत्रात रोजगार प्राप्त होणे हे उद्दिष्ट आहे. कौशल्य प्राप्तीतून भारतीय श्रमिक निगमांना सेवा देतील. यामुळे भारतात विविध क्षेत्रांतील कारखान्याची बांधणी होईल. स्वातंत्र्यलढ्याच्या वेळी महात्मा गांधी यांनी स्वदेशी धोरण स्वीकारण्याचे आव्हान केले होते. ही प्रतीकात्मक कृती ब्रिटिश कापडाला नाकारून देशी कापडाला अनुकूल होती. मोदींचे 'मेक इन इंडिया' धोरण गांधींच्या समान धोरणांना प्रस्तुत करणारे आहे. आजच्या आर्थिक राष्ट्रवादासह गांधींचे स्वदेशी आणि स्वराज्य प्रकल्प नव उदारीकरणाच्या चौकटीला आव्हान देत आहे. येथे स्वदेशी म्हणजे स्वत:चे उत्पादन, तर स्वराज्य म्हणजे स्वत:चे सक्षमीकरण म्हणून अभिप्रेत आहे. मेक इन इंडिया म्हणजे आधिक्याने विक्री करण्याची धावपट्टी आहे. हा सामूहिक आर्थिक राष्ट्रवादाचा प्रकल्प आहे.

ब्रिटिश वसाहतीकडून स्वातंत्र्य मिळविण्याचे देशीय प्रतीक व्यापार आणि राजकारण होते. आर्थिक राष्ट्रवादातून राजकीय नेतृत्व ब्रिटिश वसाहतीशी लढले होते. या संदर्भात डाना फ्रँक असे म्हणतात की, अमेरिकन क्रांतीचे राजकीय पुढारी हे सुद्धा देशीय कपडे घालत होते. ब्रिटिश आयाती व कराची अवज्ञा करीत होते. या उलट भारतामध्ये गांधी स्वत:च्या हाताने सूत कातत होते. मुख्यत्वे हाताने तयार केलेले कपडे घालत होते. ब्रिटिश आयातीवर बहिष्कार टाकला होता. आज दोन्ही देशांमध्ये राष्ट्रीय पातळीवर तयार केलेल्या वस्तू उत्पादनाची खरेदी करण्याकरिता प्रोत्साहित केले जात आहे. आयात पर्यायी उद्योगाची स्थापना देशांतर्गत केली जात आहे.

**आर्थिक राष्ट्रवादाची व्यूहरचना व अनुभव :**

**अ) अमेरिका :**

अमेरिकेच्या आर्थिक राष्ट्रवादाची व्यूहरचना स्पष्ट करीत असताना अमेरिकेने व्यावसायिक गुंतवणूकदारांना अमेरिकेमध्ये बोलावून अमेरिकेमध्येच राहायला सांगितले आहे. कर कपातीच्या करारामुळे अमेरिकेमधील गुंतवणुकीचा प्रवाह वाढला आहे. एकूणच अमेरिकेतील रोजगार वाढण्यावर परिणाम दिसून येत आहे. अमेरिकेचे विदेश व्यापार क्षेत्र (Foreign Trade Zone) हा ग्रामीण क्षेत्रामध्ये स्थायिक झालेला आहे. आर्थिक विकास संघटना आणि शासन ग्रामीण श्रमिकांकरिता जाहिरात करीत आहे. श्रमिकांमध्ये न्यून गतिशीलता आहे.

श्रमिक संघटनांना प्रवेश नाकारला आहे. ट्रम्प प्रशासनाने अनेक श्रमिक संघटना तोडल्या आहे. कमी वेतन दरावर रोजगार उपलब्ध आहे. कर्मचारी वर्ग उपलब्ध करून देण्याच्या अभिकरण संस्था (Agency) वाढत आहे. अमेरिकन निगमांनी अमेरिकन निगमांसाठी विदेश व्यापार क्षेत्राची तरतूद केली आहे. यामधून मूलभूत लाभ व दीर्घकालीन रोजगार निर्माण होणार आहे.

या संदर्भात अमेरिकेतील ग्रामीण श्रमिकांचे विश्लेषण करताना आढळून आले की, श्रमिकांच्या नियुक्त्या या कर्मचारी अभिकरण संस्थेकडून होते. विदेशी व्यापार क्षेत्राचा आढावा घेतला, तर किगसोल्वहर यांना असे आढळून आले की, श्रमिकांची नियुक्ती अभिकरण संस्थेमार्फत तात्पुरत्या कालावधीकरिता केली जाते. यामुळे तो गंभीर स्थितीमध्ये आहे. त्यांना केवळ घरी परतण्याचा अधिकार आहे. सौजन्याने बोलले देखील जात नाही. हा मार्ग फार महान आहे असे नाही. मात्र येथे काम मिळते. आणखी एका श्रमिकाच्या मुलाखतीबाबत सांगतात की, ग्रामीण प्रदेशामध्ये वाहन अंतर जास्त आहे. श्रमिकांना अभिकरण संस्था नेमत असल्या, तरी श्रमिकांना उत्पादक क्षेत्रापर्यंत जाण्यासाठी स्वत:करिता पैसे खर्च करावे लागतात. महिलांना बालक सुरक्षा व्यवस्था वैयक्तिक पातळीवर करावी लागते. ज्या दिवशी काम नसते त्या दिवशी कामावर बोलावले जात नाही. कोणतेच काम उपलब्ध करून दिले जात नाही. म्हणून त्या दिवशी कोणतेच वेतन प्राप्त होत नाही. यामुळे कर्ज वाढत जाते. याकरिता श्रमिकांबाबत लवचिकता असणे गरजेचे आहे. व्यावसायिकांनी आर्थिक राष्ट्रवाद म्हणून अशा बाबीकडे लक्ष दिले पाहिजे. कारण श्रमिकांनी स्वत:ला अनेक दिशांनी वाकविले आहे. कामाच्या अटींमध्ये सामावून घेतले आहे.

अमेरिकेमध्ये फेडरल ट्रेड कमिशनने लेबलिंग (Labelling) करिता नियंत्रण आणले आहे. लेबलिंग मधील तफावतीशी फार मोठा करार झालेला आहे. याला 'मेक इन अमेरिका' असे म्हटले आहे. लेबलिंग फार महत्त्वाकांक्षी आहे. याचा वापर करून कंपन्यांनी उत्पादनाला प्रोत्साहन दिले आहे. यामधून निर्माणी वस्तूला प्रकट केले जाते. केवळ निर्माणी वस्तूच नाही, तर त्याचे स्त्रोत देखील निर्माण केले जातात. फेडरल ट्रेड कमिशनच्या २०१८ च्या अहवालानुसार अमेरिकेमध्ये आर्थिक राष्ट्रवादाचा प्रमुख प्रेक्षक देशीय उपभोक्ता आहे. अमेरिका स्वत: अद्ययावत वस्तूंचा उपभोक्ता आहे. 'खरेदी करावी अमेरिकन लोकांनी' अशी उक्ती आहे. संपूर्ण राजकीय स्थितीचे वातावरण आहे. मेक इन अमेरिकेचे प्रतीक लाल टोपी आहे. ती स्वत: आंतरजालावर अवलंबून आहे. ते राष्ट्रीय शक्तीचे प्रतीक आहे. सामाजिक माध्यमांवर त्याला अभिमानाने प्रस्तुत केले जाते. मात्र धोरणे राबविताना अखंडत्व दिसून येत नाही. धोरणेही जागतिक अर्थव्यवस्थेशी जुळलेली आहेत. त्यामुळे आर्थिक राष्ट्रवाद हा केवळ वक्तृत्वाचा डाव तर खेळत नाही असे वाटते.

**ब) भारत :**

भारतामध्ये मोदींनी 'मेक इन इंडिया'ची रचना बनवली आहे. विदेशी गुंतवणूकदारांना आकर्षित केले जाणार आहे. याकरिता आधिक्याने अधिकार दिले जाणार आहे. बौद्धिक संपदा अधिकार या संदर्भात बाळगला जाणार आहे. चीनला देखील संधी यामध्ये दिली जाणार आहे. भरपूर व स्वस्त श्रमिक राहणार आहे. विदेशी निगम व स्वस्त श्रमिक यावर आधारित भारताची व्यूहरचना आहे. यामधून भारतामध्ये अनेक कौशल्यांना पुढाकार दिला आहे. निर्माणी क्षेत्राकरिता श्रमिक तयार करण्यात येत आहे. 'मेक इन इंडिया' म्हणजे आर्थिक राष्ट्रवादाचे धोरण आहे. यामध्ये राष्ट्रीय कौशल्य विकास निगम (National Skill Development Corporation- NSDC), प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना (PMKVY), दीनदयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना (DDU-GKY),

आजिविका कौशल्य विकास कार्यक्रम, राष्ट्रीय जीविका मंडळ (National Rural Livelihood Mission) इत्यादी श्रमिकांचे कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्यात आले आहेत.

ओडिशामधील ग्रामीण आणि आदिवासी क्षेत्रातील तरुण महिलांकरिता आर्थिक राष्ट्रवादाद्वारे पुढाकार घेतलेल्या स्त्रियांचे अध्ययन अन्नपूर्णादेवी पांडे यांनी केले आहे. यामध्ये शिवणकाम येणाऱ्या प्रशिक्षित स्त्रियांचे अध्ययन केले आहे. ओडिशा सरकारने ओडिशा कौशल्य अभिकरण संस्था स्थापन केली आहे. याचा संपूर्ण भर अकुशल श्रमिक अनौपचारिक क्षेत्राकडून औपचारिक क्षेत्राकडे गेले पाहिजे. यामध्ये सार्वजनिक व खाजगी क्षेत्राचा सहभाग राहील. कारखाने व शिक्षण संस्था तरुण वर्गाकरिता आहे. विशेषत: तरुण वर्गामध्ये उच्चतम पातळीची बेरोजगारी निर्माण झाली आहे. दि सेंच्युरी ग्राम तरंग एम्पालयबिटी प्रशिक्षण संस्थेने २०१० मध्ये कौशल्य विकासाचा कार्यक्रम प्रस्तुत केला आहे. ओडिशामध्ये ७५,००० तरुण लोक प्रशिक्षित झाले आहेत. हे सर्व ओडिशामधील सीमांतिक समूहामधील आहे. अन्नपूर्णा देवीच्या मते, तरुण स्त्रियांना प्रशिक्षण देण्यात आले. भारताच्या कौशल्य विकास कार्यक्रमांद्वारे जीविकेवर झालेले सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम झाले आहे. एका बाजूला सामाजिक भांडवल आहे. श्रमिकांना वेतनाद्वारे प्रत्यक्ष लाभ मिळतो. शिवाय श्रमिक शिक्षण घेतात व घरी पैसे पाठवितात. पण दुसऱ्या बाजूला मानसिक ताणाचा सामना करावा लागतो आहे. हा मानसिक ताण कुटूंबामधील नात्याचा आहे. अनिच्छेने स्वीकाराव्या लागणाऱ्या नवीन व्यवसायाचा आहे. नवीन व्यवसाय सन्मानदर्शक असला, तरी एक प्रकारचा दबाव आहे. ग्रामीण भागात त्यांना परत जायचे आहे. तर अनेकांना नवीन अंगीकारलेल्या कौशल्याचा वापर करणे  कठीण वाटते.

एक तरुण महिला अन्नपूर्णादेवी पांडे यांना म्हणाली की, कारखान्याचा अधीक्षक दुसऱ्या राज्यामधील आहे. तो ओडिशा कामगारांमध्ये भेद करतो. त्याचे म्हणणे आहे की, तुम्ही हळू शिकणारे (Slow Learner) आहात. तुम्ही कन्नड लोकांशी जिंकू शकत नाही. कारण तुम्ही फारच ग्रामीण आणि आदिवासी क्षेत्रातील आहात. ओडिशा श्रमिकांना अशा भेदभावपूर्ण समस्यांचा सामना करावा लागतो. देशांतर्गत पातळीवर कौशल्य प्रशिक्षित श्रमिकांकरिता आव्हान आहे. एका महिलेचा अनुभव असा आहे की, कौशल्य विकास कार्यक्रमामधून रोजगार प्राप्त झाला आहे. यामुळे घर घेण्याकरिता कुटुंबाला २ लाख रु. देऊ शकली आहे. स्वत:च्या आरोग्याची काळजी स्वत: चांगल्या प्रकारे घेऊ शकत आहे. भावाच्या शिक्षणाकरिता पैसे सुद्धा पाठवित आहे.

अनेक कौशल्यनिपुण श्रमिक मेक इन इंडियाला सेवा देत आहे. अंदाजे, दरवर्षी १३ दशलक्ष श्रमिक प्रशिक्षित होऊन काम मिळण्याकरिता तयार झालेले आहे. रेवती कस्तुरी यांच्या लक्ष्य प्रशिक्षण केंद्रानुसार, ७ सप्टेंबर, २०१७ पर्यंत १२ दशलक्ष तरुण वर्ग प्रशिक्षित झाला होता. पण प्रत्यक्ष ६ दशलक्ष लोकांनाच रोजगार प्राप्त झाला आहे. यामुळे प्रशिक्षण वर्ग आणि कुटुंबे यांच्यामध्ये अस्थिरता निर्माण झाली आहे. ज्याचे श्रम सिंहाच्या प्रतीकाद्वारे दर्शविले जाते त्याचे भविष्य कसे राहणार आहे. याद्वारे मेक इन इंडियाला पुढे नेत आहे. भारतामध्ये आंतरराष्ट्रीय बाजारातील उपभोक्त्यासाठी आर्थिक राष्ट्रवाद प्रतीक आहे. भारतीय बनावट ते मूल्यवर्धन ही प्रतीके आहेत. शिवाय आयुर्वेदिक क्षेत्राला स्टार्ट अप कंपन्यांमध्ये प्रोत्साहन देऊन लोकप्रिय उत्पादनांची विक्री केली जात आहे. उदा. कडूनिंब उत्पादने. आर्थिक राष्ट्रवाद भारत व अमेरिका दोन्ही देशांमध्ये फार महत्त्वाचे प्रतीक ठरले आहे. मात्र दोन्हीचा मार्ग भिन्न आहे. जागतिक पातळीवर निर्माणी उद्योगाचे स्थानांतरण केले आहे. निर्माणी उद्योगाचा विस्तार दक्षिण करोलिना ते तमिळनाडूपर्यंत झाला आहे.

**भारत, दक्षिण कोरिया व चीन :**

सुरजित मुजुमदार यांच्या मतानुसार, भारत हा नेहमीच आर्थिक राष्ट्रवादाचा पाठलाग करणारा कृतिशील देश राहिला आहे. आयात पर्यायी उद्योगांना प्रोत्साहन दिले आहे. राज्याच्या आवश्यकतेनुसार कृतिशील हस्तक्षेप व जागतिक अर्थव्यवस्थेशी एकीकरण केले आहे. मात्र, आता राज्य हस्तक्षेप नवीन संदर्भामध्ये स्वीकारला आहे. याचे उद्दिष्ट भारतीय भांडवलशाहीचे विदेशी स्पर्धेपासून संरक्षण करणे आहे. याकरिता राज्याने आयात पर्यायी औद्योगिक व्यूहरचना स्वीकारली आहे. सोबतच संरक्षण व प्रोत्साहन दिले आहे. औद्योगिक धोरणाचा स्वीकार साधन म्हणून केलेला आहे. भारतीय भांडवलदारांनी पुढारलेले तंत्रज्ञान व तंत्रज्ञानाचा वापर शोध घेऊन, समजून स्वीकारला आहे. यातून औद्योगिक क्षेत्र विकसित करण्याचा प्रयत्न केला आहे.

दक्षिण कोरियाने देखील आर्थिक राष्ट्रवादाचा पुरस्कार करून निर्यातींना आर्थिक वृद्धीचे इंजीन मानले आहे. याकरिता विदेशी स्पर्धकांपासून मोठ्या प्रमाणात संरक्षण राष्ट्रीय उद्योगांना दिले आहे. यामुळे दक्षिण कोरिया निर्याताभिमुख राष्ट्रीय विजेता ठरला आहे. तो केवळ यंत्र, यंत्राचे भाग आणि तंत्रज्ञान याकरिता विदेशी पेढ्यांवर अवलंबून आहे. आर्थिक राष्ट्रवादावर लक्ष केंद्रित करून दक्षिण कोरिया जगातील तंत्रज्ञान पुढारलेल्या देशांच्या सर्वोच्च स्थानावर आहे.

चीनची व्यूहरचना देखील आर्थिक राष्ट्रवादाची आहे. आर्थिक राष्ट्रवादाचा पुरस्कार करून चीनने आर्थिक धोरण, देशीय उद्योग, प्रशुल्क व प्रशुल्केतर निर्बंध, निर्यात अनुदाने यामध्ये बदल करून याचा विस्तृत उपयोग देशाला आर्थिक लाभ प्राप्त करून देण्याकरिता केला आहे. चीनचा राष्ट्रवाद आक्रमक आहे. आक्रमकपणे प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीचा पिच्छा पुरवला आहे. यामध्येही निवडकच प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीला प्रवेश दिला आहे. उच्चतम प्रमाणात प्रदूषण करणाऱ्या उद्योगातील प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीला नाकारले आहे. ताब्यात घेणाऱ्या धोरणाचा स्वीकार केला आहे. चीनने २००९ मध्ये हुईयान प्रांतातील कोका-कोला कंपनी स्वतःच्या अधिकारात घेतली आहे. मूलतः चीन नवप्रवर्तने घडवून आणण्याला प्रोत्साहन देत आहे. चिनी लोकांमध्ये प्रेमभावना निर्माण होण्याकरिता एकसंध समाज निर्मितीवर भर देत आहे. 'एकसंध समाज निर्मिती' हे चीन सरकारचे ब्रीद आहे. यामधून जलद आर्थिक वृद्धी घडवून आणायची आहे. विदेशी कंपन्यांची सामाजिक व्यूहरचना चीनमधील व्यवसाय वाढविण्याकरिता महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे. चिनी माध्यमांनी विदेशी कंपन्यांना ओळख व प्रसिद्धी मिळवून दिली आहे. ही प्रभावी सामाजिक व्यूहरचना आहे. व्यूहरचनेचा दबाव हा विदेशी कंपन्यांच्या स्थानिकीकरणाशी जुळलेला आहे. यामध्ये आपण यशस्वी होऊ असा विश्वास लोकांना दिलेला आहे. संशोधन आणि विकास केंद्राची (R & D) उभारणी मोठ्या प्रमाणात शांघायमध्ये करण्यात आली आहे. याकरिता संसाधनांचे संरक्षित व्यवस्थापन करणे हा त्याच्या आर्थिक राष्ट्रवाद व्यूहरचनेचा भाग आहे.

## विभाग 'ब'

**आत्मनिर्भर भारत :**

केंद्र सरकार वेगळ्या प्रकारे संकेत विज्ञानाचा (Semiotics) उपयोग करून लोकांसोबत संवाद साधण्याचा प्रयत्न करीत आहे. ज्याचा टप्पा म्हणजे सध्या सार्वत्रिक साथरोगाच्या निमित्ताने करार करून आदेशाची मांडणी केली आहे. याचे नामाभिधान भारत सरकारने 'आत्मनिर्भर (Self - Reliance)' असे केले आहे. आर्थिक शब्दावलीमध्ये आत्मनिर्भरतेची नव्याने भर पडली आहे. हा केवळ पोकळ शब्द नाही तर त्याअंतर्गत भारत सरकारची आर्थिक विकासाची व्यूहरचना आहे. यामधील विचारसरणी तत्त्वज्ञानाच्या मुळाशी जाणारी आहे. यामध्ये राष्ट्रवाद अंतर्भूत आहे.

हा राष्ट्रवाद महात्मा गांधींना अभिप्रेत असलेल्या नैतिक अर्थव्यवस्थेकरिता लागू केला आहे. आत्मनिर्भरतेचे तत्त्व अर्थव्यवस्थेच्या खोलवर बसवण्याची मांडणी केलेली आहे. आत्मनिर्भर तत्त्वानुसार उत्पादनाची त्या ठिकाणची मूळ संरचना असावी. हे दोन्ही दृष्टिकोन सामान्य स्वरूपाचे आहे. त्याचा भर बहुव्याप्त आहे. बहुव्याप्त याचा अर्थ चर्चा, वादविवाद या धोरणाबाबत घडवून आणण्याची आवश्यकता होती. पण धोरणाची घोषणा होण्यापूर्वी फारशी चर्चा घडली नाही. आत्मनिर्भर संकल्पनेच्या मुळाशी भांडवलशाही अर्थव्यवस्था अंतर्गत आर्थिक राष्ट्रवाद आणि गांधींची नैतिक अर्थव्यवस्था आहे. यामधून शासन अर्थव्यवस्थेला स्वयंनिर्भर करण्याचा प्रयत्न करीत आहे.

स्वयंनिर्भरता व अर्थशास्त्रीय दृष्टिकोन याचा विचार केला तर अर्थव्यवस्थेकरिता नवीन प्रारूपाची (Remodelling) मांडणी केलेली आहे. आत्मनिर्भर भारत अभियानाचा पाया काही गृहीतकांवर आधारलेला आहे. त्याला सध्या थोडे विस्कळीत स्वरूप आहे. अनेक भाष्यकारांनी असे म्हटले की, आत्मनिर्भर संकल्पनेतून शासन लक्ष्यप्राप्ती करणार आहे. चार वर्षांच्या कालावधीमध्ये किंवा २०२४ पूर्वी त्यांची अंमलबजावणी होऊन परिणाम दिसू लागतील. सत्ताधारी पक्षाने गृहीत मानले आहे की, त्यांचे हे धोरण दीर्घकाळपर्यंत टिकून राहील. हे अभियान पूर्णत्वास नेत असताना याकडून शासनाच्या काही अपेक्षा आहे. लोकशाही देशामध्ये आत्मनिर्भर तत्त्वांचा उपयोग विकास घडवून आणण्याकरिता केला जाणार आहे. अशा प्रकारचे हे आर्थिक विकासाचे प्रारूप आहे. यामध्ये कोणताही पक्ष सत्तेत आला तरी त्याचा स्वीकार करून धोरण पुढे रेटत राहील.

वित्त मंत्र्यांनी आत्मनिर्भर भारताची घोषणा करून माध्यमांशी बोलताना स्पष्ट केले की, ही संकल्पना संवेदनशील आहे. संपूर्ण जगाची नैतिक गरज म्हणून ती स्वीकारली गेली आहे. याद्वारे केंद्र सरकार आंतरराष्ट्रीय भांडवलाचा प्रवाह अर्थव्यवस्थेकडे खेचणार आहे. यामधून गुंतवणूक वाढवून नैतिक पुढाकार घेतला जाईल. संपूर्ण जगासाठी असा नैतिक पुढाकार आदर्श ठरू शकतो. आंतरअवलंबित्वातून आरोग्य अरिष्ट तीव्र स्वरूपाचे झाले आहे. यामुळे आंतरअवलंबित्वात कपात घडवून परिणामकारक उपायांची गरज आहे.

केंद्र सरकारची आत्मनिर्भर संकल्पना काळावर आधारित (Time based) आहे. याचा संबंध केवळ सध्याच्या साथरोगाशी नसून भविष्यात येणाऱ्या अटींशी जोडला आहे. ज्याचा अल्पकालीन परिणाम अर्थव्यवस्था आणि समाजावर दिसून येईल. हा समझोता आर्थिक अरिष्टांशी असून त्याद्वारे विविध क्षेत्रांमध्ये मौद्रिक आंवटन केले जाईल. याचा विस्तार घडून भारतीय अर्थव्यवस्थेला नवीन भरारी देण्याचे काम या संकल्पनेमध्ये आहे. आत्मनिर्भर संकल्पनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना न्याय लोकांकरिता प्रस्तुत झाला पाहिजे. लोकांना न्याय मिळाला पाहिजे. आत्मनिर्भर ही स्वतंत्र संकल्पना असून ती असमानतेच्या पातळीवर स्वीकारता येत नाही.

**आरोग्य अरिष्ट :**

नागरी भागामध्ये उत्पन्नाचे असमान वितरण झाले आहे. यामधून काही वर्गाला विशेष अधिकार प्राप्त झाले आहे. भूमीच्या मोठ्या तुकड्याची मालकी मिळाली आहे. दुसऱ्या बाजूला मोठ्या लोकसंख्येचा भाग लहान जागेमध्ये वास्तव्य करीत आहे. नागरी भागांमध्ये असमान वितरण झाले आहे. कोरोना साथरोगामुळे प्रखरतेने अधोरेखित झाले आहे. आरोग्य अरिष्टामध्ये संवेदनक्षम व भेदयता यापासून स्वातंत्र्य माघार घेत असताना दिसून आले आहे. सध्या उद्‌भवलेली सार्वत्रिक रोगाची साथ असून निसर्गामध्ये उद्‌भवलेली रोगराई आहे. यामुळे मोठ्या प्रमाणात झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या गरीब वर्गाची जीवनाची

गुणवत्ता पूर्वीपेक्षा दुर्बल झाली आहे. जीवनाची गुणवत्ता दुर्बल असल्यामुळे लक्ष लोक क्षयरोगाने ग्रस्त आहे. याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. अतिदाट वस्त्यांमध्ये ही समस्या प्रखर आहे. या संदर्भात वेगळा प्रभाव समजून घेतला तर कोरोना विषाणू हा झोपडपट्ट्या, अर्धझोपडपट्ट्या आणि अतिदाट वस्त्यांमध्ये वेगाने पसरला आहे. याचे कारण, खेळती हवा व सूर्यप्रकाशाचा अभाव देखील होता. या सर्वांचा विचार या ठिकाणी आपण का करीत आहोत. जर भारताला आत्मनिर्भर, स्वयंनिर्भर व्हायचे असेल तर निरोगी समाजाची निर्मिती करणे हा देखील आत्मनिर्भर भारताचा महत्त्वाचा पैलू आहे. याचा अर्थ असा होत नाही की, लोकांना खाजगी रुग्णालयाची उपलब्धता करून देणे किंवा दारिद्र्यात राहणाऱ्या लोकांना आरोग्य संबंधित योजना प्राप्त करून देणे एवढे मर्यादित असून चालत नाही. आत्मनिर्भर भारत निर्माण होण्यासाठी सार्वजनिक क्षेत्रात स्वस्तात आरोग्य सुविधा निर्माण करणे व उच्च गुणवत्तेसह सुरक्षा लोकांना प्रदान करण्याची आवश्यकता आहे.

आत्मनिर्भर भारताची संकल्पना अंमलात आणताना अर्थव्यवस्थेच्या पातळीवर उत्पादनाची स्थानिक संरचना आणि समग्र मागणी व पुरवठ्यामध्ये संतुलन साध्य करायचे आहे. यामुळे 'आत्मनिर्भर भारत' ही संकल्पना नागरी भागातील स्थलांतरणाला रोखून धरेल व आरोग्य अरिष्टांचा सामना करता येईल. आत्मनिर्भर म्हणजे प्रचंड प्रमाणात अर्थव्यवस्थेमध्ये गुंतवणूक वाढविणे असा अर्थ होत नाही तर आरोग्य, शिक्षण सारख्या सामाजिक क्षेत्रांची गुणवत्ता वाढविणे अपेक्षित आहे. समग्र व दीर्घकालीन नियोजन, सबळ राजकीय इच्छाशक्ती अर्थव्यवस्थेच्या संरचनात्मक बदलाकरिता आवश्यक आहे. अन्यथा, आत्मनिर्भर भारत ही केवळ पोकळ संकल्पना राहील.

**आर्थिक पॅकेज :**

केंद्र सरकारचे आत्मनिर्भर पॅकेज काय आहे? आर्थिक प्रेरणा पॅकेज किंवा आरोग्य अरिष्ट सोडवणूक पॅकेज आहे का? जर आर्थिक प्रेरणा ही त्यांची ओळख असेल तर त्यामध्ये राजकोषीय तरतुदी आहेत का? भारतीय रिझर्व्ह बँकेने आर्थिक पॅकेज बाबतची मापके २७ मार्च व १७ एप्रिल, २०२० ला घोषित केले होते. ही शासन संलग्नित कृती होती. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाला पत सुलभता निर्माण करता यावी याकरिता २० लाख कोटी रुपयांचे आर्थिक पॅकेज देण्यात आले. मध्यवर्ती बँकेची तरलता लक्षात घेऊन २० लाख कोटी रुपये पॅकेजच्या स्वरूपात देण्यात आले. ज्याचे प्रमाण एकूण तरलतेच्या २५ ते ३० प्रतिशत होते. रेपो दराद्वारे तरलता निर्मितीचे कार्यान्वयन केले जाते. अर्थव्यवस्थेच्या पातळीवर आधिक्याने तरलता निर्माण करण्याकरिता अधिकोषण व्यवस्थेचा उपयोग करून कर्ज उपलब्ध करून द्यावे लागते. याकरिता शासनाला प्रत्यक्ष खर्च करावा लागतो.

मौद्रिक धोरण कर्ज स्वस्त करू शकते, पण राजकोषीय क्षतिपूर्ती करू शकत नाही. आधिक्याने अर्थव्यवस्था तरलता सापळ्यामध्ये अडकली आहे. म्हणून या आरोग्य अरिष्टांच्या पार्श्वभूमीवर अर्थव्यवस्थेला मदत म्हणून आत्मनिर्भर पॅकेज देण्यात आले आहे. प्रधानमंत्री गरीब व कल्याण योजनेंतर्गत हे पॅकेज देण्यात आले आहे. आरोग्य अरिष्टांच्या काळात असामान्य मानवी विपन्नावस्था घडून आली आहे. म्हणून समष्टी अर्थव्यवस्थेच्या पातळीवर अर्थव्यवस्थेचे पुनरुज्जीवन करण्याकरिता आत्मनिर्भर पॅकेज देण्यात आले आहे.

**असंघटित क्षेत्रातील रोजगार :**

आर्थिक पॅकेज सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगाकरिता जाहीर झाले. याचा संबंध असंघटित क्षेत्रातील रोजगाराशी आहे. यामध्ये स्थलांतरित श्रमिक समाविष्ट आहे. एका बाजूला तरलतेच्या सापळ्यात अडकलेली

अर्थव्यवस्था, सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योगाकरिता (MSMEs) दुय्यम मुक्त स्वयंचलित कर्ज (Collateral Automatic Loan) होते. त्याकरिता २०,००० कोटी रु. कर्ज व ५०,००० कोटी रु. निधी दिला होता. तर दुसऱ्या बाजूला सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योगाच्या निर्मितीकरिता गुंतवणूक व उलाढाल आहे. यामुळे नवीन संदिग्धता निर्माण झाली आहे. श्रमिक तीव्रता ( Labour Intensity) आणि उलाढाल गृहीत धरून बहुजिनसत्वाची अट मांडली आहे. म्हणून असंघटित क्षेत्र रोजगार निर्मिती करिता महत्त्वाचा आहे. सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योगातील घसरण लक्षात घेऊन रोजगार निर्मितीवर भर द्यायचा आहे. याकरिता तरलता सुविधेचा उपयोग करायचा आहे.

रोजगार निर्मिती होण्यामध्ये संदिग्धता आहे. कारण हा लवकर बरा न होणारा आजार आहे. रोजगार निर्मितीकरिता केंद्र सरकारने ४०,००० कोटी रुपये आवंटित केले आहे. यामधून ३०० कोटी रुपये व्यक्ती दिवस काम उपलब्ध होईल असा अंदाज आहे. तर सरासरी वेतन दर २०२ रुपये राहील. अभ्यासकांच्या मते, साधनांद्वारे प्रत्यक्ष क्रिया घडवून आणणे संदिग्धपूर्ण व संशयास्पद वाटते, असे राजस्थान, मध्य प्रदेश व उत्तर प्रदेशच्या अध्ययनावरून दिसून आले. श्रम कायदे लागू करताना त्यामध्ये किमान वेतन, पर्याप्त कामाचे तास, सुरक्षितता इत्यादी वादप्रश्न आहेत. खासगी गुंतवणुकीला पुनरुज्जीवन म्हणून संबोधले आहे. वित्त मंत्र्यांनी घोषणा करताना म्हटले की, शासन सुधारणा घडवून आणणार आहे. ज्याचा संबंध 'सुलभपणे व्यवसाय करणे' (Ease of doing business) या निकषाशी आहे. आरोग्य अरिष्टामधून पुढाकार घ्यायचा आहे. सार्वत्रिक पातळीवर चर्चा करणे, कृती करणे, वित्तीय आवंटन इत्यादी बाबी आत्मनिर्भर भारताकरिता महत्त्वाच्या आहेत.

राजकोषीय तरतुदीची भूमिका सार्वजनिक खर्च वाढवणारी असायला पाहिजे. हा खर्च भौतिक आणि मानवी भांडवलावर व्हायला पाहिजे. लोकांच्या हातामधला पैसा वाढायला पाहिजे. याकरिता प्रत्यक्ष रोखीने हस्तांतरण व अनुदान दिले पाहिजे. सोबतच रोजगाराची हमी, बेरोजगारांना लाभ देताना सुरक्षाजाळे निर्माण करता आले पाहिजे. याकरिता जीडीपीच्या १० प्रतिशत खर्च करावा लागेल. आत्मनिर्भर भारत म्हणजे राजकोषीय तरतुदीचा प्रकार आहे.

**संरचनात्मक सुधारणा :**

कोविड-१९ च्या आरोग्य अरिष्टामधून सुटका होण्याकरिता प्रेरणा पॅकेज (Stimulus Package) देण्यात आले. ज्याचा आशय अर्थव्यवस्थेची बांधणी स्वयंनिर्भर तत्त्वांतर्गत करायची आहे. याकरिता खाजगी आणि विदेशी भांडवलाचा उपयोग करण्यात येणार आहे. आत्तापर्यंत भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये खाजगी व विदेशी गुंतवणुकीचा प्रवेश अलभ्य राहिला आहे. याकरिता शासनाने व्यूहरचनात्मक क्षेत्र खुले केले आहे. भांडवल संचयाकरिता सुरक्षा जाळ्यांचा उपयोग करणार आहे. आरोग्य अरिष्टामुळे अनेक बाबी समोर आल्या आहेत. स्थलांतरित व गरीब श्रमिकांच्या जीविका नष्ट झाल्या आहेत. आत्मनिर्भरता अप्रासंगिक वेळी घडून आली असे नाही. मात्र याबाबत फारशी चर्चा घडून आली नाही. ही शासनाच्या आर्थिक सुधारणांची कार्यक्रम पत्रिका आहे.

केंद्र सरकारने संरचनात्मक सुधारणांची घोषणा आठ क्षेत्रामध्ये केली आहे. यामध्ये संरक्षण उत्पादने, कोळसा आणि खनिजे, अवकाश व्यवस्थापन (Airspace Management) विमानतळे व त्याचा निर्वाह, विमान उत्पादन, विमान उत्पादनाची दुरुस्ती (Repair and Overhaul), केंद्रशासित प्रदेशातील वीज वितरण कंपन्या, अंतरिक्ष व अणूऊर्जा यांचा समावेश आहे. यामध्ये खाजगी गुंतवणूकदारांना परवानगी व खाजगी भांडवलाचा विस्तार करणार आहे. याअंतर्गत आर्थिक

सुधारणा घडून येणार आहेत. आर्थिक राष्ट्रवादाचा नवउदारमतवादाशी मेळ घातला आहे, असे उपरोधिक चित्र पाहायला मिळते. विदेशी भांडवलातून समाजहित साध्य करायचे आहे. असे खरोखर घडून येईल का? संरक्षण क्षेत्रामध्ये गुंतवणूकदारांकडून नफा संचय करण्यामध्ये पुढाकार घेतला जाईल. विदेशी भांडवल गुंतवणुकीची मर्यादा ४९ प्रतिशत वरून ७४ प्रतिशत पर्यंत करण्यात आलेली आहे. प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीची नियमावली लागू करताना मोठ्या प्रमाणात शिथिलता निर्माण केली गेली आहे. याचा परिणाम, विदेशी गुंतवणूकदारांना मोठ्या प्रमाणात परतावा प्राप्त होईल. देशाबाहेर परताव्याचे हस्तांतरण होईल. शिवाय देशीय अर्थव्यवस्थेमध्ये बहुस्तंभ व रोजगार निर्मिती मर्यादित प्रमाणात घडून येईल अशी आशंका निर्माण होते.

देशाची व्यूहरचनात्मक क्षेत्रं खुली केली आहेत. यांचा अंतर्भाव संसाधने आणि राष्ट्रीय संपत्तीची बांधणी म्हणून केला जातो. ही बाब खाजगी व विदेशी गुंतवणूकदारांच्या अनुकूल आहे. मात्र हे सर्व राष्ट्रहिताला हानी पोहोचवणारे ठरू शकते. असमानता वाढण्याची शक्यता आहे. संरक्षण क्षेत्रामध्ये अनुदान व तंत्रज्ञान हस्तांतरित केल्या जाणार आहे. विदेशी गुंतवणुकीकरिता अटी शिथिल केल्या आहेत. आयात केल्या जाणाऱ्या क्षेपणास्त्रासारख्या संरचनात्मक वस्तूंच्या आयातीवर निर्बंध घातले जाणार आहेत. देशीय संरक्षण उत्पादनाला चालना देणार आहे. याचाच भाग म्हणून कॉर्पोरेशन ऑफ ऑर्डिनन्स फॅक्टरी बोर्डची (Corporation of Ordinance Factory Board) घोषणा केंद्र सरकारने केली आहे.

कोळसा खाणीच्या संदर्भात विचार केला तर याबाबतच्या अटी सैल केल्या आहेत. कोळसा खाणीची विक्री CMSP Act - 2015 व MMDR Act - 1957 (Coal Mines and Special Provision -CMSP Act 2015 and Mines & Minerals Development and Regulation - MMDR Act 1957) नुसार केली जात आहे. कोळसा खाणीच्या लिलावाकरिता खुला प्रवेश लिलाव (Open Access Auctioning) लागू केला आहे. मात्र याकरिता परिस्थितीकीय प्रभाव व विस्ताराचा विचार केलेला नाही.

हवाई क्षेत्राच्या संदर्भात सहा विमानतळांचा लिलाव करण्यात येणार आहे. या अगोदर बारा विमानतळांचा लिलाव झालेला आहे. ही खासगीकरणाची दुसरी फेरी असून त्याच्या मुळाशी सार्वजनिक-खाजगी भागीदारी आहे. यामधून वास्तविक क्षेत्रांना उत्तेजन दिले जाणार आहे. विमानतळाच्या खाजगीकरणातून लाभ प्राप्त होणार आहे. यामुळे अंशतः प्रवासी वेळेत कपात व इंधन बचत घडून येणार आहे. या आर्थिक सुधारणांचे प्रमुख उद्दिष्ट भारताला जागतिक पातळीवर विमान उत्पादनाच्या दुरुस्तीचे प्रमुख केंद्र (Hub) तयार करायचे आहे.

आर्थिक सुधारणांची घोषणा करून खाजगी गुंतवणुकीसह संरक्षण वाढविण्यावर शासनाने भर दिलेला आहे. वीज वितरण कंपन्यांचे खाजगीकरण होत आहे. आठ केंद्रशासित प्रदेशामध्ये वीज सुधारणा विधेयक २०२० लागू करून कंपन्यांमध्ये खाजगी भागीदारीला प्रोत्साहन दिले आहे. शासन खाजगीकरणाच्या कार्यक्रमपत्रिकेला जोमाने पुढे ढकलत आहे. अशाच प्रकारे खाजगीकरण अंतरिक्ष आणि अणू ऊर्जेबाबत लागू केले आहे. संरचनात्मक सुधारणा घडवून आणणे हा खाजगीकरणाचा भाग आहे. शासनाने घोषणा केली आहे की, सर्व क्षेत्र खाजगी गुंतवणूकदारांसाठी खुली केली आहे. याकरिता निर्गुंतवणूक, एकीकरण, समेटीकरण अंतर्भूत आहे. याकरिता डिस्क्रिमिनेटिंग कंपनी ॲक्ट २०१३ (Discriminating Company Act - 2013) लागू केला गेला आहे.

**जागतिकीकरणासह संरक्षणवाद :**

भारतीय अर्थव्यवस्थेच्या पुनरुज्जीवनासाठी प्रधानमंत्री यांनी आत्मनिर्भर भारताची घोषणा केली आहे. जागतिकीकरणाबाबत सार्वत्रिक पातळीवर चर्चा सुरू आहे. या अंतर्गत स्थानिक पातळीवरच्या उत्पादकांना साहाय्य केले जाणार आहे. चीनमधून प्रसार झालेल्या कोरोना विषाणूचा जगभर प्रसार झाल्यामुळे जागतिक अर्थव्यवस्था दुर्बल झालेली आहे. जागतिक समाजरचना गोंधळलेली आहे. या स्थितीची तुलना १९२९ च्या जागतिक महामंदीशी करता येते. या आरोग्य अरिष्टाने देशाची आर्थिक वृद्धी मोडून टाकली आहे. आर्थिक वृद्धीच्या शोकांतिकेमुळे पुरवठा साखळी गळून पडली आहे. विलगीकरण, स्वयंपर्याप्तता आणि स्व-निर्भर हे शब्द आज अर्थव्यवस्थेकरिता परवलीचे ठरत आहे.

१९९० च्या दशकामध्ये संपूर्ण जगामध्ये जागतिकीकरणाचा स्वीकार करण्यात आला. ज्याचा परिणाम असमानता वाढण्यावर दिसून आला. सोबतच आर्थिक वृद्धी दर कमी व उच्चतम कर्ज घेण्याची प्रवृत्ती दिसून आली. २००८ च्या वित्तीय अरिष्टामध्ये हे सर्व वादप्रश्न उफाळून आले. श्रमिकांचे स्थलांतरण, ब्रेग्झिट, अमेरिका, हाँगकाँग, बोलिव्हिया, इराक व लेबनॉनमध्ये झालेली आंदोलने जागतिकीकरण विरोधी होती. सर्व पातळीवर जागतिकीकरण अपयशी ठरत असल्याचे दिसून आले. जागतिकीकरण निर्माण झालेल्या अरिष्टाच्या निर्मितीतून अर्थव्यवस्थेला बाहेर काढत नाही आणि समस्यांची सोडवणूक करीत नाही.

आंतरराष्ट्रीय व्यापार अधिक्याने आदानावर अवलंबून असतो. यामधून आंतरराष्ट्रीय बाजाराची निर्मिती होते. मात्र, यामध्ये पुरवठा साखळीने संपूर्णपणे थांबा घेतला आहे. विशेषत: चीन पुरवठा साखळीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. जागतिकीकरणामध्ये पुरवठा साखळीमध्ये दौर्बल्य दिसून आले. काही देशांचे विशिष्ट उत्पादनाबाबत विशेषीकरण केले आहे. उदाहरणार्थ, चीनमध्ये निर्माणी वस्तूचे प्रमुख उत्पादन केंद्र (Hub) आहे. जर्मनी यंत्र उत्पादनाचे प्रमुख केंद्र आहे. चीनच्या निर्माणी वस्तू व जर्मनीच्या यंत्राची मागणी जागतिक पातळीवर घटलेली आहे. यामुळे चीन व जर्मनीचा व्यापार प्रभावित झाला आहे. जागतिकीकरणाचा संबंध हा एका देशाचा इतर देशांशी असणाऱ्या आंतरसंबंधावर अवलंबून असतो. जागतिकीकरणाचे धक्के स्वयंचलित यंत्रे, विजेच्या वस्तू, औषधी उत्पादने इत्यादींना बसलेले आहेत. आरोग्य अरिष्टाशी लढा देताना ही सर्व उत्पादने अर्थव्यवस्थेमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडत आहे.

अनेक अध्ययनांवरून दिसून आले आहे की, एखाद्या राष्ट्राने आधिक्याने इतर राष्ट्रांवर अवलंबून असणे किंवा जगाशी मोठ्या प्रमाणात झालेल्या आंतरजोडणीमुळे अर्थव्यवस्थेत सातत्याने चढउतार निर्माण होत आहेत. यावरून असे म्हणता येते की, जागतिकीकरणाची प्रक्रिया बदल घडवून आणत आहे. हा बदल आर्थिक वृद्धी दर आणि बहुपक्षीय व्यापारामध्ये घडून आलेला आहे. यामुळे देशांच्या सौदाशक्तीच्या संरचनेमध्ये निराशा निर्माण झाली आहे. विकसनशील देशांना धक्के बसत गेले आहे. जागतिकीकरणापासून मिळणारे लाभ वाढण्याऐवजी घटत गेले आहेत. रोजगार व गुंतवणुकीमध्ये घसरण घडून आली आहे.

प्रत्येक देश त्याच्या व्यूहनीतीचे पुनर्मूल्यांकन करीत आहे. नवीन वास्तविकतेचा स्वीकार करीत आहे. सध्या मोठ्या प्रमाणात अर्थव्यवस्थांना आधार देण्याचा प्रयत्न केला जात आहे. देशांच्या अर्थव्यवस्था शाश्वत मार्गाने पुढे नेऊन विकसित करायच्या आहे. याकरिता किमान आयात अवलंबित्व, स्थानिक उत्पादनांमध्ये वाढ, अर्थव्यवस्थांकरिता सुरक्षा जाळे, आर्थिक लाभ मिळण्याकरिता अर्थव्यवस्थेवर नियंत्रण, नवप्रवर्तनीय पद्धतीने व्यवस्थापन करणे, पुरवठा साखळीमध्ये वाढ

करणे इत्यादीमध्ये बदल आत्मनिर्भर, स्वयंनिर्भर तत्त्वांतर्गत केल्या जात आहे.

एकूणच जागतिकीकरणाच्या दृष्टिकोनाबाबत जगभरामध्ये बदल घडून येत आहे. अर्थव्यवस्थेचा आधार प्रादेशिक सामाजिक व्यवस्था आणि सुरक्षा जाळे आहे. जागतिकीकरणासह संरक्षणवाद जगभरातील अर्थव्यवस्थेमध्ये दिसून येत आहे. जागतिकीकरण ही जरी दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया असली, तरी सर्वच देशांनी यामधून वळसा (U-Turn) घेतला आहे. सर्वच देश यामधून मागे परतू इच्छित आहे. आर्थिक आणि राजकीय शक्तीच्या माध्यमातून यामधून सोडवणूक करण्याचा प्रयत्न करीत आहे. कारण जागतिकीकरणातून आव्हान देणारा साम्राज्यवाद उद्‌भवत आहे. सध्याच्या सार्वत्रिक साथरोगाचे अरिष्ट आणि अर्थव्यवस्थेच्या पातळीवर द्यावा लागणारा लढा यामुळे आत्मनिर्भर, स्वयंनिर्भरतेचे महत्त्व वाढत आहे. यामुळे अवलंबित्व कमी करून स्थानिक उत्पादनाला प्रोत्साहन दिले जात आहे.

**समारोप :**

कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर धोरणात्मक बदल भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये घडून येत आहे. याकरिता प्रधानमंत्री यांनी १२ मे २०२० रोजी आत्मनिर्भर भारताची घोषणा केली. याकरिता अर्थव्यवस्था, आधारभूत संरचना, तंत्रज्ञान वाहक व्यवस्था, लोकशाही आणि मागणी व पुरवठा या पाच स्तंभांचा उल्लेख केला. या पाच स्तंभांद्वारे आत्मनिर्भर भारताच्या विकासाचा मार्ग निवडला आहे. अर्थव्यवस्थेकरिता संरक्षण मानके लावली आहेत. उदारीकरण, खाजगीकरण व मुक्त व्यापार नीती स्वीकारून भारताला आत्मनिर्भर व्हायचे आहे. आत्मनिर्भर होत असताना आपला जगाशी व जगाचा आपल्याशी मुक्त, खुला संबंध राहणार आहे. आपण जागतिक पातळीवर विलग राहणार नाही. आत्मनिर्भर भारताची संरचना बनविताना आयात मूल्यापेक्षा निर्यात मूल्य जास्त ठेवणे, आधारभूत संरचनेचा विकास, जी.डी.पी. मध्ये औद्योगिक क्षेत्राचा वाढता वाटा, कृषी क्षेत्राची दुरवस्था दूर करणे, हे आत्मनिर्भर भारताच्या धोरणाचे प्रमुख तत्त्व आहे. याकरिता विविध वस्तू व सेवांचे उत्पादन वाढविणे, देशीय व आंतरराष्ट्रीय बाजार देशीय वस्तू व सेवांना उपलब्ध करून देणे याकरिता विशेष प्रयत्नांची गरज आहे. नवीन तंत्रज्ञान विकसित करणे, खाजगी व प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीला चालना देणे, पुरवठा साखळी मजबूत करणे, देशी वस्तूंच्या पुरवठ्याबरोबर देशी वस्तूंच्या मागणीत वाढ करणे. या वस्तू लोक केवळ राष्ट्रप्रेमापोटी खरेदी करणार नाहीत तर या वस्तू आंतरराष्ट्रीय दर्जाच्या असणे आवश्यक आहे. वस्तूंचे ब्रँड लोकप्रिय करून विदेशी बाजारपेठ काबीज करणे, संरक्षण क्षेत्रात देशी उत्पादन व तंत्रज्ञानाला प्राधान्य देणे यामुळे भारताची आयात कमी होईल. जर आयात मूल्यापेक्षा निर्यात मूल्य जास्त राहिले तर आंतरराष्ट्रीय पातळीवर आत्मनिर्भरता निर्माण होईल. कृषी क्षेत्रामध्ये उत्पादन खर्च वजा जाता किंमतीतून नफा प्राप्त होईपर्यंत खऱ्या अर्थाने आत्मनिर्भर होणार नाही. शेतकरी आत्मनिर्भर झाला तर 'Vocal for local, Local for global, Make for world' या म्हणण्याला अर्थ प्राप्त होईल.

**संदर्भसूची :**


1. Cooper Zaki (2007) : Economic Nationalism, Smith Institute, London.
2. Dcosta Anthony (edited) (2012) : Globalisation and Economic Nationalism in Asia, Oxford University Press.
3. Dusche Michael (2010) : Origin of Ethic Nationalism in Germany and Repercussion in India, Vol. XLV, No. 22, Economic & Political Weekly, May 29.

4. Editorials (2017) : Two Nationalism, Vol. III, No. 4, Economic & Political Weekly, Jan. 28.
5. Editorials (2018) : Against Militaristic Nationalism, Vol. IIII, No. 3, Economic & Political Weekly, Jan. 20.
6. Editorials (2020) : No Stimulus in Economic, Economic Stimulus Package, Vol LV, No. 21, Economic & Political Weekly, May 23.
7. Editorials (2020) : The Idea of Atmanirbhar India, Vol LV, No. 21, Economic & Political Weekly, May 23.
8. Frank, Dana (1999) : Buy American : The untold story of Economic Nationalism, Boston, Beacon Press.
9. Gabha O.P. (2015) : Encyclopedia of Political science, Mayur Paperbacks, Noida.
10. Gavaskar Mahesh (2015) : Modi Diaspora Nationalism, Vol. L, No. 41, Economic & Political Weekly, Oct. 10.
11. Ghosh Sangita (2020) : Examining the COVID-19 relief package for MSME's, Vol LV, No. 22, Economic & Political Weekly, May 30.
12. Gopalguru (2020) : Is truth telling self defecting ? Vol. IV No. 26, Economic & Political Weekly, Sept. 5.
13. John Rose (2018) : Redefing Nationalism Vo. IIII, No. 36, Economic & Political Weekly, Sept. 8.
14. Joseph Reji K. (2013) : Economic Nationalism of Asia, Vo. XLVIII, No. 33, Economic & Political Weekly, Aug. 17.
15. Kasturi Revati (2017) : Personal presentation as founder and CEO LYUSH Job Skill Academy, 7 September, Skill in Odisha, Enclave, Bengaluru.
16. Kingslover Ann, Pande Annapurna (2020) : Economic Nationalism in the US and India, Vol. LIV, No. 23, Economic & Political Weekly, June 8.
17. Nayar Baldev Raj (1997) : Globalisation, Nationalism and Economic Policy Reform, Economic & Political Weekly, July 26.
18. Nayar Deepak (2019) : The Future of Globalisation, Vol. LIV No. 44, Economic & Political Weekly, Nov. 9.
19. Sarkar Gopi, Naik Gopal (2020) : Atmanirbhar Bharat Abhiyan and Agriculture, Vol - LV, No. 35, Economic & Political Weekly, August 29.
20. Satyamurti T.V. (1998) : Nationalism in the Era of Globalisation, Economic & Political Weekly, August 15-22.
21. Subramanium S., Meha Pant, Asuthosh Srivastava (2020) : Globalisation at Peril, Vol. LV, No. 24, Economic & Political Weekly, June 13.

◆

---

‘‘विकसनशील अर्थव्यवस्थेला साहाय्य करणे आणि चलनवाढीच्या (भाववाढीच्या) वाढत्या दबावाशी सामना करणे अशा दुहेरी हेतुंनी भारताच्या रिझर्व्ह बँकेचे चलनविषयक धोरण प्ररित झालेले आहे.

**- एस. के. बसू**

---

# भारताच्या भाववाढ नियंत्रण धोरणातील नवीन बदल

**राजकुमार आण्णासो वाइंगडे** †

**प्रस्तावना :**

भारतीय रिझर्व्ह बँक कायदा १९३४, ०१ मे, २०१६ मध्ये सुधारित करून भारताने बदलती भाववाढ लक्ष्य व्यवस्था (Flexible Inflation Targetting Farmework) स्विकारली. या सुधारणेनुसार, केंद्रसरकार हे भारतीय रिझर्व्ह बँकेशी सल्लामसलत करुन भाववाढीचे ध्येय दर पाच वर्षातून एकदा निश्चित करेल असे धोरण स्विकारण्यात आले.

वित्त कायदा २०१६ अनुसार, भारतीय रिझर्व्ह बँक कायदा १९३४ मध्ये वरील बदल करुन तो २७ जून, २०१६ च्या भारताचे राजपत्र (असाधारण) मधून प्रकाशित करण्यात आला. त्यानंतर केंद्र सरकारमार्फत भारतीय रिझर्व्ह बँकेशी सल्लामसलत करुन भाववाढीचे लक्ष्य ५ ऑगस्ट, २०१६ रोजी भारताचे राजपत्र (असाधारण) मध्ये प्रकाशित करण्यात आले. या निर्णयानुसार भाववाढीचे लक्ष्य हे खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले.[१]

| तपशील | लक्ष्य | कालावधी |
|---|---|---|
| भाववाढ दर लक्ष्य | ४ % | ५ ऑगस्ट २०१६ ते ३१ मार्च २०२१ |
| वरची सहनशील पातळी | ६ % | |
| खालची सहनशील पातळी | २ % | |

थोडक्यात भारतीय रिझर्व्ह बँक कायद्यातील २०१६ च्या दुरुस्तीने भाववाढीचा दर हा ४% राखण्याचा आणि त्यामध्ये अपवादात्मक परिस्थितीमध्ये खाली किंवा वरील बाजूस २% इतके विचलन मान्य राहिल असा आदेश भारतीय रिझर्व्ह बँकेला देण्यात आला. म्हणजेच भाववाढीच्या दरासाठी २% ते ६% इतका पल्ला निश्चित करण्यात आला व तो राखण्यासाठीची जबाबदारी ही चलनविषयक धोरण समितीकडे सोपविण्यात आली.

भारतीय रिझर्व्ह बँक कायदा १९३४ मधील २०१६ च्या दुरुस्तीने भारतातील भाववाढ नियंत्रण आणि चलनविषयक धोरण प्रक्रियेबाबतीत जो आणखी एक महत्त्वाचा बदल स्विकारण्यात आला. त्यानुसार केंद्र सरकारमार्फत चलनविषयक धोरण समिती (Monetary Policy Committee) स्थापन करण्याचा आणि या

† सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, देवचंद कॉलेज, अर्जूननगर
आजीव सभासद क्र. १२००, भ्रमणध्वनी : ९९२२२७३९६६, ई-मेल : rajwaingade@gmail.com

समितीमार्फत चलनविषयक धोरण प्रक्रिया राबविण्याची तरतूद सुधारित कायद्याच्या कलम ४५ZB मध्ये करण्यात आली. त्या अनुषंगाने २९ सप्टेंबर, २०१६ला पहिली चलनविषयक धोरण समिती स्थापन करण्यात आली. सहा सदस्य असणाऱ्या या समितीस लोकशाही पद्धतीने किंमत स्थिरता तसेच आर्थिक विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या अनुषंगाने चलनविषयक धोरण निश्चित करण्याचे, बेंचमार्क धोरण दर म्हणजेच रेपो दर ठरविण्यासाठी अधिकार सोपविण्यात आले.

वरील दोन्ही बदल अमलात येऊन पाच वर्षाचा कालखंड उलटलेला आहे. त्यामुळे या दोन्ही बदलाचे यशापयश तपासून पहाण्याच्या उद्देशाने या लेखाचे प्रयोजन केलेले आहे.

**भाववाढ लक्ष्य व्यवस्था**

भाववाढ लक्ष्य व्यवस्था ही एक चलनविषयक धोरणाअंतर्गत स्विकारली जाणारी व्यूहरचना असून तिचा वापर हा मध्यवर्ती बँकांमार्फत भाववाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि भाववाढीचा दर एका विशिष्ट मर्यादेमध्ये ठेवण्यासाठी केला जातो. भाववाढ लक्ष्य व्यवस्थेचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे त्याअंतर्गत भाववाढीच्या दराचे साध्य करावयाचे लक्ष्य हे आगाऊ निश्चित करुन तसे जाहीर केले जाते. त्यानंतर निश्चित केलेले भाववाढीचे लक्ष्य साध्य करण्यासाठी मध्यवर्ती बँक आणि इतर मौद्रिक संस्थांमार्फत व्याज दरासारख्या साधनांचा वापर करुन भाववाढीचा दर पूर्वनिश्चित पातळी किंवा पल्ल्यामध्ये ठेवला जातो. अशा प्रकारची व्यवस्था ही सर्वप्रथम औपचारिकरित्या १९९० मध्ये न्यूझीलंड या देशाने स्विकारल्याचे व त्यानंतर इतर अनेक देशांनी तिचा स्विकार केल्याचे दिसून येते.[२]

भाववाढ लक्ष्य व्यवस्थेच्या पुरस्कर्त्यांच्या मते, या व्यवस्थेमुळे चलन विषयक धोरण प्रक्रियेमध्ये उत्तरदायित्त्व निश्चिती आणि पारदर्शकता आणता येते. त्याचप्रमाणे मध्यवर्ती बँकेस किंमत स्थिरता या एकाच उद्दिष्टावर लक्ष केंद्रित करता येते ज्यामुळे चलनविषयक धोरणाची परिणामकारकता सुधारते. भारताने स्विकारलेली बदलती भाववाढ लक्ष्य व्यवस्था ही भाववाढ नियंत्रणाबरोबरच आर्थिक विकासाच्या उद्दिष्टावरही लक्ष देण्यासाठी पुरेसा वाव निर्माण करते. या व्यवस्थेचा पाठपुरावा करणाऱ्याच्या मते, या व्यवस्थेमुळे भाववाढ दर तर नियंत्रणात ठेवता येतोच पण त्याचबरोबर त्यातील चढउतारही मोठ्या प्रमाणात कमी झाल्याचे सिद्ध झालेले आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे या व्यवस्थेच्या माध्यमातून लोकांच्या भाववाढीसंदर्भातील अपेक्षा (Intlationary Expectations) ज्या वास्तव भाववाढीच्या दरावर मोठा प्रभाव टाकत असतात, त्यांना दिशा देणे आणि त्या स्थिर राखणे शक्य होते.

भाववाढ लक्ष्य व्यवस्थेच्या विरोधी जे मुद्दे मांडले जातात त्यामध्ये प्रामुख्याने भाववाढ नियंत्रणावर देण्यात येणारा अवाजवी भर हा अनावश्यक आणि इतर उद्दिष्टाकडे दुर्लक्ष करणारा मानला जातो. प्रामुख्याने भारतासारख्या विकसनशील देशाच्या बाबतीत भाववाढ नियंत्रणाबरोबरच इतर आर्थिक आणि सामाजिक उद्दिष्ट्ये साध्य करणे हे तितकेच महत्त्वाचे असते आणि त्याअनुषंगाने मध्यवर्ती बँकेचे धोरण हे वापरले जाणे क्रमप्राप्त असते. त्यामुळे विकसनशील किंवा उदयोन्मुख अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने भाववाढ लक्ष्य व्यवस्था ही अयोग्य मानली जाते. त्याचप्रमाणे ही व्यवस्था परिणामकारक ठरण्यासाठी काही पूर्व अटींची पुर्तता व्हावी लागते. ज्यामध्ये मध्यवर्ती बँकेची स्वायत्तता, विश्वसनीय आकडेवारी संकलित करणे आणि त्याआधारे मॉडेलिंग आणि अंदाज करणे यासाठीची पूर्ण विकसित झालेली तांत्रिक व्यवस्था, पूर्णतः विनियंत्रित किंमत यंत्रणा, डॉलरायझेशनची किमान पातळी, पूर्णतः विकसित आणि आरोग्यदायी वित्तीय बाजार आणि राजकोषीय वर्चस्वाचा अभाव इ. बाबीचा समावेश

होतो. या सर्व बाबीची पूर्तता झाल्यासच चलनविषयक धोरणाची प्रेषण यंत्रणा योग्य प्रकारे काम करते व निश्चित केलेले भाववाढ लक्ष्य अल्पकाळामध्ये साध्य करता येते.[३]

**भारतातील भाववाढीचा इतिहास**

भारतातील भाववाढीचा इतिहास हा तुलनेने चांगला राहिल्याचे दिसून येते कारण भारतास कधीही अतिउच्च भाववाढीच्या दरास (Hyper Intlation) सामोरे जावे लागले नाही. भारतामध्ये अनुभवास आलेला सर्वोच्च भाववाढीचा दर हा ५३.८% होता व तो १९४३ च्या उपासमारीच्या परिस्थितीमध्ये अनुभवास आला होता. अमर्त्य सेन यांनी आपल्या लिखाणातून त्या भाववाढीचे उग्र रुप विश्लेषीत केलेले आहे. तर सत्यजित रे यांनी १९७३ मध्ये बनविलेल्या 'Ashani Sanute' या सिनेमामध्ये ते मांडलेले आहे. त्या काळातील परिस्थिती ही भयानक मानली जात असली तरी जर्मनीने अनुभवलेल्या १९२१ मधील परिस्थितीसारखी टोकाची नव्हती.[४]

खरे पाहता भारताच्या भाववाढी संदर्भातील अनुभव हा एक मिश्र स्वरुपाचा राहिलेला आहे. काही वर्षे अशी आहेत की जेव्हा भाववाढीचा दर हा ४०% इतका जास्त होता तर काही वर्षामध्ये तो उणे राहिल्याची अनुभूती आलेली आहे. गेल्या ८२ वर्षामध्ये म्हणजे १९३९-४० पासून पुढे, भारतातील भाववाढीचा दर हा ४२ वर्षामध्ये ६% पेक्षा कमी होता तर इतर वर्षामध्ये तो ६% पेक्षा जास्त राहिलेला आहे. जर सहनशील भाववाढीचा दर ६% आणि त्यापेक्षा कमी असल्याचे गृहीत धरल्यास भारताने भाववाढ नियंत्रणाच्या बाबतीत फारशे यश साध्य केल्याचे म्हणता येत नाही. कारण ४० वर्षामध्ये भाववाढीचा दर हा ६% पेक्षा जास्त राहिलेला आहे. या एकूण कालखंडातील नऊ वर्षामध्ये भाववाढीचा दर हा १५% पेक्षा जास्त राहिलेला आहे. त्यामुळे बऱ्याच लोकांच्या मते भारत हा भाववाढग्रस्त देश आहे. त्यांच्यामते भाववाढ हे भारतीय अर्थव्यवस्थेचे स्थायी वैशिष्ट्ये बनलेले आहे. जवळपास दुसऱ्या महायुद्धापासूनच भाववाढीचा दबाव हा भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये निर्माण झालेला आहे. ज्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे एका बाजूला वाढत जाणारी मागणी आणि दुसऱ्या बाजूला अपूऱ्या प्रमाणात वाढणारा वस्तू आणि सेवांचा पुरवठा हे आहे. वाढणारी मागणी ही वेगाने वाढणारी लोकसंख्या, वाढणारे पैशातील उत्पन्न, पैशाचा पुरवठा आणि रोखतेतील वाढ, काळ्या पैशाचा वाढता आकार आणि आर्थिक विकासाच्या मागणीवर होणारा नैसर्गिक अनुकूल परिणाम इ. घटकांची एकत्रित फलनिष्पत्ती असल्याचे दिसून येते. याउलट वस्तू आणि सेवांचा पुरवठा हा वाढतो आहे. पण त्यातील वाढ ही मागणीच्या तुलनेत अपूरी राहिलेली आहे आणि त्याची महत्त्वाची कारणे म्हणजे पावसावर मोठ्या प्रमाणात आधारलेले शेती क्षेत्र, जुनाट तंत्रज्ञानाचा उत्पादन प्रक्रियेतील वापर, पायाभूत सुविधांचा तुटवडा आणि विविध उत्पादन घटकांची कमतरता ही आहेत.[५]

एकंदरीत भारतातील भाववाढीचे चित्र हे फारसे आल्हाददायक राहिलेले नसले तरी १९९०च्या दशकातील दुसऱ्या अर्धभागामध्ये भाववाढीच्या दरामध्ये कमालीची घट अनुभवास आल्याचे दिसते.[६] घाऊक किंमत निर्देशांक आधारित सरासरी भाववाढीचा दर जो १९९० च्या दशकाच्या पहिल्या अर्धभागामध्ये १०%च्या जवळपास होता तो ५.०८% पर्यंत खाली आल्याचे निदर्शनास येते. भाववाढीच्या दरातील ही घट अनेक घटकांचा एकत्रित परिणाम म्हणून अनुभवास आली.[७] यामध्ये रिझर्व्ह बँकेस पैशाच्या पुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्यात आलेले यश, वित्तीय तुटीचे अल्प प्रमाणातील मौद्रीकीकरण, अन्नधान्य वस्तूंच्या खरेदी किंमतीमध्ये करण्यात आलेली अल्प वाढ, जागतिक भाववाढीतील घट, रुपयाच्या अवमूल्यनातील घट, अन्नधान्य वस्तूंचा पूरेसा साठा, जीवनावश्यक वस्तूच्या आयातीच्या दृष्टीने

आवश्यक असणारी परकीय चलनाची पुरेशी गंगाजळी इ. घटकांचा समावेश होतो. त्याचप्रमाणे अंतर्गत आणि बाह्य व्यापारातील उदारीकरण आणि करांतील घट आणि विवेकशीलता यामुळेही स्पर्धा वाढ आणि खर्च कपात या माध्यमातून भाववाढीवर नियंत्रण ठेवणे हे १९९० च्या दशकामध्ये शक्य झाल्याचे स्पष्ट होते.[८]

भारतातील भाववाढीच्या दरातील दक्षिण दिशेचा प्रवास हा नवीन शतकामध्येही सुरू राहिल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होते. २००१-०२ ते २०१०-११ या काळातील सरासरी भाववाढीचा दर हा ५.६% तर २०११-१२ ते २०२०-२१ या दशकातील घाऊक किंमत निर्देशांक आधारित सरासरी भाववाढीचा दर हा ३.१% इतका राहिल्याचे निष्पन्न होते. थोडक्यात, अलीकडील काळात भाववाढ नियंत्रणाच्या बाबतीत भारतीय रिझर्व्ह बँक आणि भारत सरकार यांना मोठ्या प्रमाणात यश आल्याचे स्पष्ट होते. रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर डॉ. सी. रंगराजन यांनी एका ठिकाणी म्हटल्यानुसार, त्यांनी भाववाढीचे कंबरडे हे १९९० च्या दशकामध्येच मोडले होते.[९] त्यामुळे एके काळी ७ ते ८% असणारा भाववाढीचा दर हा आता ५% च्या जवळपास खाली आलेला आहे व तो आता एक प्रमाण बनलेला आहे.

### भाववाढ लक्ष्य व्यवस्था -भारतीय उदाहरण

वरील पार्श्वभूमीचा विचार करता असे लक्षात येते की, भारतातील भाववाढीचा पूर्वेतिहास हा फारसा चांगला नसला, तरी १९९० च्या दशकातील दुसऱ्या अर्धभागापासून भारतातील भाववाढीचा दर हा नियंत्रणामध्ये राहिलेला आहे. त्याचाच परिणाम म्हणून ४ किंवा ५% इतका भाववाढीचा दर हा आता एक प्रमाण मानला जातो आणि वास्तवातील दर जर या पातळीच्या वर जात असेल तर तो लोकांना त्रासदायक वाटू लागतो आणि भाववाढीविरोधात त्यांची आरडाओरड सुरू होते. त्यामुळे भाववाढ नियंत्रणासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेस पावले उचलावी लागतात.

भाववाढ किंवा किंमत पातळी ही स्थिर ठेवणे हे मध्यवर्ती बँकेच्या चलनविषयक धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट असते आणि चलनविषयक धोरणाच्या माध्यमातून प्रामुख्याने त्या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठीच प्रयत्न केले जात असतात.


भाववाढ ही नियंत्रणाबाहेर जाणे हे धोक्याचे मानले जाते. वास्तविक, भाववाढ ही तिच्या प्रतिकूल परिणामामुळे मध्यवर्ती बँक आणि शासन यांचा नंबर एकचा शत्रू म्हणून विचारात घेतली जाते. भारतासारख्या विकसनशील देशामध्ये तर भाववाढ ही अनर्थकारी ठरु शकते. कारण, भाववाढीमुळे चलनाचे मूल्य कमी होऊन लोकांचा चलनावरील विश्वास डळमळीत होऊ शकतो. भाववाढ ही अनेकांना दारिद्र्यरेषेखाली ढकलणारी असते. भाववाढीमुळे आयात वाढून देशाचा व्यवहारतोल प्रतिकूल बनण्याची परिस्थिती निर्माण होते, भाववाढीमुळे उपभोगावरील खर्च वाढून बचतीवर विपरीत परिणाम होतो, भाववाढीमुळे गुंतवणुकीचा ओघ हा अनुत्पादक मत्तांकडे वाढतो आणि भाववाढीमुळे उत्पन्न वाटपातील विषमताही वाढीस लागते. वरील सर्व नकारात्मक परिणामामुळे भाववाढ ही फार मोठा काळजीचा विषय मानला जातो. भाववाढीस रावणासारख्या अनेक डोकी असणाऱ्या राक्षसाची उपमा दिली जाते आणि तिचा प्रत्येक नकारात्मक परिणाम हा त्या राक्षसाच्या एका डोक्याचा प्रातिनिधिक स्वरूप मानले जाते. वरील सर्व बाबींचा विचार करता भाववाढ ही नियंत्रणातच ठेवावी लागते.

वरील विवेचनावरून भारतातील भाववाढ ही अलीकडील काळात नियंत्रणात राहिल्याचे चित्र समोर येते. परंतु हे चित्र येथून पुढच्या काळामध्येही असेच राहील आणि भाववाढीचा दर सहनशील पातळीस राहील हे पाहणे आणि त्या दृष्टीने प्रयत्न करणे महत्त्वाचे ठरते. याचाच एक भाग म्हणून भाववाढ नियंत्रणाच्या

**कोष्टक क्र. १ किरकोळ किंमत निर्देशांक आधारित भाववाढीचा दर (%)**

| वर्ष | ग्रामीण | शहरी | एकत्रित |
|---|---|---|---|
| आधार २०१२ = १०० | | | |
| २०१२-१३ | १०.७ | ९.१ | ९.९ |
| २०१३-१४ | ९.६ | ९.३ | ९.५ |
| २०१४-१५ | ६.१ | ५.६ | ६.० |
| २०१५-१६ | ५.५ | ४.१ | ४.९ |
| **सरासरी** | **६.४** | **५.६** | **६.०** |
| **प्रमाण विचलन** | **२.५** | **२.५** | **२.५** |
| २०१६-१७ | ५.० | ४.० | ४.५ |
| २०१७-१८ | ३.६ | ३.६ | ३.६ |
| २०१८-१९ | ३.० | ३.९ | ३.४ |
| २०१९-२० | ४.२ | ५.४ | ४.८ |
| २०२०-२१ | ६.० | ६.४ | ६.२ |
| **सरासरी** | **४.४** | **४.७** | **४.५** |
| **प्रमाण विचलन** | **१.१७** | **१.१९** | **१.१०** |

स्रोत : १. Handbook of Statistics on Indian Economy, RBI




दृष्टीने जगभर प्रभावी ठरलेली भाववाढ लक्ष्य व्यवस्था ही भारताने २०१६ मध्ये स्वीकारली आणि त्यानंतर सरलेल्या पाच वर्षांच्या कालखंडामध्ये भाववाढीच्या संदर्भात नेमके काय चित्र निर्माण झालेले आहे, हे पाहणे उचित ठरणार आहे.

याअगोदर उल्लेख केल्याप्रमाणे २०१६ नंतर आपण बदलती भाववाढ लक्ष्य व्यवस्था स्वीकारली आहे. या ठिकाणी लक्षात घ्यावयाची आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे भाववाढ नियंत्रणासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेमार्फत सध्या किरकोळ किंमत निर्देशांक आधारित भाववाढीचा दर विचारात घेतला जातो.[१०] पूर्वी घाऊक किंमत निर्देशांक आधारित भाववाढीचा दर वापरला

जात होता. सन २०१४-१५ पासून भारतीय रिझर्व्ह बँकेने घाऊक किंमत निर्देशांकाऐवजी किरकोळ किंमत निर्देशांक (एकत्रित) भाववाढीचा दर मोजण्यासाठी आणि नियंत्रणासाठी वापरण्यास सुरुवात केली. किरकोळ किंमत निर्देशांक हा ग्रामीण, शहरी आणि एकत्रित अशा तीन प्रकारांमध्ये संपूर्ण देशासाठी आणि दर महिन्यासाठी संख्याशास्त्र आणि प्रकल्प अंमलबजावणी मंत्रालयातील राष्ट्रीय संख्याशास्त्रीय कार्यालयामार्फत जानेवारी २०११ पासून तयार केला जात आहे.[११] या तीन प्रकारांपैकी एकत्रित किरकोळ किंमत निर्देशांक आधारित भाववाढीचा दर हा १ एप्रिल २०१४ पासून भारतीय रिझर्व्ह बँक भारतातील प्रमुख भाववाढीचा दर (Headline Inflation Rate) म्हणून आणि किंमत स्थिरतेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी देखरेखीमध्ये आणि धोरणात्मक आखणीमध्ये वापरते. किरकोळ किंमत निर्देशांक हा सर्वसाधारण लोकसंख्येमार्फत उपभोगल्या जाणाऱ्या वस्तू आणि सेवांच्या किमतीतील बदल मोजण्याचे काम करतो आणि त्यामुळे तो भाववाढीचा सर्वसाधारण लोकसंख्येवर होणारा परिणाम मोजण्यासाठी अचूक मापदंड ठरतो. त्या अनुषंगाने भारतीय रिझर्व्ह बँकेमार्फत २०१४-१५ च्या सुरुवातीपासूनच घाऊक किंमत निर्देशांकाऐवजी नवीन किरकोळ किंमत निर्देशांक भाववाढीचे मोजमाप करण्यासाठी वापरण्याची कार्यवाही करण्यात आल्याचे निदर्शनास येते.

एकंदरीत किरकोळ किंमत निर्देशांकाचा भाववाढीचा दर मोजण्यासाठी वापर, चलनविषयक धोरण समितीची स्थापना आणि भाववाढ लक्ष्य व्यवस्थेचा स्वीकार या तीनही घटना भारताच्या भाववाढ नियंत्रण धोरणातील तीन प्रमुख बदल मानता येतील. महत्त्वाचे म्हणजे हे तीनही बदल, आंतरराष्ट्रीय पातळीवर या बाबतीत दिसून येणारी एकवाक्यता आणि इतर देशांतील प्रघात यांच्याशी सुसंगत अशी पावले भारताने उचलल्याचे प्रतीक मानावे लागतील.

भाववाढ लक्ष्य व्यवस्था स्वीकारून मार्च २०२१ मध्ये पाच वर्षे पूर्ण झाल्यानंतर या कालखंडातील किरकोळ किंमत निर्देशांक आधारित भाववाढीचा दर हा बऱ्यापैकी लक्ष्य पातळीच्या जवळपास राहिलेला दिसून येतो. त्याचप्रमाणे ही व्यवस्था स्वीकारण्यापूर्वीच्या चार वर्षांच्या कालखंडातील भाववाढीच्या दराशी तुलना करताही हा दर बराचसा कमी राहिल्याचे निदर्शनास येते. याबाबतीतील आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे, भाववाढ लक्ष्य व्यवस्था स्वीकारल्यानंतरच्या पाच वर्षांच्या कालखंडामध्ये (२०१६-१७ ते २०२०-२१) भाववाढीच्या दरातील चढउतार बऱ्याचअंशी कमी झाल्याचे प्रमाण विचलनाच्या मूल्यावरून (Standard Deviation Value) स्पष्ट होते. किरकोळ किंमत निर्देशांक (एकत्रित) आधारित भाववाढीच्या दरातील प्रमाण विचलन हे २०१२-१३ ते २०१५-१६ या कालखंडामध्ये २.५ होते ते २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षांच्या काळामध्ये १.१० इतके कमी झाल्याचे पुढील कोष्टकातील आकडेवारीवरून स्पष्ट होते.

भारताने भाववाढ नियंत्रणाच्या बाबतीत दर्शविलेल्या कामगिरीची जेव्हा आपण भाववाढ लक्ष्य व्यवस्था राबविणाऱ्या इतर देशांशी तुलना करतो तेव्हा भारत हा तुलनेने अधिक यशस्वी देश म्हणून पुढे येतो. याचप्रमाणे ज्या देशांमध्ये ही व्यवस्था राबविली जात नाही अशा देशांपेक्षाही भारताची भाववाढ नियंत्रणातील कामगिरी उजवी असल्याचे दिसून येते.[१२] याचाच परिणाम म्हणून १ एप्रिल, २०२१ ते ३१ मार्च, २०२६ या कालावधीसाठी भाववाढ दराचे लक्ष्य हे पूर्वीप्रमाणेच ४% आणि त्याचा पल्ला हा २% ते ६% असा पुन्हा स्वीकारण्याचा निर्णय भारत सरकारमार्फत घेण्यात आला असून तो भारतीय रिझर्व्ह बँकेस कळविण्यात आलेला आहे.

सारांशाने असे म्हणता येईल की, भाववाढीच्या

नियंत्रणाच्या अनुषंगाने स्वीकारण्यात आलेल्या आणि या लेखामध्ये मांडण्यात आलेल्या महत्त्वाच्या बदलांमुळे आणि त्यांचा परिणाम म्हणून भाववाढ नियंत्रणामध्ये साध्य झालेले यश, यामुळे भारत हा एक आर्थिक स्थिरता प्रस्थापित करण्यामध्ये यशस्वी ठरलेला देश म्हणून पुढे येत आहे.

**संदर्भ -**


1. https://www.rbi.org.in/scripts/Publications View.aspx?id-17415 - Date : 20/09/21
2. Saakshi Mahajan, Souvik Kumar Saha and Charan Singh (February 2014). "Inflation Targeting in India", WORKING PAPER NO : 449, Indian Institute of Management, Bangalore
3. Saakshi Mahajan, Souvik Kumar Saha and Charan Singh (February 2014); "Inflation Targeting in India', WORKING PAPER NO : 449, Indian Institute of Management, Bangalore
4. Rajadhyaksha, Niranjan (June 10, 2008): "Inflation : A short history", posted at Cafeeconomics @livemint.com
5. Dr. P. Arunachalam and Dr. K.C. Sankaranarayanan (November, 1998) : "Liberalization and inflation in India", Yojana, Vol. 42, No. 11. p. 7.
6. Reserve Bank of India (2003) : "Report on Currency and Finance", 2001-02, RBI, Mumbai, V-10.
7. Reserve Bank of India (2005) : "Report on Currency and Finance", 2003-04, RBI, Mumbai, pp. 134-135.
8. Government of India (2005): "Economic Survey", 2004-05, Government of India, New Delhi, p. 87.
9. Rangrajan, C. (June 20, 2006) : Inflation not a worry : Rangarajan', Economic Times,
10. https://www.rbi.org.in-Date: 20/09/21
11. https://mospi.gov.in/web/cpi-Date: 20/09/21
12. Santosh Kumar Das (March 31, 2021) : "Inflation Targeting has been a Success", https://www.thehindubusinessline.com/opinion/


◆

## निवेदन

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सर्व आजीव सदस्यांना व अर्थसंवाद लेखकांना कळविण्यात येते की, कार्यकारिणीच्या ठरावानुसार दि. १ एप्रिल २०२० पासून अर्थसंवाद हा '**तज्ज्ञ परिक्षित नियतकालीक**' करण्यात आलेला आहे. त्यामुळे यापुढील काळात अर्थसंवादचे लेख हे तज्ज्ञांकडून परिक्षण करुन घेऊन, गरजेनुरूप त्यामध्ये लेखकांकडून योग्य त्या सुधारणा करुन घेऊनच अर्थसंवादमध्ये प्रसिद्ध केले जातील. युजीसीचे बदलते धोरण आणि गुणवत्ता वाढीच्या अनुषंगाने सदर हितावह बदल अर्थसंवादमध्ये करण्यात आलेला आहे, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# कोविड - १९ चा भारतीय कृषी व्यवस्थेवर होणारा परिणाम आणि कृषी व्यवस्थेला सावरण्यासाठी व्यूहरचनात्मक उपाय योजना


**सुरेश श्रावण पाटील †**
**नितीन प्रकाश जैन ††**


**प्रस्तावना -**

चीनच्या वुहान शहरातून निघालेला कोरोना विषाणू आजमितीस संपूर्ण जगात पसरला असून साथीचा रोग बनला आहे. आजमितीस अमेरिकेत ३६. ५४ दशलक्ष, भारतात ३२.२५ दशलक्ष तर ब्राझीलमध्ये २०.३६ दशलक्ष संक्रमित रुग्णांची नोंद झालेली आहे.[१] भारतातील रुग्ण संख्या वाढत असल्याने २०२०-२१ आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत देशांतर्गत ढोबळ उत्पादनात २३.९% घट झाली असून २०२१ आर्थिक वर्षात सकल देशांतर्गत उत्पादन अंदाज १२.४% वरून ११.५% पर्यंत खाली आले आहे.[२] आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये भारताची आर्थिक वाढ मंदावली आणि ७.३ % ने कमी झाली आहे.[३] यासोबत मानवी जीवनाची हानी, व्यापार प्रतिबंध इ. सर्व धक्के नि:संशयपणे कृषी यंत्रणेवर परिणाम करतात. पर्यायाने अर्थव्यवस्थेच्या सर्व क्षेत्रांवर याचा परिणाम होतो. यामुळे देशामधील अन्न पुरवठा साखळी खंडित होते. कोरोना महामारीसारख्या साथीच्या आजारांचे परिणाम हे सर्वत्र, दूरगामी आणि कठोर असू शकतात आणि देशाला मंदीच्या भोवऱ्यात नेऊ शकतात.[४] कोरोना विरुद्ध एक संरक्षणात्मक आणि प्रतिबंधात्मक उपाय म्हणून भारत सरकारने २५ मार्च २०२० पासून संपूर्ण देशात टाळेबंदी जाहीर केली व टप्प्याटप्प्याने वाढविण्यात आली. याचा परिणाम कृषी क्षेत्रासह एकूण अर्थव्यवस्थेवर दिसून आला.[५] २०१९-२० आर्थिक वर्षाशी तुलना केली असता २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत कृषी क्षेत्राच्या विकासदरात २.५% घट झाली व महागाई दरात २.३% वाढ नोंदविण्यात आली.[६] कामगारांचे स्थलांतर व त्यामुळे कामगारांची कमतरता याचा देखील विपरीत परिणाम नोव्हेंबर ते मार्चच्या गहू आणि डाळींच्या हंगामावर आढळून आला. हालचालींवरील निर्बंधांमुळे पुरवठा साखळी विस्कळीत झाली व शेतीसाठी आवश्यक असणारी आदाने आणि शेतीतील उत्पादनाचे वितरण यामध्ये अडथळे निर्माण झाले. सोबत नाशवंत वस्तूंच्या पुरवठ्यावर देखील या निर्बंधांचा विपरीत परिणाम


† सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभागप्रमुख, क.के.ह.आबड कला, श्री.मो.गि.लोढा वाणिज्य व श्री.पी. एच. जैन विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय, चांदवड, जि. नाशिक.
आजीव सभासद क्र. : ९४४, भ्रमणध्वनी : ९४२३१८०८९१, ई-मेल : sureshpatilsnj@gmail.com,

†† सहाय्यक प्राध्यापक, वाणिज्य विभाग, क.के.ह.आबड कला, श्री.मो.गि.लोढा वाणिज्य व श्री.पी. एच. जैन विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय, चांदवड, जि. नाशिक.
आजीव सभासद क्र. : १८४३, भ्रमणध्वनी : ९८६०१५३५९८, ई-मेल : npjain28@gmail.com

झाला.[७] देशांतर्गत असलेला गहू आणि तांदळाचा साठा साथीच्या कालावधीत असुरक्षित घटकांच्या अन्नसुरक्षेसाठी उपयोगी ठरला. दुसऱ्या बाजूला ग्राहक व्यवहार मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार मे महिन्यात सुमारे २६ टन तर जून महिन्यामध्ये सुमारे १४५३ टन अन्नधान्याचे नुकसान झाले.[८] पूर्व आणि पश्चिम राज्यांमध्ये चक्रीवादळ आणि पूर यांसारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे विनाश आणखी वाढला. शेतकऱ्यांचे पेरणी, कापणी व विपणन कार्य प्रभावित झाले.[९] त्याच वेळेला भारत सरकारने खाजगी व्यापाराला अनुमती देण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समिती कायद्यात सुधारणा, कंत्राटी शेतीस प्रोत्साहन देण्यासाठी किंमत आश्वासनावरील करार आणि जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ मध्ये दुरुस्ती करणे या अध्यादेशाची घोषणा केली.[१०] कोविड १९ महामारीने भारतीय कृषी व्यवस्थेतील असुरक्षितता, भविष्यातील धोके सहन करण्याची अलवचिक क्षमता व असमतोलपणा याचा पर्दाफाश केला आहे. साथीच्या आजारात समाजातील मूलभूत असमानता आणि उत्पन्नातील विषमतेवर प्रकाश टाकला गेला आहे. या महामारीचा जरी विपरीत परिणाम झालेला असला, तरी उद्‌भवलेल्या परिस्थितीचा सामना करणे महत्त्वाचे आहे. कोविड -१९ चे भारतीय कृषी व्यवस्थेवरील परिणाम व संभाव्य व्यूहरचनांद्वारे अन्नसुरक्षा निर्माण करणे, अजिविका राखणे, अर्थव्यवस्थेसह कृषी क्षेत्राचे पुनरुज्जीवन करणे इ. गोष्टी प्रकाशात आणण्याचे सदर शोधनिबंधाचे उद्दिष्ट आहे.

**भारतीय कृषी क्षेत्राच्या उत्पादन विपणन आणि उपभोग या घटकावर कोविड-१९ चा परिणाम:**

कोरोना महामारीच्या संकटाने निर्माण केलेली अनिश्चितता, आंतरराज्य हालचालींवर निर्बंध व वाहतुकीची अनुपस्थिती या कारणांमुळे अन्नपुरवठा साखळी विस्कळीत झाली आणि खाद्यपदार्थांच्या किंमती वाढल्या. देशात टाळेबंदी जाहीर झाल्यानंतर दुसऱ्याच महिन्यात डाळी, गव्हाचे पीठ व दुधाच्या घाऊक आणि किरकोळ दरात १ ते ५ % वाढ झाली होती. शासनाने आयातीवरील निर्बंध कमी केल्यामुळे व अन्नधान्याचे मोफत वितरण केल्यामुळे खाद्यतेल, तांदूळ आणि गहू यांचे दर ४-९ % कमी झाले होते. भाजीपाल्याच्या किमती ७७-७८% आठवड्याला तर महिन्याला ११४-११७% ने वाढल्या होत्या. मे महिन्यात बाजार सुधारणांमुळे आणि विक्री वाढल्यामुळे बाजारपेठांमध्ये आवक वाढली होती आणि यातूनच शेतकऱ्याला कमी झालेल्या किमतींपासून संरक्षण मिळाले होते. शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात व छोट्या शहरांमध्ये किंमतीत वाढ बघावयास मिळाली. वाढत्या किंमतीमुळे सामाजिक अशांतता वाढण्याची चिंता निर्माण झाली होती.[११] पण केंद्र सरकारने वेळीच गरीब स्थलांतरित मजूर आणि शेतकऱ्यांसाठी सामाजिक सुरक्षिततेची जाणीव आणि बाजारात सुधारणा या गोष्टी लक्षात घेऊन परिस्थितीचे योग्यरीत्या व्यवस्थापन केले. म्हणूनच आपण अद्याप किंमतवाढीच्या जवळ नाही. कोरोना प्रेरित टाळेबंदीमुळे खाद्यपदार्थांची बाजारपेठ विस्कळीत झाली आणि ग्राहकांना त्यांच्या उपभोगाच्या रचनेत बदल करणे भाग पडले. ग्राहकांनी त्यांना खरोखर काय हवे आहे याविषयी प्राथमिकता दिली. टाळेबंदीच्या दरम्यान बऱ्याच सर्वेक्षणात हे समोर आले आहे की अनेक व्यक्तींना त्यांची नोकरी गमवावी लागली किंवा त्यांचे उत्पन्न कमी झाले. गरजेनुसार अनेक ग्राहकांनी त्यांच्या उपभोग वर्तनामध्ये बदल केला. जसे की अनावश्यक वस्तूंची खरेदी न करणे, बाजारपेठांमध्ये न जाणे आणि वस्तूंची साठेबाजी टाळणे इ.[१२]

**कोरोना महामारीनंतर कृषी क्षेत्राला बळकट करण्यासाठी संभाव्य व्यूहरचनात्मक उपाययोजना-**

वरील संपूर्ण माहिती कोरोना महामारीचा कृषी क्षेत्रावर झालेला विपरीत परिणाम दर्शविते. त्या अनुषंगाने प्रस्तुत मुद्यात काही संभाव्य व्यूहरचनात्मक उपाय नमूद केलेले आहेत.

**१) असुरक्षित घटकांसाठी अन्न आणि पोषण सुरक्षा प्रदान करणे :**

टाळेबंदीमुळे अनेक लोकांना त्यांची नोकरी गमवावी लागली व त्यांचे उत्पन्न कमी झाले. पर्यायाने मागणी कमी झाली आणि एकूणच समाजातील असुरक्षित घटकांच्या अन्न व पोषण सुरक्षेविषयी गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.[१३] वेळीच उपाययोजना जर केली नाही तर असुरक्षित क्षेत्रातील घटकांच्या कार्यक्षमतेवर आजीवन परिणाम होऊ शकतात. या ठिकाणी आम्ही असे नमूद करू इच्छितो की, शासकीय आणि खाजगी माध्यमातून सामाजिक सुरक्षा जाळे निर्माण करून हस्तक्षेप केल्यास अन्नधान्याची नासाडी, घरगुती पातळीवर अन्न वाया जाण्याचे प्रमाण कमी करणे, दैनंदिन खाद्यपदार्थ तयार करण्याविषयीचे नियोजन तसेच अन्नधान्य खरेदी यादी तयार करणे याद्वारे अन्नधान्य व्यवस्थापन करता येऊ शकते, जेणेकरून अन्नाचे प्रमाण पुन्हा वाढेल व मागणीतही वाढ होईल.

**२) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्याद्वारे रोजगारात वाढ करणे :**

कोरोना महामारीच्या भीतीपोटी रोजगारासाठी स्थलांतरित झालेले अनेक मजूर आज आपापल्या गावी परतलेले आहेत अशा मजुरांचा रोजगार हमी कायद्यात समावेश करून त्यांना काम उपलब्ध करून दिल्यास या योजनेद्वारे त्यांना रोजगार मिळू शकतो व थेट त्या मजुरांच्या खात्यात योजनेद्वारे रोख रक्कम वर्ग करता येऊ शकते. तसेच पंतप्रधान किसान सन्मान योजनेद्वारे शेतकऱ्यांच्या खात्यावर रोख रक्कम वर्ग करून अडचणीच्या काळात मदत करता येऊ शकते. एकूणच शासनाने या दोन्ही योजनांवरील खर्चाच्या तरतुदीत वाढ करणे आवश्यक आहे, जेणेकरून मजुरांच्या हातात संकटसमयी गरजेपुरता पैसा उपलब्ध होऊ शकतो. यासोबत सार्वजनिक वितरण प्रणालीच्या माध्यमातून शासनाने लाभार्थ्यांसाठी अन्नधान्याचे कुपन किंवा अन्नधान्याच्या पिशव्या वाटप केल्यास त्यातून लोह आणि झिंक युक्त बाजरी, डाळी व इतर पदार्थ लाभार्थ्यांना वितरित करून पोषण सुरक्षा सुनिश्चित करता येऊ शकते.[१४]

**३) शेतमालाच्या किंमती व उत्पन्नाशी संबंधित धोक्यांचे व्यवस्थापन :**

कोरोना महामारीचा भाजीपाला वगळता अन्नाच्या किमतींवर कमी किंवा नगण्य परिणाम झाला. तथापि, खाद्यपदार्थांच्या किंमतीमधील अस्थिरतेमुळे अन्नधान्यांच्या किंमती अस्थिर होतात आणि शेतकऱ्यांसाठी धोके निर्माण होतात. शेतमालाच्या किमतींच्या जोखमीपासून शेतकऱ्यांना मुक्त करण्यासाठी सरकारने किंमत स्थिरीकरण निधी उभारण्याचा विचार केला पाहिजे. तसेच भारतातील पीक विमा साधारणपणे शेतकऱ्यांना उत्पन्नाच्या धोक्याप्रति संरक्षण प्रदान करतो, पण या महामारीच्या कालावधीत पीक विमा योजनेद्वारे उत्पन्नासोबत किंमत संरक्षण जर शेतकऱ्याला प्रदान केले गेले तर शेतकरी पूर्वनिर्धारित किमतींवर प्रमाणित वस्तूंचे खरेदी विक्री करार करू शकतो, जेणेकरून शेतकऱ्याला भविष्यकालीन व्यापार संधींचा देखील फायदा घेता येऊ शकेल.[१५] मात्र, यासाठी शासनाने पीक विमा योजनेत सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. यामध्ये उत्पन्न सह किंमतीसाठीही सुरक्षा कवच प्रदान केले जाईल.

**४) प्राथमिक ते दुय्यम शेतीकडे लक्ष केंद्रित करणे:**

राष्ट्रीय टाळेबंदीमुळे कृषी कामगार बाजारपेठ विस्कळीत झाले असून एका सर्वेक्षणानुसार ४५% स्थलांतरित मजूर आपापल्या घरी परतले आहेत. शेती क्षेत्राला अधिक सक्षम करण्यासाठी संरचनामधील कुमकुवतपणाकडे लक्ष दिले पाहिजे. शेतीमधील प्राथमिक उत्पादनास महत्त्व प्रदान करणाऱ्या प्रक्रिया व इतर उद्योगांना अधिक प्रोत्साहन दिले गेले पाहिजे. कारण, या उद्योगांसाठी लागणारा कच्चा माल हा प्राथमिक शेत पिकांमधून, उप उत्पादनांतून व शेतीतील कचरा यामधून मिळतो. उदा. कपाशीच्या देठापासून

कागद लगदा व हार्ड बोर्ड तयार करणे.[१६] शेतीच्या दुय्यम उत्पादनांवर वेगवान संशोधन करण्याची तातडीने आवश्यकता आहे. फळांवर आधारित आइस्क्रीमचा विकास, बांबू किंवा लाकडी कचऱ्याचे रूपांतर सजावटीच्या साहित्यामध्ये करणे, गायीच्या दुधापासून मिठाई तयार करणे, फळांच्या सोललेल्या कचऱ्यापासून पेक्टीन तयार करणे, नैसर्गिक तंतू आणि बटाट्याच्या वापरापासून जैव प्लास्टिक तयार करणे व बायो इथेनॉल तयार करणे, हर्बल औषधी, सौंदर्यप्रसाधने आणि खाद्यपदार्थांच्या उद्योगांना कच्चा माल पुरवणाऱ्या औषधी व सुगंधी वनस्पतींच्या कापणी नंतरच्या तंत्रज्ञानातील नवीन कल्पना निर्यात क्षमता वाढवू शकतात आणि अधिकाधिक रोजगार निर्माण करू शकतात.

**५) पारिवारिक शेती :**

कृषी क्षेत्राला बळकटी देण्याच्या रणनीती तयार करताना आपण सातत्यपूर्ण शेती याकडे लक्ष दिले पाहिजे. शाश्वत अन्न उत्पादनाच्या निर्मितीसाठी कौटुंबिक शेती यापेक्षा अधिक जवळचा पर्याय नाही. कौटुंबिक शेतीमध्ये शेतकरी केवळ अन्न तयार करत नाहीत तर जैवविविधता वाचवतात. पौष्टिक आणि स्थानिक खाद्यपदार्थांचे उत्पादन करतात. सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय आव्हानांना तोंड देण्यासाठी नवीन रणनीती विकसित करतात आणि नवकल्पना विकसित करतात. जागतिक अन्नप्रणालीत १/३ अन्न वाया जाते. यावर उपाययोजना म्हणून संयुक्त राष्ट्र संघाचे जागतिक अन्न व शेती महामंडळ कौटुंबिक शेती करणाऱ्या शेतकऱ्याला पाठबळ मिळावे म्हणून सकारात्मक धोरण सुचविते.[१७]

**६) सामूहिक शेती :**

उत्पादकता आणि नफा वाढविण्यासाठी दुग्ध सहकारी संस्थांसारख्या यशस्वी प्रकरणांवर पीक घेणाऱ्या शेतकऱ्यांनी अधिक लक्ष दिले पाहिजे. टाळेबंदीच्या कालावधीत दुधाच्या किमतींवर विपरीत परिणाम झाला नाही.[१८] दुग्ध सहकारी संस्थांच्या खरेदी, प्रक्रिया आणि वितरण प्रणालीने बाह्य धक्क्याला प्रतिकार केला. एकंदर सहकारी किंवा शेतकरी उत्पादक संस्था (एफपीओ) किंवा शेतकरी उत्पादक कंपनी (एफपीसी) म्हणून पीक उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांनी एकत्र येऊन आंतरराष्ट्रीय अन्न प्रणालीमध्ये काम केले पाहिजे. एकत्रीकरणाद्वारे मोठ्या प्रमाणात अर्थव्यवस्था सुनिश्चित करता येतील (आदाने आणि प्रदाने). जमीन सुधारणा व कंत्राटी शेती यामध्ये वस्तू व सेवा कायद्यातील 'सहकारी संघराज्य' तत्त्वाप्रमाणे केंद्र सरकारकडून सुधारणा आवश्यक आहेत. या सुधारणांद्वारे कृषी क्षेत्रातील उत्पादन आणि विपणन कार्याशी निगडित असलेले धोके कमी करता येतील.

**७) कृषी क्षेत्राच्या संशोधन आणि विकासात गुंतवणूक करणे :**

२०२०-२१ च्या पहिल्या तिमाहीत भारतीय अर्थव्यवस्था २३.९ % घसरली असताना कृषी क्षेत्र हे एकमेव क्षेत्र असे होते की, ज्यामध्ये ३.४ % इतकी सकारात्मक वाढ नोंदविण्यात आली.[१९] कोरोना महामारीच्या कालावधीत कृषी क्षेत्रात उत्पादन व विपणन संबंधित अडचणी असताना देखील विकासाचे इंजीन कृषी क्षेत्र वेगवान ठेवू शकते, हे निदर्शनास आले आहे. नि:संशयपणे सरकारी क्षेत्रात सोबत खासगी क्षेत्राचा समावेश केल्यास गुंतवणुकीचा प्रवाह वाढतो तसेच कार्यप्रणालीत कार्यक्षमता वाढते. म्हणून कृषी संशोधन विकास, विमा, वित्त, यांत्रिकीकरण, साठवणुकीसाठी शीतगृहे, दळणवळण, तंत्रज्ञान, ई-खरेदी-विक्री या क्षेत्रात खासगी व सरकारी गुंतवणुकीला प्राधान्य दिले पाहिजे.

**८) राखीव साठा :**

राखीव किंवा जादा साठा केंद्र सरकारचा कमाई करण्याचा महत्त्वाचा संभाव्य स्रोत असू शकतो. सद्य:स्थितीत भारतीय खाद्य महामंडळाकडे (एफ सी आय) असलेला राखीव साठा निकषांपेक्षा दुप्पट प्रमाणात आहे आणि त्याची किंमत किमान १,५०,००० कोटी

रुपये आहे.[२०] कमाईव्यतिरिक्त जास्तीचे उत्पन्न मिळविणे हे देखभाल आणि दळणवळण यावर होणारा खर्च कमी करू शकते. यातून होणारी बचत ग्रामीण कृषी उद्योगांना चालना देण्यासाठी, त्यांची क्षमता वाढविण्यासाठी व दुष्काळ निवारण करण्यासाठी खर्च केली जाऊ शकते. अन्नधान्याचा अपव्यय टाळण्यासाठी वैज्ञानिक साठवणूक पद्धतींचा अवलंब करणे काळाची गरज आहे.

**९) विभिन्न खरेदी आणि किंमत धोरण :**

या साथीच्या कालावधीमध्ये दळणवळण, बाजारपेठा, साठवणूक इ. मध्ये व्यत्यय आला आहे. सरकार कृषी उत्पादनाच्या खरेदी आणि किंमतीबाबत विशेषतः गहू आणि तांदूळ ज्याचा वापर लाखो लोक करतात याबाबतीत विभिन्न रणनीती निवडू शकते. कारण, खरेदी आणि किंमत हे दोन्ही घटक साठवणुकीच्या खर्चावर अवलंबून असतात.[२१] खरेदी आणि किंमतीच्या बाबतीत या विभिन्न रणनीतीचा वापर केल्यामुळे शेतकरी असमाधानकारक किमतींना वस्तूंची विक्री करण्यापेक्षा वैयक्तिक पातळीवर शेतमाल साठवणुकीसाठी प्रोत्साहित होईल.

**१०) कृषी वित्तीय सुधारणा :**

कृषी क्षेत्राचे पुनरुज्जीवन करण्यासाठी शेतकऱ्याला खासकरून लहान आणि सीमांत जमीनधारकांना अल्पदरात कर्ज उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. कृषी कर्जाची व परतफेडीच्या वेळापत्रकाची पुनर्रचना करणे, कर्ज स्थगितीच्या कालावधीत व्याज अनुदान देणे इत्यादी सुधारणा राबविणे गरजेचे आहे जेणेकरून गरिबांचे जीवनमान व हिताचे रक्षण करता येईल.

**११) क्षेत्रीय आणि जागतिक आंतर संस्थात्मक भागीदारी :**

समाजातील दुर्बल आणि सुरक्षित घटकांना बळकट करण्यासाठी जागतिक पातळीवर जी सतत विकासाची उद्दिष्टे निर्धारित (एस डी जी - २०३०) करण्यात आली आहे. त्यातील उद्दिष्ट १७ मध्ये आंतर संस्थात्मक भागीदारी अपरिहार्य असल्याचे नमूद करण्यात आले आहे. भागधारकांची भागीदारी सामाजिक माध्यमांद्वारे व संप्रेषण तंत्रज्ञानाद्वारे जागरूकता निर्माण करून माहिती आणि ज्ञान यातील अंतर दूर करण्यास मदत करते. नागरिकांनी महामारीच्या कालावधीत आवश्यक वस्तू घाबरून खरेदी करणे व जमा न करणे, बाजारपेठांमधील अस्वच्छता दूर करणे, बाजारपेठेतील कामकाज सुरक्षित अंतर राखून पार पाडणे व कृषी उत्पन्न बाजार समित्यांची स्वच्छता करणे इ. शिक्षणाची कल्पना या भागधारकांच्या भागीदारी या उपाय योजनेद्वारे साध्य करता येऊ शकते.[२२]

**निष्कर्ष :**

कोविड-१९ या आघाडीच्या संकटाने भारतीय व जागतिक कृषी यंत्रणेवर विनाश आणला आहे. जागतिक अन्नसुरक्षा संकट सोडविण्यासाठी या महामारीचा विकसनशील देशांच्या कृषी व्यवस्थेवरील परिणाम समजून घेणे आवश्यक आहे. म्यानमार, रशिया, कझाकिस्तान व व्हिएतनाम या अन्नधान्य निर्यात करणाऱ्या अनेक देशांनी बंदी, कोटा आणि परवाना यांसारखे अन्नधान्य निर्बंध घातले आहेत. यामुळे जागतिक अन्नपुरवठा विस्कळीत झाला आहे. सदर अन्नपुरवठा वितरणाच्या साखळीमधील अडथळ्यामुळे अन्नधान्य वाया जाते आणि किंमतींमध्ये अस्थिरता वाढते. त्याचा परिणाम पोषक अन्न सुरक्षेवर होतो. उदा. महामारीच्या कालावधीत चुकीचा समज पसरल्यामुळे बांगला देशामध्ये मोठ्या प्रमाणात नाशवंत वस्तू जसे की दूध, भाजीपाला इ. अन्न वाया गेले. तसेच प्रथिनांचा स्रोत असलेले मासे व कोंबडीचे मांस या पदार्थांचे सेवनही कमी झाले. भारतात सुद्धा कुक्कुटपालन व माशांच्या वापरामध्ये मोठ्या प्रमाणात घट झाली आहे. त्याच कारणामुळे पोल्ट्री उत्पादकांचे उत्पन्न मोठ्या प्रमाणात घटले आहे.[२३]

इथिओपियामधील टाळेबंदीच्या कालावधीत दारिद्र्यदरात ९% वाढ झाली आहे आणि ३८% आकस्मिक कामगारांचे उत्पन्न कमी झाले आहे, तर

९०% लोकांनी परवडणारे अन्न ही समस्या मोठा चिंतेचा विषय असल्याचे सांगितले.

केनियामध्ये पिकांच्या उत्पादकतेत सुमारे १५% घट झाली आहे. कारण, विस्तार सेवांमध्ये व्यत्यय आणि भाजीपाला व मुख्य भांडवलाची मागणी वाढल्याने साठेबाजी वाढली आहे. केनियामधील दारिद्र्य दर नजीकच्या काळात १३% नी वाढण्याची शक्यता आहे. कोरोना महामारीचा माली देशावरील परिणाम अत्यंत वाईट आहे. तेथील १७६६ कुटुंबाच्या सर्वेक्षणात ७०% कुटुंबांमध्ये उपासमारीची नोंद झाली आहे. साधारणता २५% ते २८% कुटुंबांमध्ये सरासरी किंमती स्थिर असताना देखील मूलभूत खाद्यपदार्थ खरेदी न करू शकल्याची नोंद झाली आहे.[२४]

भारतातील सुरुवातीच्या तपासात असे दिसून आले आहे की येण्या-जाण्यावरील निर्बंध, वाहतुकीची समस्या, कामगारांचे स्थलांतर इ. निर्बंधांमुळे देशांतर्गत पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे. ज्यामुळे डाळ, गहू, पीठ, दूध आणि भाज्यांच्या व काही वस्तूंच्या घाऊक व किरकोळ किंमती वाढल्या आहेत. यावर पर्याय म्हणून शासनाकडे उपलब्ध असणारा अन्नधान्याचा बफर स्टॉक व मागील हंगामातून उपलब्ध झालेली अन्नधान्यही अपुरे ठरल्याचे दिसून येते. कारण ३/४ ग्राहकांनी जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीत वाढ नोंदविली आहे. थायलंड आणि व्हिएतनाम हे तांदळाची निर्यात करणारे दोन मुख्य देश असून तेथील व्यापार चक्रातील अडथळ्यांमुळे या देशांनी जागतिक बाजारपेठेत किंमत वाढ केली आहे.[२५] याचा विपरीत परिणाम या देशांवर अन्नाच्या आयातीसाठी अवलंबून राहणाऱ्या आफ्रिकन देशांवर मोठ्या प्रमाणात झालेला आहे.

अलीकडच्या वर्षांत भारत स्वयंपूर्ण आणि अन्नधान्य निर्यातदार म्हणून उदयास आला असला, तरी कोरोना महामारीच्या लाटांमुळे देशांतर्गत कृषी यंत्रणेवर खासकरून उत्पादन, विपणन आणि उपभोग या तीन घटकांवर विपरीत परिणाम झाला आहे. आर्थिक आणि कृषी क्षेत्रात वाढता विकास दर असणाऱ्या अनेक प्रांतांमध्ये कामगारांच्या स्थलांतरामुळे कामगारांच्या कमतरतेचा सामना करावा लागला आहे, तर कमी वाढ असलेल्या राज्यांना उत्पादनासाठी आवश्यक असणाऱ्या आदानांचा तुटवडा व कामकाजाच्या माध्यमातून संसर्ग वाढण्याचा धोका निर्माण झाला आहे. विशेषत: ओरिसासारख्या कमी स्रोत असलेल्या राज्यांमध्ये दळणवळणातील अडथळ्यांमुळे व मर्यादित विक्री केंद्रे यामुळे नाशवंत वस्तूंच्या बाबतीत अनैच्छिक विक्री दिसून आली. अनाशवंत वस्तूंची तुलना नाशवंत वस्तूशी केली असता तोटा कमी झालेला असला, तरी अनाशवंत वस्तूंच्या विक्रीमध्ये घट झाली आहे. ग्राहकांच्या प्रत्यक्ष उपभोग खर्च वर्तनावर आधारीत केलेल्या लाल, केशरी आणि हिरव्या क्षेत्रांमध्ये कोरोना महामारीचा ग्राहकांच्या उपभोग वर्तनावर कमी-अधिक प्रमाणात एकसारखाच परिणाम झालेला दिसून येतो. लाल, केसरी आणि हिरव्या क्षेत्रामधील अनुक्रमे ४५.७%, ५१.७% व ३३.७% ग्राहकांनी बाजारपेठांमध्ये प्रवेश नोंदविलेला नाही, तर ७२.७%, ७९.४ व ७३.३% ग्राहकांनी अन्नधान्यांच्या किंमतीत वाढ नोंदवली आहे. सर्वच क्षेत्रांमधल्या ९०% पेक्षा अधिक ग्राहकांनी त्यांची खरेदी करण्याची पद्धत बदलली आहे.[२६] कोरोना महामारीचे सातत्य जागतिक अन्नप्रणालीला धोका निर्माण करत आहे. त्यामुळे विविध राज्यांची भूमिका अधिक समर्पक बनत आहे. कृषी व्यवस्थेशी निगडित कोट्यवधी लोकांच्या जीवनमानाचे रक्षण करण्यासाठी राज्यांनी सामाजिक सुरक्षा जाळे निर्माण करण्यावर त्वरित खर्च वाढवावा आणि अल्प व मध्यम मुदतीची रणनीती स्वीकारली पाहिजे. महामारीनंतरच्या कालावधीत अर्थव्यवस्थेला बळकटी प्रदान करण्यासाठी राखीव साठा कमी करून उत्पन्न वाढविण्यास व कृषि क्षेत्राला वाढीव वित्तीय सहाय्य प्रदान करण्यास प्राधान्य दिले गेले पाहिजे.

**संदर्भ सूची -**

१. वेबसाईट - जागतिक आरोग्य संघटना, https://covid19.who.int- १७ ऑगस्ट, २०२१.

२. 'द वायर' इंग्रजी मिडिया ऑर्गनायझेशन, २० सप्टेंबर, २०२०

३. अर्पण राय, इंडियन इकॉनॉमिक ग्रोथ, हिंदुस्थान टाइम्स, २५ जून, २०२१

४. अशोक आणि डेविड, कंपाऊंड नॅच्यरल अँड ह्यूमन डिझास्टर, एल्सवेरे जर्नल व्हॉल्यूम ७५४, फेब्रुवारी १, २०२१

५. वेबसाईट - आरोग्य आणि परिवार कल्याण मंत्रालय भारत सरकार. https://www.mohfw. gov.in - १० ऑगस्ट, २०२१.

६. जी डी पी ग्रोथ, द इकॉनॉमिक टाइम्स, इ पेपर, २ सप्टेंबर, २०२०

७. एस. महेंद्र देव, ब्लॉग - इम्पॅक्ट ऑन ॲग्रीकल्चर, फूड सिक्युरिटी, वेब - इंटरनॅशनल फूड पॉलिसी रिसर्च इन्स्टिट्यूट, ८ एप्रिल, २०२०.

८. कुमार विक्रम, वेस्टेज ऑफ फूड ग्रेन अँड एफ. सी. आय., दि न्यू इंडियन एक्सप्रेस, ५ ऑक्टोबर, २०२०

९. प्रमिथा फूड अँड ॲग्रीकल्चर ऑर्गनायझेशन ऑफ युनायटेड नॅशन, लोकल फूड सिस्टिम प्रोग्रॅम, २२ एप्रिल, २०२०.

१०. वेबसाईट - प्रेस इन्फर्मेशन ब्युरो भारत सरकार, प्रेस रिलीज, https://pib.gov.in/PressReleasePage.aspx?PRID=1629033 - ३ जून, २०२०

११. ख्रिस्तोफर, ॲक्शन नाऊ कर्ब फूड सिस्टम, नेचर फूड जर्नल, ७ मे, २०२०.

१२. आचार्य आणि आढाव, पॅनडेमिक लेड फूड क्रायसिस, रिसर्च गेट, सप्टेंबर २०२०

१३. लुडोविका आणि इतर, केअरिंग मोअर अबाउट फूड, एल्सवेअर जर्नल, २४ सप्टेंबर २०२०

१४. ओमप्रकाश गुप्ता आणि इतर, व्हीट अँड ग्रेन बायोफोर्टीफिकेशन, पान ३०९, १९ मे २०२०

१५. दर्शनाबेन, कोरिलेटे अँड इम्पॅक्ट ऑफ क्रॉप इन्शुरन्स, ॲग्रिकल्चरल फायनान्स रिव्ह्यू जर्नल ८१, मार्च २०२१.

१६. श्री. चेनागप्पा, सेकंडरी ॲग्रीकल्चर, इंडियन जर्नल ऑफ ॲग्रीकल्चर इकॉनॉमिक्स, २०१३

१७. वेबसाईट - फूड अँड ॲग्रीकल्चर ऑर्गनायझेशन ऑफ युनायटेड नेशन http://www.fao.org/family-farming-decade/communication-toolkit/en/-१ ऑगस्ट २०२१.

१८. आचार्य आणि आढाव, उपरोक्त

१९. जीडीपी ग्रोथ, उपरोक्त

२०. श्री. गुलाटी, ऑफलोडींग एक्सेस फूड, दि इंडियन एक्सप्रेस वर्तमानपत्र, २२ जून २०२०

२१. सेवाराम आणि इतर, पॉलिसी इंपेरेटिव्हस फॉर व्हीट प्रोक्युअरमेन्ट, रिसर्च गेट, जुलै २०२०

२२. एस. रामदासा, डिसीफेरींग द इम्पॅक्ट ऑफ कोविड, करंट रिसर्च इन एन्व्हायर्नमेंटल सस्टेनेबिलिटी -२, डिसेंबर २०२०

२३. वेबसाईट - ग्लोबल ट्रेड अलर्ट. https://www.globaltradealert.org - ७ ऑगस्ट २०२१.

२४. वेबसाईट - रॅपिड कंट्री असेसमेंट https://research.wur.nl/en/publications/rapid-country-assessment-kenya-the-impact-of-covid-19-on-the-food - ७ ऑगस्ट २०२१.

२५. मझहर आणि इतर, कोविड १९ आऊटब्रेक, एल्सवेअर जर्नल १३. ५ जुलै, २०२०

२६. कमलेश कुमार आणि इतर, इम्पॅक्ट ऑफ कोविड- १९, सेज जर्नल, जानेवारी २०२१

◆

# अण्णा भाऊ साठे यांचे आर्थिक कल्याणाचे साहित्यिक विचार

**कारभारी भालचंद्र काशिनाथ** †

**प्रस्तावना :**

अण्णा भाऊ साठे यांचा जन्म विषमतेवर आधारित जातिव्यवस्थेतील मांग जातीत झाला. त्यांना शिक्षणाची कुठलीही परंपरा नव्हती. परंतु मांग जातीबाबत असलेल्याला समाजाच्या दृष्टिकोनामुळे त्यांना गरिबी, दारिद्र्य व मागासलेपणाचा वारसा लाभला होता जो त्यांच्या साहित्यामध्ये परावर्तित झाला आहे. १९३६ ते १९६९ पर्यंत कार्ल मार्क्स यांच्या आर्थिक विचारधारेचा प्रभाव त्यांच्या साहित्यात जाणवतो. मुंबई येथे झालेल्या गिरणी कामगारांच्या संपात अण्णा भाऊ साठे यांनी सहभाग घेतला व भांडवलशाही व्यवस्थेचा जाहीर निषेध केला. शेतकरी व कामगारांचे हक्क, असमान संपत्ती वाटप, असंघटित घटकांचे शोषण व मागास समाजाची आर्थिक दुर्बलता अशा अनेक सामाजिक आर्थिक समस्यांविरुद्ध त्यांनी लेखन केले आहे.

**अण्णा भाऊ साठे यांचा परिचय :**

अण्णा भाऊ साठे, मूळ नाव तुकाराम भाऊराव साठे यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील वाळवा तालक्यातील वाटेगाव या गावखेड्यात १ ऑगस्ट १९२० रोजी झाला. वाटेगाव येथे त्यांच्याकडे असलेली शेतजमीन सावकाराने हस्तगत केल्याने पोट भरण्यासाठी त्यांनी मुंबईला स्थलांतर केले. अण्णा भाऊ साठे यांचे सुरुवातीचे आयुष्य वारणेच्या खोऱ्यात गेले व नंतरचे मुंबई येथील लेबर कॅम्पमध्ये. या दोन्ही ठिकाणी त्यांनी आर्थिक व सामाजिकदृष्ट्या वंचित समाजाची आणि कामगारांची विवंचना प्रत्यक्ष अनुभवली व तीच विवंचना आपल्या साहित्यात मांडण्याचे काम केले. आवर्जून नोंद करण्यासारखी गोष्ट म्हणजे अण्णा भाऊ साठे एका विशिष्ट पीडित समाजाचे नव्हते तर जगातील सर्व पिडितांची विवंचना समाजापुढे मांडणारे साहित्यिक होते (अर्जुन डांगळे १९९८).

अण्णाभाऊ ज्या लेबर कॅम्पमध्ये राहात होते त्या वस्तीमध्ये आंबेडकरी व कम्युनिस्ट चळवळीचा प्रभाव होता, त्या अनुषंगाने त्यांच्यावरही आंबेडकरी व कम्युनिस्ट चळवळींच्या विचारांचा प्रभाव झाला व तो त्यांच्या साहित्यात जाणवतो. याच ठिकाणी त्यांच्या साहित्यिक जीवनाचा आलेख उंचावला. अण्णा भाऊ साठे यांनी ३५ कादंबऱ्या, १३ कथासंग्रह, १४ लोकनाट्ये / तमाशा, १० पोवाडे, १ शाहिरी, १ प्रवासवर्णन आणि ३ नाटके अशी विविधतेने नटलेली

† सहाय्यक प्राध्यापक अकबर पीरभॉय कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्स, मुंबई
आजीव सदस्य क्र. : १७९३, भ्रमणध्वनी : ७४०००४७६५९, ई-मेल : bhalchandra.karbharia@apcollege.edu.in

लेखनसंपदा निर्माण केली आहे. आण्णाभाऊ साठे यांच्या एकूण ७ कादंबऱ्यांवर मराठी चित्रपट तयार झाले आहेत (लोकशाहीर अण्णा भाऊ साठे निवडक वाङ्मय १९९८).

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनपर लेखात 'फकिरा' व 'वारणेच्या खोऱ्यात' या दोन कादंबऱ्यांचा संदर्भ घेऊन अण्णा भाऊ साठे यांचे आर्थिक विचार मांडण्यात आले आहेत. 'फकिरा' या कादंबरीस १९६१ मध्ये महाराष्ट्र सरकारचा 'उत्कृष्ट कादंबरी पुरस्कार' मिळाला आहे. या दोन्ही कादंबऱ्या ब्रिटिशकालीन व्यवस्थेत होणारे अन्याय व बंड यांचे विश्लेषण करतात. याचबरोबर भारतातील आर्थिक असमतोल, संपत्तीचे असमान वाटप, बेरोजगारी, स्थलांतर, महामारीमधील असहाय्यता, श्रमिकांचे शोषण, प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध बंड इत्यादींचे चिकित्सक विश्लेषण करतात. अण्णा भाऊ साठे यांचे तत्कालीन व्यवस्थेबद्दल आर्थिक कल्याणाचे अनुभव व्यक्त होत असल्याने या दोन कादंबऱ्यांची निवड संशोधनासाठी केली आहे.

**भारतातील आर्थिक असमानता आणि मागासलेपणाची कारणमीमांसा :**

दलित समाज आर्थिकदृष्ट्या व सामाजिकदृष्ट्या नेहमीच दुर्लक्षित होता. आर्थिक व सामाजिक मागासलेपणासाठी जे घटक जबाबदार होते त्या घटकांचे विश्लेषण अण्णा भाऊ साठे यांनी पुढीलप्रमाणे केले आहे.

**१. प्रस्थापित समाजाकडून दुर्लक्ष :** मागास समाजात असलेली बेरोजगारी, भूकबळी यांसारख्या अनेक समस्यांकडे तत्कालीन यंत्रणा तटस्थपणे पाहात होतीच, शिवाय अक्षम्य दुर्लक्ष सुद्धा करत होती. यामुळे दलित समाज आर्थिकदृष्ट्या किती दुर्लक्षित व मागासलेला होता याबद्दल अण्णा भाऊ साठे लिहितात की, तिथं किती माणसं आहेत, याची गावाला माहिती नव्हती, ती काय खातात? याची कोणाला काळजी नव्हती, मात्र मांगवाडा त्या निवडुंगात आहे, हे सर्वांना माहीत होते. (फकिरा - ८७६). या समाजाच्या आर्थिक उन्नतीची अशा प्रकारे उपेक्षा होत राहिल्याने केवळ उपासमारीपासून बचाव करण्यासाठी या समाजाला दरोडे व लूट या मार्गांचा अवलंब करावा लागला. याचे वर्णन अण्णा भाऊ असे करतात की मांग उपाशी मरू लागले, त्यांना कोणीच धनी नव्हता. त्यांची ती उपासमार सावळा मांगाला बघवेना. त्यांनी शिगावावर करडी कमान धरली. या लुटालुटीत खोत हैराण झाला. (फकिरा - ९१०). म्हणजेच या समाजाला गुन्हे करण्यास प्रस्थापित यंत्रणाच भाग पाडीत होती. परंतु या गुन्ह्यात प्रस्थापित समाजाचे पाठबळ असूनसुद्धा कायमच संशयाच्या परीघात मागास समाजास ठेवून त्यांना गुन्हेगारी पार्श्वभूमी देण्यात आली.

अठराविश्वे दारिद्र्यात जीवन जगून सुद्धा मागास समाज सधन समाजासाठी निष्ठा बाळगून होता. याचा प्रत्यय फकिराचे वडील जेव्हा गावासाठी स्वतःचे प्राण धोक्यात टाकून जत्रा भरवण्याचा पण करतो यातून येतो. ''काय होतंय त्यांना? जगतील ती! आपण नव्हतो तेव्हाही मानसं जगतच होती की. आणि गावावर उपकार करणारा माणूस इथं जन्मला, याची पाटलाला खात्री वाटेल. विष्णुपंताला आनंद होईल.'' (फकिरा - ८८०). परंतु ही निष्ठा बाळगून सुद्धा या समाजाला गावाबाहेर व दारिद्र्यात राहण्यास भाग पाडण्यात आले.

**२. साधनसंपत्तीचे असमान व अपुरे वाटप :** हा समाज कायमच मागास का राहिला याबद्दलचे अण्णा भाऊ यांचे निरीक्षण असे की, ज्या वेळी त्यांना इनाम म्हणून जमीन दिली, त्या वेळी अवघी तीन घरं; पण आता ती पन्नास झाली. जमीन पुरत नव्हती. सनदशीर शिपाई हा शिक्का कायम होता. शेतकीची अवजारे नव्हती आणि मांग पिचत होते. (फकिरा- ८७७). म्हणजेच या समाजाला संपत्ती निर्मितीची कोणतीही साधने उपलब्ध

नव्हती. सर्व संसाधने ही ठरावीक समाजाच्या हातात एकवटलेली होती. शिवाय उपलब्ध संपत्तीवर त्यांना मालकी हक्क प्रस्थापित करण्याची मुभा नव्हती. त्यांच्याकडे ज्या तुटपुंज्या संपत्तीची मालकी होती, ती एकतर इनाम म्हणून मिळाली होती किंवा वडिलोपार्जित होती व तिचे पुढे वारसा हक्काने वाटप होत गेले. परिणामी, वाट्याला आलेली संपत्ती ही गरजेच्या मानाने तुटपुंजी ठरू लागली. शेतीसारख्या व्यवसायातसुद्धा प्रगती करणे शक्य नव्हते. कारण, शेतीसाठी लागणारी अवजारे म्हणजेच नांगर, बैलजोडी, पाणी इत्यादींसारख्या गोष्टींची उपलब्धता नव्हती. या सर्वांचा परिणाम म्हणजे हा समाज दारिद्र्याच्या गर्तेत आणखी अडकत गेला.

**३. शोषण करणारी ब्रिटिश राजवट :** ब्रिटिश राजवटीने केलेली लूट, अन्याय व फसवणूक त्यांनी 'वारणेचा वाघ'मधील सत्तूच्या (कथेचा नायक) माध्यमातून समोर आणली आहे. तसेच याच कादंबरीत सावकार व जमीनदार हा वर्ग ब्रिटिशांबरोबर एकनिष्ठ राहून मागास समाजाच्या उद्धारापासून अलिप्त राहिला हेही मांडले. सावकार व जमीनदार वर्गाने ब्रिटिशांशी संधान बांधून या समाजाला लुबाडण्याचे काम केले. सावकार, जमीनदार व ब्रिटिश राजवट यांच्याविरुद्ध बंड करण्यात सुद्धा हा समाज असमर्थ होता हेही त्यांनी मांडले. व्यवस्थेविरुद्ध बंड पुकारण्यातील हतबलता आम्ही तलवार घेऊन, भीक मागून जमात जगवली. ते ऐकून तुझं वडील हसत. खरं म्हणजे त्यांना रागच येई, पण हसून दाखवीत (फकिरा - ८९७). या वाक्यातून अण्णासाहेब स्पष्टपणे दाखवून देतात की प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध प्रचंड असंतोष असूनसुद्धा हतबलतेमुळेच या समाजाला दारिद्र्यात जीवन जगावे लागत असे व हे त्यांचे ठाम मत होते.

**४. महामारी व नैसर्गिक आपत्तीमधील अवहेलना व दुर्लक्ष :** कोरोना महामारीत ज्या पद्धतीने आर्थिकदृष्ट्या मागास समाज हा सधन समाजापेक्षा मुख्यत्वे जास्त प्रभावित झाला त्याचप्रमाणे फकिरा मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे त्या काळी दुष्काळ व महामारीच्या काळात हाच मागास समाज दुर्लक्षित व प्रभावित होता हे अण्णा भाऊ साठे यांनी दाखवून दिले आहे.

दुष्काळ व महामारी यांसारख्या संकटातून निभावून जाणे गरीब जनतेला शक्य नव्हते. कुठल्याही संकट काळात सामान्य जनतेला सरकारचा आसरा हवा असतो. परंतु तत्कालीन यंत्रणा अशा संकटकाळी आर्थिक विवंचनेत सापडलेल्या जनतेसाठी तत्परतेने कार्य करताना दिसत नव्हती. परिणामी, भूकबळीने व महामारीने लोक मरत होते. परंतु त्यांना आसरा देणारी कुठलीच यंत्रणा नव्हती. शिवाय या समाजाकडे पोट भरण्यासाठी जी काही साधने उपलब्ध होती ती या संकट काळामध्ये नष्ट झाली. उदा. पिकं, गुरं, शेळ्या इ. सुंदर प्रदेश भकास झाला (फकिरा ९५४). या वाक्यावरून अण्णा भाऊ दुष्काळातील आर्थिक विवंचना स्पष्ट करत आहेत. इंग्रज सरकार अशा आपत्तींकडे कानाडोळा करत होते. हे गाव दुष्काळाच्या दाढेत आहे, हे मी सरकारला कळवलं ; परंतु टीचभर चिट्ठीनं त्याचं उत्तर नाही. (फकिरा-९५४) यावरून अण्णाभाऊ निदर्शनास आणून देतात. एकूणच सामान्य समाजाकडे इंग्रज सरकार फक्त उत्पन्नाचा स्रोत म्हणून पाहात होते. याउलट त्यांच्याप्रति असलेले दायित्व टाळत होते. अण्णाभाऊ यांच्या मते, सरकारने दुष्काळ व महामारी यांसारख्या संकट काळात आर्थिक मागास समाजासाठी अन्नधान्य पुरवठा, कर सवलत, आरोग्य सुविधा, रोजगार संधी इत्यादी जबाबदाऱ्या पूर्ण कराव्यात व कल्याणकारी राज्याची भूमिका पार पाडावी.

५. पक्षपाती ब्रिटिश प्रशासन व समाज व्यवस्था : इंग्रज सरकारने भारतीय समाज व आर्थिक व्यवस्था मोडीत काढली होती. स्वयंपूर्ण खेडी इंग्रज सरकारवर अवलंबून राहतील अशा प्रकारची धोरणे आखली जात

होती. यामुळे दीर्घकाळात ग्रामीण समाज आपले वित्तीय अधिकार गमावून बसला होता. परिणामाची पर्वा सरकार करत नाही, हे स्पष्ट झाले आहे. मात्र परिणाम होणार! गावगाडा मंदावेल, गावचे कारभार थंडावतील, प्रांतातील मांग लोक उठवणी करतील. (फकिरा - ९१३) यावरून अण्णाभाऊ सूचित करत आहेत की इंग्रज सरकारने जी धोरणे व कायदे लागू केले होते त्यामध्ये सर्वांत जास्त उपेक्षा ही दलित समाजाची झाली होती.

याव्यतिरिक्त समाजामध्ये दुफळी निर्माण होईल याचीही छुपी खबरदारी घेत इंग्रज सरकारने कायदे तयार केले. मांग जातीतील झुंजार वृत्ती नाहीशी व्हावी, त्यांनी लाचार व्हावे, हाच त्या कायद्याचा हेतू होता. (फकिरा - ९१४). एखाद्या व्यक्तीने गुन्हा केल्यास त्या व्यक्तीशी संबंधित संपूर्ण समाजाला दोषी मानून संपूर्ण समाजालाच तडीपार करण्याचा कायदा अन्यायकारी होताच, शिवाय या कायद्यामुळे दलित समाजाला त्यांची मालकी हक्क असलेली जमीन सोडून दुसऱ्या प्रदेशात स्थलांतर करून मजुरी करावी लागत होती. यावरून त्या वेळी इंग्रज सरकारने दलित समाजाला मूळ प्रवाहापासून दूर ठेवून आर्थिक प्रगतीपासून दूर ठेवल्याचे निरीक्षण अण्णाभाऊ यांनी नोंदवले आहे.

मागास समाजाचा वापर हा उच्चवर्णीय समाज आपली आर्थिक संपन्नता वाढवून घेण्यासाठी करत होता याचेही लिखाण अण्णाभाऊ यांनी केले आहे. ते (मागास समाज) लोक खून दरोडे करतात आणि हे प्रतिष्ठित लोक आपली घर सोन्यानं भरतात. (फकिरा - ९२९). ही प्रतिष्ठित लोकं म्हणजे सावकार, जमीनदार आदी होय. आपला वैयक्तिक स्वार्थ साधण्यासाठी या लोकांनी मागास समाजाला दरोडे घालण्यास प्रवृत्त केले. परंतु हे दरोडेखोर जेव्हा पकडले गेले तेव्हा अशा गुन्ह्यांपासून स्वतः अलिप्त राहून त्यांच्याकडे दुर्लक्ष केले. परिणामी, या समाजाची ओळख गुन्हेगार अशीच राहिली.

अण्णाभाऊ आपल्या लिखाणात ब्रिटिश राजवटीमुळे आलेल्या आर्थिक दारिद्र्यावर तीव्रपणे व्यक्त होतात. जर फकिराला दौलतच हवी होती तर त्यानं तुमच्या घरावर दरोडा (गावचा पाटील) घातला असता. सर्वशक्तिमान सत्तेशी वैर बांधण्याची काय गरज होती? (फकिरा - ९९२) म्हणजेच आर्थिकदृष्ट्या मागास समाज हा एकाच वेळी सामाजिक मागासलेपणा व पक्षपाती सरकारी यंत्रणेमुळे दरिद्री व बेरोजगार होत होता. परिणामी, व्यवस्थेलाच आव्हान करण्याची प्रेरणा अण्णाभाऊ देतात.

**६. कामगारांचे शोषण :**

कामगार वर्ग स्वतःचा जीव धोक्यात टाकून मालकांसाठी मजुरी करतात, परंतु बदल्यात त्यांना अत्यंत कमी मजुरी मिळते हे 'प्रायश्चित्त' या कादंबरीत खाणकामगारांच्या वर्णनावरून अण्णाभाऊ समोर आणतात. गावाकडे असलेल्या दुष्काळी परिस्थितीमुळे हे कामगार शहराकडे स्थलांतरित होऊन आपल्या संसाराची होणारी वणवण थांबवण्याचा प्रयत्न करत असताना दिसतात. अगदी कमी वेतनावर सुद्धा ते समाधानी राहतात. एव्हाना त्यांच्या ते अंगवळणी पडले होते. परंतु या मिळणाऱ्या मजुरीने त्यांचे दारिद्र्य काही कमी झाले नाही, हे वास्तव अण्णाभाऊ या कादंबरीत मांडतात. वस्तीमध्ये सर्व प्रकारच्या जातींचे लोक एकत्र राहत होते. त्यामध्ये भिकारी, गुन्हेगार, तडीपार, कचरा वेचणारे, श्रमिक इत्यादींसारखे होते जे सर्व दारिद्र्यात अडकलेले होते. या समाजाला अनेक व्यसने आहेत ज्यामुळे कमावलेले पैसे ते व्यसनावर संपवत व परिणामी ते दारिद्र्यातच अडकून राहतात. उमा व बळी यांच्या बायकांनी (कथेतील पात्र) व्यसनामुळे आपली गरिबी कमी होत नाही हे ओळखले होते. आधुनिक समाज या वस्तीकडे अगदी तटस्थ नजरेने बघत असतो. भांडवलवादी गटाकडून नैसर्गिक साधनसंपत्तीवर केले जाणारे अतिक्रमण व विनाश या समाजात आर्थिक दरी निर्माण करत असल्याचे मत अण्णाभाऊ यांनी मांडले

आहेत.

ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसून दलित कष्टकऱ्यांच्या तळहातावर तरलेली आहे असे सांगून संपत्ती निर्माणामध्ये श्रमिकांच्या योगदानाचे त्यांनी जोरदार समर्थन केले आहे.

**सामाजिक व आर्थिक मागासलेपणाचे परिणाम :**

**१. कायमचे दारिद्र्य व मागासलेपण :** दीर्घकालीन दारिद्र्याचे समाजात जे अनिष्ट परिणाम उद्भवतात त्यापैकी एक म्हणजे भूकबळी व लूटमारी. हा समाज गुन्हेगारी प्रवृतीकडे कसा ओढला गेला याबद्दल अण्णाभाऊ लिहतात, एक दिवस नव्हे, तर दर वर्षी सुगी येईपर्यंत पावसाळ्यात दररोज त्यांना चोर बनावं लागत होतं. काहींचा सवयीनं तो धंदाच बनला होता. दारिद्र्यात वाईटाखेरीज दुसरं काय जन्मणार ? (फकिरा - ८७७).

त्यांच्या मते, परंपरेनुसार चालत आलेल्या दारिद्र्यापासून मुक्तता करून घेण्यासाठी मागास समाज हा विविध मार्गांचा अवलंब करीत होता. त्यामध्ये लूटमार व चोरी करणे, व्यवस्थेविरुद्ध बंड पुकारणे किंवा इतर धर्म व पंथांचा आश्रय घेऊन धर्म परिवर्तन करणे हे होते. 'वारणेचा वाघ' या कादंबरीत सुमीचा मुलगा केवळ दारिद्र्य व भुकेमुळे धर्मांतर करून ख्रिश्चन धर्म स्वीकारतो व इंग्रजांची चाकरी पत्करतो. या संदर्भावरून अण्णा भाऊंनी दारिद्र्याबद्दलचे भयाण वास्तव व धर्मांतरण करण्यासाठी आर्थिक मागासलेपणाचा आधार कसा घेतला जात होता, हे समोर आणले आहे.

आर्थिकदृष्ट्या मागास समाज हा पिढ्यान्पिढ्या विवंचनेत जीवन जगत होता हे अण्णाभाऊ यांच्या 'कवा आम्ही सलामत होतो? आईच्या पोटातनं भाईर आल्यापासनं - नव्हं आईच्या पोटात व्हतो तवापासनं, रक्ताचं घोट घेतोय, लढतोय.' (फकिरा) या ओळीतून समोर येते. म्हणूनच आर्थिक विवंचनेतून बाहेर येण्यासाठी आर्थिकदृष्ट्या मागास समाज विविध मार्गांचा अवलंब करीत होता. पोटापाण्यासाठी या समाजाने स्थलांतर करून सुद्धा पुढची परिस्थिती किती बिकट होती याबद्दल अण्णाभाऊ लिहतात, 'वतनदार असून परदेशी, घर असून वनवासी - आपलं कोण असणार तिथं ? (फकिरा ९१४). म्हणजेच स्थलांतर केले तरी परत त्याच दारिद्र्याचा सामना करावा लागत होता.

**२. विस्तारलेली आर्थिक विषमतेची दरी :** आर्थिक विषमतेबद्दल ते लिहितात, 'जर रोज दोन कोंबड्या खाणाऱ्या तुमच्या अंमलदार लोकास्नी त्या खुनाची बातमी लागत न्हाय तर, ती माज्यावानी पाला खाणाऱ्याला कशी कळणार?' (फकिरा - ९११). या संवादामध्ये दलित समाज कुठल्या प्रकारे आपले जीवन जगत होता याचे भयाण वास्तव समोर येतेच, शिवाय सधन समाज कसा सुखवस्तू होता हे अण्णाभाऊ यांनी निदर्शनास आणून दिले आहे. दारिद्र्यामुळे गरीब समाज हा उदरभरण करण्यासाठी भीक मागून पोट भरीत होता. उकिरड्यावर एखाद्या शाळवाचं ताट पोसावं, तद्वत त्या दारिद्र्याच्या उकिरड्यावर सत्तू पोसला. (फकिरा - ९३८) यावरून दारिद्र्य हे फक्त दलित समाजाला वेढून होते असं नाही तर ज्या जाती तुलनेने उच्च होत्या त्यांनाही या दारिद्र्याने पार रसातळाला नेले होते. ज्यांना असल्या जीवनाचा तिटकारा आला होता त्यांनी इंग्रजांची चाकरी पत्करली होती.

जमीनदार व सावकार वर्गाने सामान्य शेतकऱ्यांची जी पिळवणूक केली होती त्यामुळे शेतकरी अधिकच रसातळाला गेला होता. कर्जे व व्याजापोटी जमिनीवरचे मालकी हक्क गमावून बसले. सावकाराच्या व्याजाच्या वह्या नि गव्हाणखत जाळून कुळांना मुक्त करीत तो फिरू लागला. (फकिरा - ९४१) या ओळीतून अण्णाभाऊ शेतकऱ्यांच्या पिळवणुकीची दखल घेतात.

आर्थिक दारिद्र्याची दरी किती गंभीर आहे याबद्दल अण्णाभाऊ बोलतात. सुरुंगांना पेट देता देता किंवा

पोलादाच्या रसात बुडून मरणे आणि दिवाळे निघाले म्हणून शेअर बाजारात मरणे. या मरणातील अंतर मोजून पहावे नि श्रेष्ठ मरण कोणते ते निश्चित ठरवावे (अण्णाभाऊ १९५८). कामगार व शेतकरी वर्ग हा फक्त कष्टकरी समाज म्हणूनच राहिला व शिक्षित समाजाने या कष्टकरी समाजाला संपत्ती निर्माण करणाऱ्या स्रोतांपासून फक्त दूर ठेवले नाही तर त्याची दरिद्री म्हणून कुचेष्टासुद्धा केली, हे वरील विधानावरून दिसून येते.

आर्थिकदृष्ट्या मागास समाज हा त्यांची रोजची भूक भागवण्यासाठी सुद्धा सधन समाजाच्या मर्जीवर अवलंबून होता. 'पाझर' या कादंबरीत असाच एक व्यक्ती भूक भागवण्यासाठी गावातील श्रीमंत व्यक्तीने कबूल केले म्हणून त्याच्या मळ्यावर भाजी आणायला जातो. परंतु त्याची निराशा होते. 'एका वक्ताची चार वांगी मिळतील'. (पाझर ३५) या वाक्यातून त्याची भूक ही सधन समाजाच्या मर्जीवर अवलंबून होती हेच सूचित करते.

अण्णाभाऊंनी भांडवलशाही व्यवस्थेच्या अनेक नकारात्मक बाजू त्यांच्या विचारातून समोर आणल्या आहेत. त्यांची (मागास) कुटुंब व्यवस्था भांडवलदारी जगाने त्या झाडाखाली हाकलून दिलेली असते. (अण्णाभाऊ १९५८). यावरून शेतकरी व कामगार वर्ग हा दरिद्री होण्यामागचे कारण ते स्पष्ट करतात. म्हणूनच त्यांचे जीवन वरच्या पातळीला नेण्याची शिकस्त करावी (अण्णाभाऊ १९५८). यातून अण्णाभाऊ शेतकरी व कामगार वर्गाच्या आर्थिक उन्नतीसाठी प्रयत्नशील होते हे प्रतीत होते.

**समारोप :**

अण्णाभाऊ साठे यांचे आर्थिक कल्याणाचे साहित्यिक विचार भांडवलशाही व्यवस्थेविरुद्ध स्पष्टपणे समोर येतात, परंतु व्यक्ती किंवा धर्माच्या विरोधात नाही. बहुधा याच त्यांच्या विचारांमुळे समाजातील प्रत्येक वर्ग अण्णा भाऊ साठे यांच्या विचारांशी जोडला जातो. अण्णा भाऊ साठे यांनी भारतातील सामाजिक, आर्थिक व राजकीय व्यवस्थेत असणारी असमानता आणि शोषण यांचा संबंध आर्थिक मागासलेपणाशी जोडला आहे. अण्णा भाऊ साठे यांच्या मते, भारतातील सामाजिक व आर्थिक मागासलेपण हे साधन संपत्तीच्या असमान वितरणाचे फलित आहे. त्यामुळे सरकारने हस्तक्षेप करून समाजवादी अर्थव्यवस्थेचा स्वीकार करावा व साधन संपत्तीचे वितरण समान करावे. राष्ट्रीय साधनसंपत्तीचे समान व न्याय वितरण करण्यासाठी सर्व उद्योगांचे संपूर्ण राष्ट्रीयीकरण करावे, असे त्यांना वाटते.

**संदर्भ सूची :**


१. अण्णा भाऊ साठे (१९५८) यांचे उद्घाटनपर भाषण दलित साहित्य संमेलन : १९५८.

२. अण्णा भाऊ साठे, (१९९५) वारणेचा वाघ, सुरेश एजन्सी, १६ वी आवृत्ती, जानेवारी १९९५.

३. अण्णा भाऊ साठे, (१९९३) पाझर, सुरेश एजन्सी.

४. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे निवडक वाङ्मय (१९९८), सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, प्रथम आवृत्ती १ ऑगस्ट १९९८, मुंबई .

५. तेगमपुरे मारोती, (२०२०) अण्णा भाऊ साठे यांचे आर्थिक विचार, मराठी अर्थशास्त्र परिषद (त्रैमासिक) अर्थसंवाद, एप्रिल- जून २०२० खंड ४४, अंक १, पान क्र. ९६


◆

# समतोल औद्योगिक विकाससंबंधी विदर्भ - मराठवाडा आंतरविभागीय समितीचा अहवाल : एक अभ्यास

**अरुण तवार** †
**बेलुरे विशाल चंद्रशेखर** ††

**प्रस्तावना :**

पुणे-मुंबई-नाशिक या क्षेत्रात होणाऱ्या औद्योगिकीकरणामुळे येणारा ताण व पर्यायाने नागरीकरणात मोठ्या प्रमाणावर होणारी वाढ लक्षात घेता औद्योगिकदृष्ट्या मागासलेल्या विदर्भ व मराठवाडा क्षेत्राचा विकास करून राज्याचा समतोल औद्योगिक विकास साधण्यासाठी या भागातील प्रत्येक जिल्ह्याचा औद्योगिक दृष्टिकोनातून सामर्थ्य, फायदे व संधी यांचा अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्र शासनातर्फे १६ जुलै, २०१६ रोजी 'विदर्भ - मराठवाडा आंतरविभागीय समिती' घटित करण्यात आली. या वीस सदस्यीय समितीचे अध्यक्षपद विभागीय आयुक्त, नागपूर यांच्याकडे देण्यात आले.

या समितीकडे पुढील विचारार्थ विषय सोपविण्यात आले होते.

१. नागपूर, अमरावती व औरंगाबाद या तीन विभागात येणाऱ्या प्रत्येक जिल्ह्यातील उद्योगविषयक माहिती संग्रहित करणे व त्या ठिकाणची वाणिज्य मंडळे, उद्योग, व्यवसाय व व्यापाराशी निगडित विविध संघटनांच्या बैठका घेऊन संधीचे व फायद्याचे समन्वेषण करणे.

२. आजारी उद्योगांचे पुनरुज्जीवन करण्यासंबंधी उपाय शोधणे.

३. या विभागातील औद्योगिक विकासासाठी सविस्तर फायदे लक्षात घेऊन राष्ट्रीय उत्पादकता क्षेत्रे, औद्योगिक वसाहती, समूह, इतर सुखसोयी आणि आधारभूत संरचनांची निर्मिती करण्यासाठी सोईस्कर ठावठिकाणे सुचविणे.

४. काही विशिष्ट क्षेत्रांसाठी, जसे खनिज उद्योग विकास, कृषी उद्योग विकास, स्वयंचलित उद्योग विकास, सुरक्षा उद्योग विकास इत्यादी उद्योगांना चालना देण्यासाठी विविध योजनांबाबत सूचना करणे.

५. या तीन विभागात विशेष औद्योगिकीकरण घडवून आणण्यासाठी विशेष प्रोत्साहन देण्यासंदर्भात शिफारशी करणे.

६. उद्योगांच्या कार्यप्रणालीत व विकासात येणारे अडथळे दूर करण्यासाठी व व्यवसाय सुलभता निर्माण करण्यासाठी सूचना करणे.

---

† प्राध्यापक व माजी अर्थशास्त्र विभागप्रमुख, पदवी, पदव्युत्तर व संशोधन केंद्र, ज्ञानोपासक शिक्षण मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परभणी.
आजीव सभासद क्र. : ९८० , भ्रमणध्वनी : ९४०५२३८२७४, ई-मेल : dr.aruntawar@gmail.com.
†† सह. प्राध्यापक व अर्थशास्त्र विभागप्रमुख, राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड, जि. नांदेड.
आजीव सभासद क्र. : १२४७, भ्रमणध्वनी : ९४०३४७७७८२, ई-मेल : vcbelure@gmail.com.

७. या विभागात अनेकविध प्रतिष्ठित राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय निगमांच्या औद्योगिक गुंतवणुकीस आकर्षित करण्यासाठी आणि प्राधान्याने उद्योग उभारणी करण्यासाठी, त्यांच्या आवश्यकता समजून घेण्यासाठी, त्यांच्या प्रतिनिधींसोबत शासनाचे विविध विभाग आणि मंत्रालयांच्या बैठका आयोजित करणे.

८. या विभागातील कृषी आणि कृषी आधारित उद्योग यांच्या विकासासाठी विविध योजनांचे समन्वेषण करणे.

९. औद्योगिकीकरणाला पोषक अशा परिस्थितिक व्यवस्था (Ecosystems) विकसित करण्यासाठी विशेष कृती आराखड्याची शिफारस करणे.


१०. या मागास विभागातील औद्योगिकीकरणाला चालना देण्यासाठी इतर विनिर्दिष्ट सूचना व शिफारशी करणे.

या समितीने अतिशय परिश्रमपूर्वक आपला अहवाल तयार केला व तो जानेवारी - २०१९ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या उद्योग आणि श्रम विभागाद्वारे प्रसारित झाला. सदर अहवालास 'विदर्भ -मराठवाडा आंतरविभागीय समितीचा अमरावती, औरंगाबाद आणि नागपूर विभागाच्या औद्योगिक विकासावरील अहवाल - २०१९' असे म्हणतात. परंतु हा अहवाल अद्यापपर्यंत पूर्णपणे सार्वजनिक करण्यात आलेला नाही. त्यावर केवळ मर्यादित वितरणासाठी असे लिहिले आहे. या अहवालाची मांडणी चार विभाग आणि ३९ प्रकरणांमध्ये करण्यात आली असून समितीने काढलेले मुख्य निष्कर्ष आणि शिफारशी पुढीलप्रमाणे आहेत.

**अ) औद्योगिक विकासातील प्रादेशिक अंतर अर्थपूर्ण :**

समितीच्या मते, राज्याच्या विविध विभागातील संघटित उद्योग आणि व्यापाराचे स्थान निरूपण करण्यासाठी मूल्यवर्धित कर (आता राज्य वस्तू व सेवाकर) हे एक महत्त्वाचे आणि विश्वसनीय निर्देशक आहे. समितीने सन २०१२ ते २०१७ या काळातील मूल्यवर्धित कराच्या वसुलीतील विभागनिहाय योगदानाची आकडेवारी तपासून राज्यात उद्योग आणि व्यापार यांचे मुंबई (कोकण) आणि पुणे विभागात

**आकृती १ : विभागवार मूल्यवर्धित कराची वसुली**
**(आकडेवारी : शेकडेवारीत, कालावधी : सन २०१२ - २०१७)**




स्रोत : प्रस्तुत अहवाल, पृष्ठ क्र. ४६

मोठ्या प्रमाणात केंद्रीकरण झाल्याचा निष्कर्ष काढला आहे. मूल्यवर्धित कराच्या वसुलीतील विभागनिहाय योगदान पुढील त्रिमिती पाय आकृतीद्वारे दर्शविले आहे.

आकृतीवरून हे स्पष्ट होते की, राज्याच्या मूल्यवर्धित कर महसुलात ६८ टक्के इतके सर्वांत जास्त योगदान एकट्या कोकण विभागाचे असून त्यानंतर १७ टक्के इतके योगदान पुणे विभागाचे आहे. मराठवाडा विभागाचे योगदान ४ टक्के इतके सर्वांत कमी असून विदर्भ आणि नाशिक विभागाचे योगदान अनुक्रमे ६ टक्के व ५ टक्के इतके आहे. राज्यात विदर्भ आणि मराठवाड्यातील लोकसंख्येचे एकूण प्रमाण ३७ टक्के आहे, परंतु त्यांचा करातील एकत्रित हिस्सा अवघा १० टक्के इतका आहे. यावरून राज्यातील विभागनिहाय प्रादेशिक विषमतेची तीव्रता सहजपणे लक्षात येते.

**तक्ता क्र.१ : राज्यातील विभागवार औद्योगिक सांख्यिकी**

**(टक्के)**

| विभाग | लोकसंख्या | औद्योगिक एकक | गुंतवणूक | रोजगार |
|---|---|---|---|---|
| उर्वरित महाराष्ट्र | ६३ | ७६ | ७३ | ८० |
| विदर्भ | २० | १७ | २१ | १३ |
| मराठवाडा | १७ | ७ | ६ | ७ |
| एकूण | १०० | १०० | १०० | १०० |

स्रोत : प्रस्तुत अहवाल, पृष्ठ क्र. ४३.

राज्यात पडणारा अपर्याप्त आणि विसंगत पाऊस, त्यासोबत सिंचनाच्या अपुऱ्या सोयी ही प्राथमिक क्षेत्राच्या अभिवृद्धीतील आत्यंतिक भिन्नतेची कारणे आहेत. केंद्र सरकारच्या अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रमांतर्गत राज्यातील सुमारे ४० टक्के तालुक्यांचा समावेश होतो, तर राज्याच्या उत्पन्नात प्राथमिक क्षेत्राचा हिस्सा अवघा १२ टक्के इतका असून सुमारे ५० टक्के लोकसंख्या त्यावर अवलंबून आहे. अशा प्रकारे या आकडेवारीवरून दिसून येणारे प्राथमिक क्षेत्राचे मागासलेपण प्रादेशिक असमतोलास अधिक विकोपाकडे नेते. म्हणून एकीकडे प्राथमिक क्षेत्रास आधार देऊन त्यास कार्यक्षम बनवत असतानाच दुसरीकडे त्यावरील उपजीविकेसाठी असलेले अवलंबन कमी करण्यासाठी द्वितीय आणि सेवा क्षेत्रास बळकट करून अधिक संधी निर्माण करणे व प्राथमिक क्षेत्रावरचे ओझे दूर करणे अत्यंत गरजेचे आहे.

**ब) विभागीय औद्योगिक सांख्यिकी :**

पुढे देण्यात आलेली विभागवार औद्योगिक सांख्यिकी ही राज्यातील औद्योगिकीकरणाचे वास्तव प्रतिबिंब दर्शवते. आदर्शानुसार विभागवार औद्योगिक एकक, रोजगार आणि गुंतवणूक यांची टक्केवारी एकमेकांशी प्रमाणशीर असावयास हवी. त्यांच्यातील विचलन जितके जास्त तितका असमतोल जास्त राहील. पुढील तक्त्यामध्ये राज्यातील विभागवार औद्योगिक सांख्यिकी दर्शविण्यात आली आहे.

उपरोक्त तक्त्यावरून असे निदर्शनास येते की, उर्वरित महाराष्ट्रात राज्यातील सुमारे ६३ टक्के लोकसंख्या वास्तव्य करते, तर या लोकसंख्येला राज्यातील ७६ टक्के उद्योग एकक, ७३ टक्के औद्योगिक गुंतवणूक आणि ८० टक्के रोजगार मिळतो. राज्यातील लोकसंख्येत २० टक्के प्रमाण असलेल्या विदर्भास औद्योगिक एककातील १७ टक्के हिस्सा, औद्योगिक

गुंतवणुकीतील २१ टक्के हिस्सा, तर रोजगारातील १३ टक्के हिस्सा मिळतो. त्याचप्रमाणे राज्यातील लोकसंख्येत १७ टक्के प्रमाण असलेल्या मराठवाडा विभागास राज्याच्या औद्योगिक गुंतवणुकीतील ६ टक्के हिस्सा तर रोजगारात ७ टक्के हिस्सा मिळतो.

अशा प्रकारे वरील विवेचनावरून राज्यात मराठवाडा आणि विदर्भ या विभागांतील तीव्र स्वरूपाच्या औद्योगिक विचलनास (असमतोलास) तोंड द्यावे लागत आहे, हे स्पष्ट होते.

**क) सूक्ष्म, लघू व मध्यम उपक्रम उद्योगांचे बळकटीकरण करणे अत्यंत आवश्यक :**

राज्यातील औद्योगिक सांख्यिकीचे अवलोकन केले असता त्यातून पुढीलप्रमाणे धक्कादायक अनुमान निघते.

१. राज्यातील विशाल उद्योगांतील गुंतवणूक ८७ टक्के आहे. परंतु त्यातून प्रत्यक्ष रोजगार निर्मिती केवळ १२ टक्के होते.

२. याउलट सूक्ष्म-लघू-मध्यम उद्योगांतील गुंतवणूक १३ टक्के इतकी असून त्यातून ८८ टक्के इतकी प्रत्यक्ष रोजगार निर्मिती होते.

३. परंतु जरी सूक्ष्म-लघू-मध्यम उद्योगांद्वारे ८८ टक्के प्रत्यक्ष रोजगार निर्मिती होत असली, तरी शासनाच्या औद्योगिक प्रोत्साहन योजनांचा केवळ ८ टक्के लाभ त्यांना मिळतो व ९२ टक्के लाभ विशाल उद्योगांकडे जातो.

ही आकडेवारी लक्षात घेता राज्यातील सूक्ष्म-लघू-मध्यम उद्योगांना आधार व बळकटी देण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा तयार करणे अत्यंत आवश्यक आहे, असे लक्षात आल्यावाचून राहत नाही.

**ड) केवळ प्रोत्साहन योजना पुरेशा नसून परिस्थितीक व्यवस्थेवर लक्ष केंद्रित करणे अनिवार्य :**

आतापर्यंत राज्यात औद्योगिक प्रोत्साहनाप्रीत्यर्थ अदमासे २५०० कोटी रु. संवितरित करण्यात आले, परंतु त्यात विदर्भ व मराठवाडा विभागातील संवितरणाचे प्रमाण हे अत्यंत क्षुल्लक होते. यातून केवळ प्रोत्साहनांच्या घोषणाबाजीमुळे औद्योगिक गुंतवणूक आकर्षित होत नसते, हे सिद्ध होते. त्यामुळे मागास विभागात गुंतवणूक आकर्षित होण्यासाठी तेथे अधिक चांगली परिस्थितीक व्यवस्था निर्माण करणे तितकेच किंबहुना त्यापेक्षाही जास्त महत्त्वाचे असते.

पर्याप्त आधारभूत संरचनांमुळे गुंतवणूकदार आकर्षित होतील. म्हणून मराठवाडा आणि विदर्भातील ठरावीक औद्योगिक स्थाने निश्चित करून तेथे औद्योगिकीकरणास प्रोत्साहन देण्यासाठी स्वतंत्र योजना तयार करण्यात यावी व तेथे औद्योगिक व नागरी आधारभूत संरचनांच्या विकासावर निधी खर्च करण्यात यावा. जेव्हा भारत जागतिक दर्जाचे औद्योगिक देश होण्याचे स्वप्न पाहतो, तेव्हा आपण कारखान्याच्या आत आणि कारखान्याच्या बाहेरही जागतिक दर्जाचे असणे गरजेचे आहे. देशात सूक्ष्म-लघू-मध्यम उद्योग हे अतिशय चांगली कामगिरी दर्शवित आहेत. अशाच प्रकारे राज्यातील चंद्रपूर अमरावती, जालना, लातूर इत्यादी आशावादी विकसनशील भागात अभिवृद्धीक्षम औद्योगिक क्षेत्रे (Growth Enabling Industrial Zones) स्थापन करण्यात यावीत.

**ई) व्यवसाय सुलभता :**

व्यवसाय सुलभता ही केवळ नवीन व्यवसायांच्या मान्यतेपुरतीच किंवा प्रारंभिक स्वरूपाची नसावी, तर ती वास्तव अर्थाने निर्माण करण्यात यावी. नवीन उद्योगांबरोबर पूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या उद्योगांचे कार्य सुरळीतपणे चालणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. म्हणून सुधारणांच्या योजना तयार करीत असतांना अस्तित्वातील उद्योगांनादेखील विचारात घेण्यात यावे.

मराठवाडा आणि विदर्भ विभागातील उद्योगांना मजबूत आधार देण्यासाठी औरंगाबाद आणि नागपूर बाहेर एक सहविकास आयुक्त दर्जाचे पद तयार करण्यात

यावे व त्याकडे औद्योगिक वृद्धीस गती देण्यासाठी स्थानिक पातळीवरील निर्णय घेण्याचे अधिकार प्रदान करण्यात यावेत.

केंद्राच्या औद्योगिक धोरण आणि प्रचालन विभागाद्वारे (आता औद्योगिक आणि अंतर्गत व्यापार प्रचालन विभाग) व्यवसाय सुलभतेस प्रोत्साहन म्हणून औद्योगिक कायदे, नियम, विनियम इत्यादींचे सुलभीकरण करण्याचा विषय कार्यसूचीवर आहे. परंतु त्याहीपुढे जाऊन ग्रामपंचायत कायदा, माथाडी कायदा, किमान वेतन कायदा इत्यादींचे काही विशेष कृतींद्वारे सुलभीकरण करणे आवश्यक आहे.

औद्योगिक मंडळे/ संघ, व्यवसाय संघटना, इत्यादी उद्योगांचा आवाज म्हणून महत्त्वाची भूमिका बजावत असतात. म्हणून प्रत्येक उद्योगासाठी अशा मंडळाची सदस्यता बंधनकारक करण्यात यावी. तसेच विशेषाधिकार प्राप्त मंडळाचा दर्जा आणि त्यांचे अधिकार बहाल करण्यासंबंधीच्या कसोट्या सुस्थापित करण्यात याव्यात.

उद्योगांसाठी लागणारे कुशल मनुष्यबळ उपलब्ध होणे ही दोन मुख्य आव्हाने असून शासनाने आपल्या 'रोजगार विनिमय' भूमिकेतून बाहेर पडून विदर्भ आणि मराठवाड्यात ठिकठिकाणी 'रोजगार केंद्रे' सुस्थापित करावीत. ही केंद्रे उद्योगांसाठी कौशल्य विकास एजन्सी आणि रोजगार संपर्क एजन्सी म्हणून कार्य करणारी असावीत.

**फ) संघटित आणि वेगवर्धक प्रादेशिक विकास :**

जर्मनी आणि स्वित्झर्लंडसारख्या औद्योगिकदृष्ट्या पुढारलेल्या देशांनी ज्याप्रमाणे आपल्या विकासात रेंगाळलेल्या विभागात गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी आणि निर्यातीस प्रोत्साहन देण्यासाठी संघटनांची आवश्यकता वेळीच ओळखली. याच धर्तीवर भारतासारख्या विकसनशील देशाने आणि त्यातील औद्योगिकदृष्ट्या परिपक्व असलेल्या महाराष्ट्राने आपल्या औद्योगिकदृष्ट्या रेंगाळलेल्या विभागांच्या विकासासाठी हा व्यावसायिक आणि केंद्रित दृष्टिकोन स्वीकारून एक विशेष नियुक्त कार्यबल म्हणून विदर्भ-मराठवाडा औद्योगिक आणि व्यापार विकास परिषद सुस्थापित करावी. या परिषदेने येत्या दहा वर्षांसाठी कालबद्ध योजना तयार करून प्रत्येक प्रशासकीय विभागात आठशे ते हजार नवे उद्योग स्थापन करावेत.

डी.एम.आय.सी. प्रकल्प औरंगाबाद आणि मिहान या औद्योगिक स्थानांची आंतरराष्ट्रीय स्तरावर सातत्याने जाहिरात केल्यास गुंतवणूक आकर्षित करण्यात यश मिळेल म्हणून त्यासाठी पुढीलप्रमाणे पुढाकार घेण्याची शिफारस करण्यात आली.

१. जाहिरातीसाठी समर्पित संघ स्थापित करणे.

२. अग्रक्रम देऊन उबवण केंद्र (Incubation center) निर्माण करणे. जेणेकरून गुंतवणूकदारांचे संघ त्या जागेवरून त्यांचे कार्यालय स्थापेपर्यंत आपल्या हालचाली करू शकतील.

३. डी.एम.आय.सी. येथे अग्रक्रमाने आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्रे स्थापन करणे आणि दर तीन महिन्यांनी औद्योगिक प्रदर्शने आयोजित करणे.

महाराष्ट्र शासनाच्या वर्तमान सामूहिक प्रोत्साहन योजनेची मूलभूत रचना साधारणपणे चांगली आहे. कारण ती संपादणूक आधारित प्रोत्साहनांवर आधारित आहे. या योजनेतील अटींचे अशा प्रकारे सुलभिकरण केले पाहिजे की, ज्यांचे अनुपालन राज्यातील सूक्ष्म-लघू-मध्यम उद्योगांनादेखील करता यावे. यामुळे राज्यातील सूक्ष्म-लघू-मध्यम उद्योग हे दीर्घकाळ टिकतील व राज्यातील औद्योगिक परिस्थितीक व्यवस्था मजबूत बनेल. पुढे अशी शिफारस करण्यात आली की, सूक्ष्म-लघू-मध्यम उद्योगांसाठी विदर्भ आणि मराठवाड्यातील संबंधित वर्गीकृत तालुक्यांसाठी प्रोत्साहन योजनेचा निधी इतरांच्या तुलनेत १.५ पट जास्त असावा.

**ग) बिगर औद्योगिक स्थानांचा विकास :**

मराठवाडा आणि विदर्भ विभागातील काही मोजक्या स्थानांचा अपवाद वगळता इतरत्र औद्योगिकीकरणाचे मोठे आव्हान आहे. अशा प्रकारची बिगर औद्योगिक स्थाने असणारी अर्थव्यवस्था मुख्यत्वेकरून बेभरवशाच्या पावसावर आणि अपुऱ्या सिंचनाद्वारे प्रभावित होणाऱ्या शेतीवर अवलंबून असते. म्हणून अशा भागांचे अल्पकालीन व मध्यावधी आर्थिक अभिवर्धन करण्यासाठी पुढील 'सहा खांबी' व्यूहरचना कार्यान्वित करण्याचे सुचविण्यात आले.

१. औद्योगिकीकरणाला आधार तयार करण्यासाठी विदर्भ व मराठवाड्यात येत्या पाच वर्षांत प्रत्येकी २५० कृषीआधारित सूक्ष्म-लघू-मध्यम उद्योगांचे समूह (क्लस्टर्स) तयार करण्यात यावेत. यासाठी प्रत्येक विभागास २००० कोटी रु. इतका निधी उपलब्ध करून देण्यात यावा.

२. औद्योगिकीकरणाचा आधार म्हणून सूक्ष्म-लघू-मध्यम उद्योगांचे समूह स्थापन करण्यात यावेत.

३. तुलनेने दुष्काळी आणि नापिकी असणाऱ्या भागात सौर ऊर्जा शेती करणे.

४. आर्थिक वृद्धीसाठी पर्यटनास चालना देण्यात यावी.

५. मागास भागात ई - गव्हर्नन्स विकसित करण्यासाठी व्यावसायिक प्रक्रियांचे बाह्यस्रोतीकरण (BPO) करण्यात यावे.

६. औद्योगिक परिस्थितिक व्यवस्था विकसित करण्यासाठी मातृउद्योग (Mother Units) स्थापन करण्यात यावेत.

कृषी हे मराठवाडा आणि विदर्भातील लोकांच्या उत्तरजीवित्वाचे मुख्य साधन असून या भागातील ७० टक्क्यांपेक्षा जास्त लोकसंख्या खेड्यात राहते. या भागातील शेतकऱ्यांना आर्थिक पाठबळ देण्यासाठी मूल्यवर्धित क्रिया जसे की, कापूस उद्योग, डाळमिल, खाद्य तेल मिल, फळ प्रक्रिया, बीज उद्योग, तुतीची लागवड आणि रेशीम उत्पादन, दुग्धशाळा उद्योग, कुक्कुटपालन उद्योग, शेळी पालन, मत्स्य व्यवसाय, वीट उद्योग इत्यादींना विशेष कार्यक्रम आणि साहाय्य यांच्या माध्यमातून उत्तेजन देण्यात यावे. हे विविध उद्योग व्यवसाय शासनाच्या ज्या विविध विभागाशी संबंधित आहेत त्यांनी या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उद्योग विभागाच्या नेतृत्वाखाली एकत्र येऊन कार्य करावे.

**ह) व्यवसाय क्षेत्रनिहाय तपशीलवार कार्यवाही**

सदर अहवालात पुढे मराठवाडा-विदर्भ भागाच्या सर्वांगीण विकासासाठी या भागात विविध प्रकारच्या १६ उद्योग व्यवसायांचा विकास कशा प्रकारे साध्य करता येईल याविषयी तपशीलवार विवेचन करण्यात आले आहे. हे उद्योग व्यवसाय पुढीलप्रमाणे आहेत. १) संरक्षण, २) कृषी आदाने, ३) अन्न, कृषी प्रक्रिया आणि कृषी संलग्न क्रिया, ४) वस्त्रनिर्माण आणि कापूस प्रक्रिया, ५) भांडवली वस्तू आणि स्वयंचलित्र; (Automotive) उद्योग, ६) पुनर्नूतनीय ऊर्जा, ७) पुरवठा व्यवस्थापन आणि वखार तंत्र, ८) बांबू क्षेत्र, ९) औषधी आणि सौंदर्य प्रसाधने, १०) आयुर्वेद, ११) प्लास्टिक आणि आवेष्टन, १२) माहिती तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान सक्षम सेवा, १३) खनिज आधारित उद्योग, १४) विद्युत, इलेक्ट्रॉनिकी आणि जड सामग्री, १५) अवजड अभियांत्रिकी आणि १६) उडती राख (Fly Ash) आधारित पर्यावरण पूरक उद्योग इत्यादी.

अशा प्रकारे राज्यातील प्रादेशिक असमतोलासंबंधी दांडेकर समिती, निर्देशांक आणि अनुशेष समिती, केळकर समिती इत्यादी पूर्वसुरींनी ज्या अत्यंत परिश्रमपूर्वक आणि अभ्यासपूर्ण पद्धतीने आपापले अहवाल तयार केले, त्या परंपरेला साजेल अशाच प्रकारच्या वास्तवदर्शी स्वरूपाचा अहवाल तयार

करण्यात समिती यशस्वी ठरली आहे. इतर अनेक राज्यांमध्ये त्यांच्या औद्योगिक क्षेत्रांसंबंधीची माहिती सुव्यवस्थितपणे व नियमितपणे उपलब्ध होत असते. तशी परिस्थिती आपल्याकडे नसताना देखील सदर समितीने महाराष्ट्राच्या औद्योगिक व एकंदरच संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या विविध पैलूंसंबंधीची अनेकविध नावीन्यपूर्ण माहिती मिळवून तिचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करत मराठवाडा आणि विदर्भ विभागातील आर्थिक मागासलेपण किती भीषण व अवांछित आहे, हे पदोपदी उदाहरणे देऊन स्पष्ट केले आहे.

या अहवालाच्या माध्यमातून उजेडात आलेल्या माहितीवरून राज्यात मराठवाडा विभागाचे मागासलेपण हे अनेक बाबतीत विदर्भापेक्षाही मोठे असल्याची बाब प्रकर्षाने जाणवते. परंतु ज्याप्रामाणे विदर्भातील सामान्य जनता, विचारवंत, पुढारी इत्यादींना त्यांच्या मागासलेपणाची पुरेशी जाणीव आहे व तो दूर व्हावा यासंबंधीची जी जागरूकता त्यांच्यात पहायला मिळते तशी जागरूकता मराठवाडा विभागासंबंधी आढळत नाही. मागास प्रदेशाच्या समतोल आर्थिक विकासाची जणूकाही एक नीलप्रतच असणाऱ्या या अत्यंत महत्त्वपूर्ण अहवालातील विविध तपशीलवार शिफारशी ह्या निश्चितच दिशादर्शक स्वरूपाच्या आहेत. परंतु दुर्दैवाने अद्यापपर्यंत त्याची योग्य ती दखल शासन स्तरावर घेण्यात आल्याचे निदर्शनास येत नाही.

आर्थिक विकासातील प्रादेशिक असमतोलासंबधी आरसा दाखविणाऱ्या अशा प्रकारच्या अहवालांची दखल न घेण्याची राज्यात अलीकडे जणूकाही प्रथाच पडलेली दिसते. अशा प्रकारचा प्रघात पाडला जाणे ही बाब फुले -शाहू-आंबेडकरांची पुरोगामी पंरपरा असणाऱ्या व्यवस्थेला निश्चितच शोभनीय नाही.

**संदर्भ सूची :**


१. Government of Maharashtra. (2019). Report of Vidarbha & Marathwada Inter & Regional Committee on Industrial Development of Amravati, Aurangabad and Nagpur Divisions. Industries, Energy and Labour Department, Mantralaya Mumbai

२. खांदेवाले, श्री. (२०२०, जुलै १२). विदर्भ - मराठवाड्याचा उद्योग विकास अहवाल दुर्लक्षित. महाराष्ट्र टाइम्स, नागपूर.

३. खांदेवाले, श्री. (२०२०, जुलै १३). अधिक रोजगार देणाऱ्यांना प्रोत्साहन मात्र तोकडे. महाराष्ट्र टाइम्स, नागपूर.

४. खांदेवाले, श्री. (२०२०, जुलै १४). हजार उद्योग स्थापन करा. महाराष्ट्र टाइम्स, नागपूर.

५. खांदेवाले, श्री. (२०२०, जुलै १५). विदर्भ- मराठवाडा औद्योगिक विकास परिषद स्थापन करा. महाराष्ट्र टाइम्स, नागपूर.

६. महाराष्ट्र शासन (२०१६). औद्योगिक क्षेत्रात विदर्भ व मराठवाड्याचा विकास करण्याच्या दृष्टिकोनातून, सामर्थ्य, फायदे व संधी यांचा अभ्यास करण्यासाठी आंतरविभागीय समिती गठित करण्याबाबत... शासन निर्णय क्र. : संकीर्ण २०१६/प्र.क्र./उद्योग-८. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.

७. https://www-maharashtra-gov-in/Site/Upload Government %20 Resolutions/Marathi 201607191548 128210-pdf - Date : 01/08/21


◆

# भारतावरील आर्थिक संकट

**जे. एफ. पाटील** †

**पुस्तक : भारतावरील आर्थिक संकट**
पृष्ठसंख्या : १६७, पेपरबाऊंड : डेमी साईज
संपादक : डॉ. मेघा पानसरे
प्रकाशक : श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर
मूल्य : रु. २००/-
मुद्रक : भारती मुद्रणालय, शाहूपुरी, कोल्हपूर
ISBN: 978-93-82888-43-7

८ डिसेंबर २०१९ ते १४ डिसेंबर २०१९ या सप्ताहात कोल्हापूरच्या स्व. गोविंदराव पानसरे संस्थापित श्रमिक प्रतिष्ठान, या ख्यातनाम संस्थेने २००१ साली सुरु केलेल्या व २००३ पासून 'कॉम्रेड अवि पानसरे व्याख्यानमाला' या नावाने लोकमान्य झालेल्या व्याख्यानाचे आयोजन केले. 'भारतावरील आर्थिक संकट' हा या व्याख्यानमालेचा विषय होता. झालेल्या भाषणांचे एकत्रित लेख संग्रहाच्या स्वरूपात डॉ. मेघा पानसरे यांनी संपादन केले. त्याचेच स्वरूप म्हणजे 'भारतावरील आर्थिक संकट' हे श्रमिक प्रतिष्ठानने प्रकाशित केलेले पुस्तक!

पुस्तकामध्ये एकूण सात लेख (व्याख्याने) संकलित आहेत. श्रीनिवास खांदेवाले, मारुती तेगमपुरे, करमसिंह रजपूत, चंद्रकांत केळकर व प्रा. डॉ. नितीन कुरुगकर ही शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळी तर सामाजिक कृती व प्रबोधनात अग्रेसर असणारे मुक्ता मनोहर, देवीदास तुळजापूरकर हे वैचारिक कार्यकर्ते यांनी ही व्याख्याने दिली आहेत.

या पुस्तकाची, संदर्भ संपन्न व विचारप्रवर्तक प्रस्तावना कार्यकर्त्या डॉ. मेघा पानसरे यांनी संक्षिप्त, चिकित्सक व पुढील प्रश्न निर्माण करणाऱ्या पद्धतीने लिहिली आहे. अशी व्याख्याने व त्यावर आधारित पुस्तके म्हणजे, ''बदलत्या सामाजिक-राजकीय-आर्थिक व सांस्कृतिक प्रश्न व त्यावरील मंथनाचा एक ऐतिहासिक दस्तऐवज आहे, असे म्हणता येईल'' (डॉ. मेघा पानसरे, प्रस्तावना पृ. ३).

जागतिक अर्थव्यवस्थेवरील या विषयावर ऐतिहासिक सर्वस्पर्शी, सैद्धांतिक व उपयोजित असा आढावा घेण्याचा प्रयत्न श्री. चंद्रकांत केळकर, मुंबई यांनी व्याख्यानमालेच्या उद्घाटन प्रसंगी केला. ते करताना त्यांनी दोन महत्त्वाच्या शक्यता व्यक्त केल्या - १) प्रदीर्घ काळ कुंठित जागतिक अर्थव्यवस्था, २) वित्त भांडवलशाहीमध्ये टोकाचा अंतर्विरोध निर्माण होईल. एकूणच सध्याची जागतिक व भारतीय अर्थव्यवस्था प्रचंड कर्जबाजारीपणा (परिणामतः दिवाळखोरीच्या काठावर) आहे, हे भयानक वास्तव श्री. चंद्रकांत केळकर यांनी नमूद केले आहे. तसेच आज जगाच्या प्रत्येक लहान-मोठ्या (वयाने) व्यक्तीच्या डोक्यावर ३२,५०० डॉलर्सचे कर्ज व्यक्त होते, हे सांगितले.

पुण्याच्या मुक्ता मनोहर यांनी दुसरे व्याख्यान दिले.

† माजी अध्यक्ष, कार्याध्यक्ष व विश्वस्त, मराठी अर्थशास्त्र परिषद.
आजीव सभासद क्र. : ६२, भ्रमणध्वनी : ९४२२०४६३८२, ई-मेल : jfpatil@rediffmail.com

भारताच्या अर्थव्यवस्थेची कटू स्थिती हा त्यांचा विवेचन विषय. अर्थात, भारताची सद्य: अर्थव्यवस्था पराकोटीची अडचणीत आहे. (अतिदक्षतेची गरज असणारी) हे त्यांच्या मांडणीचे मुख्य सूत्र. अर्थव्यवस्थेमध्ये अरसणाऱ्या टोकाच्या उत्पन्न भत्ता-विषमतेसंबंधी त्यांचे प्रारंभिक वर्णन, डोळ्यांत अंजन घालणारे आहे. त्यानंतर राष्ट्रीय उत्पन्न वृद्धिदराच्या घसरणीची कारणे - नोटबंदी, जीएसटीची ढिसाळ कार्यवाही यांचा योग्य उल्लेख आहे. नंतर त्या मानवी विकास दर्शकाबद्दल बोलतात. विकास व पर्यावरण संतुलन यातील जैविक विरोधाकडे त्या लक्ष वेधतात. निरक्षरतेचे मोठं प्रमाण (३६.९३%) संशोधनाची, संशोधकांची वानवा, आरोग्यावरचा दरिद्री खर्च अशा अत्यंत महत्त्वाच्या प्राधान्य आवश्यकतेच्या मुद्यावर मुक्ता मनोहर मोठ्या प्रभावी पद्धतीने मांडणी करतात.

गोत्यात, खड्ड्यात जात चाललेल्या भारतीय बँकिंग व्यवस्थेवर प्रत्यक्ष मैदानात लढणारे श्री. देवीदास तुळजापूरकर बोलले. त्यांच्या मांडणीवरून हे स्पष्ट होते की, भारताचे बँकिंग केव्हाही अडचणीत येऊ शकते. थकीत कर्जे (NPA), त्याचा नागरिकांवर पडणारा भार, वाढती बुडीत बँक प्रकरणे, बँकिंगच्या खाजगीकरणाचा प्रच्छन्न प्रयत्न व त्यातून निर्माण होणारे सामाजिक/आर्थिक प्रश्न श्री. तुळजापूरकर प्रभावी पद्धतीने व्यक्त करतात व वित्तव्यवस्थेच्या पुनर्वसनाची आग्रही मागणी करतात.

श्री. करमसिंह रजपूत देशाच्या दुखत्या नसेवर बोट ठेवतात. कृषिप्रधान देशात जबाबदार, शास्त्रशुद्ध व प्रामाणिक कृषी धोरणाचा अभाव ते व्यक्त करतात. नैसर्गिक संकट, शेतकरी / शेतमजूर शोषण यामुळे शेती व्यवस्थेतही मंदी आहे. किमान आधार भाव, वाजवी दराने, पुरेशा वेळेवर व योग्य त्या प्रकारचा पत पुरवठा व शेतीपूरक वा शेती प्रोत्साहक व्यापार धोरणाची गरज ते स्पष्ट करतात. शेतीला पुरेसा भांडवल पुरवठा होत नाही. हा महत्त्वाचा मुद्दा उचलून धरण्याची गरज आहे. शेतकरी आत्महत्या व कृषी पतपुरवठा आणि शेतमाल किमती यांची सांगड स्पष्ट करण्याचा प्रयत्न श्री. रजपूत करतात. पतपुरवठ्यामध्ये आजही बहुसंख्य अल्प भूधारकांना सावकारी कर्जावर अवलंबून राहावे लागते. हेही कटू सत्य त्यांच्या मांडणीत स्पष्ट होते.

डॉ. मारोती तेगमपुरे मंदी व बेरोजगारीवर मांडणी करतात. बेरोजगारीचे मोठे प्रमाण, सर्व आर्थिक क्षेत्रात बरोजगारीचे अस्तित्व, बेरोजगारीची वाढती प्रवृत्ती, बेरोजगारीचे भीषण परिणाम या सर्व गोष्टींबाबत डॉ. तेगमपुरे अस्वस्थ करणारे विश्लेषण करतात.

प्रा. डॉ. मिलिंद मुरुगकर आर्थिक मंदी व तंत्रज्ञान यांच्या आंतरसंबंधाबद्दल विश्लेषण करतात. देशावरील आर्थिक संकट अधिकाधिक गुंतागुंतीचे होत आहे. सरकार 'राष्ट्रीय नमुना अहवाल' दडपून ठेवण्याचा प्रयत्न करते. हे लोकशाहीशी विसंगत आहे. 'बिझनेस स्टँडर्ड' वृत्तपत्राने तो प्रसिद्ध करण्याचे धाडस केले. लोकशाहीच्या आरोग्यासाठी ते योग्यही आहे. त्यातून ग्रामीण गरिबीची वाढ उघड होते. मध्यम कुशल व अकुशल क्षेत्रात संपत्ती निर्मितीचा वेग वाढत नाही. अमानवी तंत्रज्ञान मानवाचा रोजगार वाढत्या प्रमाणात काढून घेत आहे. उच्च प्रतीय सर्वसाधारण व विशेषत: तंत्र शिक्षण, तेही सहजसाध्य, उपलब्ध करण्याची गरज महत्त्वाचा प्रश्न उकलण्याचा प्रयत्न करते.

व्याख्यानमालेचे निष्कर्ष स्वरूपाचे व्याख्यान ज्येष्ठ विचारवंत डॉ. श्रीनिवास खांदेवाले करतात. महाशक्तीचा अर्थ लोकांसाठी चांगला रोजगार, चांगलं वेतन, चांगल जगणं असा होता. ही भूमिका घेऊन डॉ. खांदेवाले आर्थिक संकटावर मात करण्यासाठी तत्कालीन मध्यकालीन व दीर्घकालीन उपाय योजना सुचवितात. डॉ. खांदेवालांची सूचना - भारतीय भांडवलशाहीच्या दर्जाचा अभ्यास करण्याची गरज खासकरून लक्षात घेणे आवश्यक आहे. त्याच मार्गाने नवा समाजवाद तयार करत येईल हा त्यांचा आशावाद समर्थनीय आहे.

एकूणच सर्वसाधारण 'शहाणपण' असणाऱ्या नागरिकांना आपल्या देशाची सध्याची अर्थव्यवस्था तिच्या समस्यांसह समजण्यासाठी श्रमिक प्रतिष्ठानचे हे प्रकाशन अत्यंत उपयुक्त आहे.

◆

# कोरोना लिटरसी

**शि. ना. माने** †

**Corona Literacy :**

एक आटपाट नगर होते. तेथे एक आजोबा, एक आजी व त्यांची तीस वर्षांची नात राहात होते. नात व्यवस्थापन शास्त्रातील व अभियांत्रिकीतील पदवीधर होती. आजोबा, आजी व नात कोरोना पॉझिटिव्ह होते.

शेजारचे डबेवाले बाबा त्यांना दररोज घरगुती जेवणाचा डबा पाठवीत होते. डबेवाले बाबा कोरोना निगेटिव्ह होते. आजोबा व आजी जुन्या व पारंपरिक प्रथांना चिकटून होते.

'सावध, ऐका पुढल्या हाका' या वचनानुसार कोरोना काळातील संक्रमणाने काही जुने विचार मागे पडले. त्यांची जागा नवीन तंत्रवैज्ञानिक विचारांनी घेतली. एके दिवशी एक प्रसंग घडला. आजोबा व आजी यांनी घरातील तयार केळीची एक जादा फणी डबेवाले बाबांच्या मुखात पडावी, असा भावनिक विचार नातीपुढे ठेवला. नातीने ताबडतोब त्या विचाराला विरोध केला. थोडक्यात, नातीचे मत पुढीलप्रमाणे होते :

कोरोना पॉझिटिव्ह व्यक्तीकडून कोरोना निगेटिव्ह व्यक्तीकडे संक्रमण सहज होते. कोरोना निगेटिव्ह व्यक्तीकडून ते संक्रमण होऊ शकत नाही. ही एक साधी गोष्ट झाली, परंतु ती एक महान सत्य सांगून गेली.

कोरोना काळातील संक्रमणाने एक नवीन संज्ञा चलनात आली.

'कोरोना लिटरसी'चा एक नवा पर्याय मराठीत रूढ झाला. 'कोरोना साक्षरता' असा त्या पर्यायाचा आपण स्वीकार करूयात.

◆

''प्रभावी नागरीकत्वासाठी वाचण्याची व लिहिण्याची क्षमता जेवढी आवश्यक असते तेवढीच संख्याशास्त्रीय पद्धतीने विचार करण्याची क्षमता एके दिवशी आवश्यक ठरेल.''

***- एच. जी. वेल्स***

† माजी अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद, निवृत्त प्राध्यापक, धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय, सातारा.
आजीव सभासद क्र. : १०८, भ्रमणध्वनी : ७७३८३५६७८१

वाद
प्रतिवाद
संवाद

# महाराष्ट्राच्या कृषी स्मशानाची राजकीय अर्थव्यवस्था : विदर्भ व मराठवाड्यातील सर्वाधिक शेतकरी आत्महत्याग्रस्त दोन जिल्ह्यांचा जणगणना अभ्यास (जानेवारी २०१४- डिसेंबर २०१७) या लेखावरील प्रतिक्रिया-प्रतिवाद

**संतोष दास्ताने** †

स्वातंत्र्य मिळून आज सात दशके उलटून गेली तरी देशातील शेतकरी हजारोंच्या संख्येने आत्महत्या करीत आहेत, हे आपल्या समाजाला लांच्छनास्पद आहे. कितीही प्रयत्न केले तरी हे आत्महत्यांचे सत्र थांबायला तयारच नाही. या दुर्दैवी घटनेचे वस्तुनिष्ठ विश्लेषण करणे, त्यावरील उपाययोजना निश्चित करणे व ती कठोरपणे आणि प्रामाणिकपणे अमलात आणणे हे आवश्यक आहे. तसे प्रयत्नही होत आहेत. पण हा प्रश्न इतका गुंतागुंतीचा बनून गेला आहे की यात सरकारची आणि पर्यायाने समाजाची हतबलता दिसून येत आहे. मात्र, त्या दिशेने अथकपणे प्रयत्न करीत राहणे हेही तितकेच गरजेचे आहे. अर्थसंवाद खंड ४५, अंक १ येथे ज्ञानदेव तळुले यांनी या विषयावरील आपला शोधनिबंध प्रसिद्ध केला आहे. त्याची आवर्जून दखल घेतली पाहिजे. तळुले यांनी सातत्याने प्रस्तुत विषयावर संशोधन आणि लेखन केले आहे. त्यांच्या अभ्यासाला प्राथमिक पातळीवरील तथ्य संकलनाची आणि सविस्तर मांडणीची पक्की बैठक आहे. त्यांचा या विषयावरील अभ्यास यापूर्वी प्रस्तुत नियतकालिकात तसेच इंग्रजीतील इतर प्रतिष्ठित नियतकालिकांत प्रसिद्ध झाला आहे. विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधक, पत्रकार, अभ्यासक यांना त्यांचे संशोधनपर अभ्यास मोलाचे वाटतात. लेखकाचे या अभ्यासाबद्दल मनापासून अभिनंदन.

माझे हे टिपण त्यांच्या शोध अभ्यासाची नोंद घेताना त्यावरील काही ठळक प्रतिक्रिया नोंदणारे आहे. त्यात माझी काही निरीक्षणे, मला वाटलेल्या काही त्रुटी तसेच या अभ्यासाबद्दलच्या माझ्या काही सूचना आहेत. परंतु यामुळे या अभ्यासाचे मोल उणावत नाहीच, उलट यामुळे हा अभ्यास अधिक स्पष्टपणे आणि पारदर्शी रीतीने वाचकांपर्यंत पोचेल व त्यातील आशय अधिक गांभीर्याने घेतला जाईल असा मला विश्वास वाटतो. माझ्या टिपणावर लेखकाची तसेच इतर अभ्यासकांची मते जाणून घेण्यास मी उत्सुक आहे. या महत्त्वाच्या विषयावर सर्वांगीण विचार, विश्लेषण, चिंतन व्हावे असाच हेतू यामागे आहे.

१) लेख वाचल्यानंतर माझी लगेचची पहिली प्रतिक्रिया लेखकाइतकीच संपादकांनाही लागू आहे. लेखात एकूण २३ आलेख आहेत. ते सर्व स्तंभालेख आहेत. पण नियतकालिकाच्या पानाच्या आकारात

† माजी अध्यक्ष, माजी विश्वस्त, मराठी अर्थशास्त्र परिषद.
आजीव सभासद क्र. ६३, भ्रमणध्वनी : ९८२२००९९५४, ई -मेल : santosh.dastane@gmail.com .

बसवताना व कृष्णधवल छपाई करताना आलेखांमधील बारीक मजकूर - आकडे वाचणे अवघड व अनेक ठिकाणी अशक्य झाले आहे. उदा. आलेख क्र. ११, १८, १९. यात विविध मुद्यांवरील बहुमोल प्राथमिक माहिती मांडली आहे खरी, पण ती निराळी स्पष्टपणे दिसतच नाही. यामुळे वाचनात आणि आकलनात अडथळे येतात. दृश्य स्वरूपाच्या मांडणीसाठी स्तंभालेखाच्या बरोबरीने वर्तुळालेख किंवा त्रिमिती आलेख वापरले असते तर अधिक उपयोगी ठरले असते. शिवाय अनेक मुद्यांवरील सांख्यिकी माहिती - आकडेवारी साध्या तक्त्यामध्ये देणे अधिक सोपे झाले असते. उदा. आलेख १, २, ३, ४, १८ यातील माहिती तक्त्यात मांडली असती तर ती अधिक वाचकस्नेही झाली असती.

२) शोधनिबंधाच्या शीर्षकात ...राजकीय अर्थव्यवस्था.... तसेच ....दोन जिल्ह्यांचा जनगणना अभ्यास.... असे शब्दप्रयोग आहेत. आता राजकीय अर्थव्यवस्था याचा मला उमगलेला अर्थ असा की विकासाच्या प्रयत्नांमध्ये संदर्भ काळात त्या दोन जिल्ह्यांमधील राजकीय परिस्थिती कशी काय होती याचा अभ्यास. जसे, तेथील एखाद्या तालुक्यातील / जिल्ह्यातील जनमत सत्तारूढ पक्षाच्या बाजूने आहे का विरोधी पक्षाच्या बाजूचे आहे हे तपासणे. कारण, विकासासाठी आवश्यक असणारी निधीची / प्रशासनाची / निर्णयाची अनुकूलता त्यावर बहुतांशी अवलंबून असते. पण प्रस्तुत अभ्यासात विदर्भ - मराठवाड्यातील किंवा यवतमाळ - उस्मानाबाद जिल्ह्यातील राजकारणाच्या आकृतीबंधाची काहीच चर्चा अथवा उल्लेखही नाही. तेव्हा हा शब्दप्रयोग कशासाठी ? (त्या पैलूची चर्चा हवी होती असे मला वाटते, पण तो मुद्दा अलाहिदा!)

दोन जिल्ह्यांचा जनगणना अभ्यास या शब्दसमूहातून ध्वनित होते की त्या दोन जिल्ह्यांची एकूण लोकसंख्या - शिरगणती, त्यातील वाढ, बदल इ. गोष्टींचा यात अभ्यास आहे. प्रत्यक्षात मात्र त्या दोन जिल्ह्यातील संदर्भ कालखंडात ज्या १५१९ शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या, त्या एकूण सर्व शेतकरी कुटुंबांचा हा अभ्यास आहे. (नमुना निवड अभ्यास नव्हे.) म्हणजे जनगणनेचा अभ्यास नसून जनगणना तंत्र वापरून केलेला अभ्यास आहे. येथे वापरलेला जनगणना शब्द दिशाभूल करतो असे वाटते. सर्व (किंवा समग्र) आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांचा अभ्यास असा शब्दप्रयोग उचित ठरला असता.

३) अर्थशास्त्रातील अनेक संज्ञा / पारिभाषिक शब्द मराठीमध्ये आणताना पर्यायी शब्दांची अडचण भासते. योग्य, चपखल, अर्थवाही व सुगम मराठी शब्द शोधणे, त्यांचा वापर वाढविणे हे नेटाने करावे लागते. तळुले यांनी अनेक संज्ञा मराठीत वापरल्या आहेत, पण त्यापैकी काही संज्ञा दुर्बोध वाटतात व योग्य अर्थ वाचकांपर्यंत पोचविण्यात कमी पडतात असे जाणवते. उदा. पूर्वांगुलीनिर्देश (पान ४५), निम्नउर्ध्वृत आलेख (पान ४९), संत्रस्त विक्री (पान ५०), पुनरावृत्त परिभ्रमण (पान ५७), कास्तकारी (पान ५७), असमयसूचकता (पान ६१), अनिर्दिष्ट अलागत (पान ६१), वयोगामन (पान ६८), आर्थिक शमन - त्रस्तता शमन (पान ७१) इ. त्यांचे सोपे पर्याय वापरता आले नसते का? शोधनिबंधाची सुरवात प्राक्कथन या उपशीर्षकाने होते. माझ्या मते प्राक्कथन हा शब्द Prediction या अर्थाने वापरतात. येथे प्रस्तावना असे म्हणायचे आहे का?

४. शोधनिबंधात पान ५२ पासून पुढे सर्व शेतकरी कुटुंबांची आर्थिक - सामाजिक पातळीवरील माहिती दिली आहे. तथापि, या माहितीच्या पार्श्वभूमीवर जे यवतमाळ आणि उस्मानाबाद जिल्हे आहेत त्यांची काहीच माहिती दिलेली नाही. उदा. त्या जिल्ह्यांची लोकसंख्या, तेथील सिंचन प्रमाण, तेथील प्राथमिक सहकारी संस्था, बँक शाखांची संख्या, नागरीकरणाचे

प्रमाण, शेतमालाचे बाजार अशा सर्व माहितीचा शेतकऱ्यांच्या आत्महत्यांशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध असू शकतो. आत्महत्या या घटनेच्या सर्वांगीण अभ्यासासाठी हे आयाम आवश्यक आहेत असे मला वाटते.

५) शेतकरी आत्महत्यांची माहिती अनेक संस्थांकडून दिली जाते. लेखकाने काही संस्थांचा उल्लेख केला आहे. उदा. संयुक्त राष्ट्राचे शाश्वत विकास प्राधिकरण, राष्ट्रीय गुन्हे नोंद संस्थान, टाटा समाज विज्ञान संस्था, इंदिरा गांधी विकास संशोधन संस्था इ. प्रत्येक स्रोताच्या रीतीपद्धतीत थोडा फार फरक आहे. आता प्रस्तुत अभ्यासात वापरलेला १५१९ हा आकडा नेमक्या कोणत्या स्रोताकडून घेतला? प्रत्यक्षात हा आकडा जास्त आहे असे पान ५० वर लेखक मोघमपणे म्हणतात. जास्त म्हणजे नेमके किती?

६) ...१८५० ते १९४० च्या दरम्यान ब्रिटिश ग्रामीण भारतातील शेतकरी आत्महत्या मृत्युदर सातत्याने अधिक राहिले ... (पान ४६) ...परंतु त्यांनी (शेतकऱ्यांनी) कधी आत्महत्येचा मार्ग अवलंबला नव्हता...(पान ५०). ही दोन विधाने परस्परविरोधी नाहीत का ?

७) स्वामिनाथन एम. एस. (२००४) पान ५१. हा संदर्भ नेमका कोणता आहे? लेखाच्या शेवटी दिलेल्या संदर्भ सूचीमध्ये आढळत नाही.

८) पान ५५ वरील आलेख ६ पाहावा. (त्यातील सर्व आकडे टक्केवारीचे आहेत असे गृहीत धरू.) जातनिहाय वर्गीकरण देत असताना ते सामान्यपणे अनु. जाती, अनु. जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती असे दिले जाते. पण येथे तसे न देता सुमारे ५६ शीर्षकांखाली या सर्व प्रतिसादकांचे वर्गीकरण दिले आहे. त्यात धर्म, जाती, पोटजाती, जमाती, पंथ इ. सर्व आहे. इतके सगळे देण्याचे प्रयोजन समजत नाही. त्यापैकी प्रत्येक गटाचा शेवटी आत्महत्येशी कसा निराळा संबंध आहे तेही दाखवलेले नाही. शिवाय दिलेले वर्गीकरण शंकास्पद वाटते. उदा. भटक्या विमुक्त जाती जमाती (येथे विमुक्त जाती आणि भटक्या जमाती असे हवे होते) हा गट पहा. त्याची एकत्रित आकडेवारी २.९६ टक्के अशी दिली आहे. पण पुन्हा भटक्या जमातीत समाविष्ट असणारे वंजारी, नाथजोगी, नाथनाक, नाथ, बेलदार, राजपूत भामटा, गोंधळी अशी प्रत्येक गटाची आकडेवारी निरनिराळी कशी काय दिली ? जसे, काही वंजारी जमातीच्या प्रतिसादकांची नावे भटक्या जमाती या शीर्षकाखाली तर काहींची नावे वंजारी या शीर्षकाखाली असणार ! (या मुद्यासाठी एक उदाहरण घेऊ. राष्ट्रीयत्वाची आकडेवारी देताना ती : अमेरिकन - २३, ब्रिटिश - २९, जपानी - १९, भारतीय - १२, महाराष्ट्रीय - ८, गुजराती - ५, बंगाली - ३ अशी देऊन कसे चालेल? सर्व भारतीय एकत्र घेऊन तो २८ असा आकडा द्यावा लागेल. असे केले नाही तर महाराष्ट्रीय-गुजराती-बंगाली हे भारतीय नाहीत का असा विचित्र प्रश्न निर्माण होईल!) तीच गोष्ट अनु. जमाती या शीर्षकाची. त्याखाली काही संख्या दिली आहे. पण त्यात समाविष्ट न करता ठाकर, परधान (प्रधान नव्हे), पारधी, कोळी, कोलम यांचे वेगळे आकडे पण दिले आहेत. ते कशासाठी? त्यामुळे हे वर्गीकरण सदोष वाटते.

९) सर्वेक्षण केलेल्या शेतकऱ्यांची सविस्तर माहिती लेखात देण्यात आली, हे खरे आहे. पण किती कुटुंबांची बागायती शेती होती आणि किती जणांची जिरायती होती, ही मूलभूत माहिती मात्र कोठे दिसत नाही. तसे सरकारी व्याख्येनुसार सीमान्त, लघू व मोठे शेतकरी त्यापैकी किती होते असे पारंपरिक वर्गीकरणही कोठे आढळत नाही. आलेख ७ मध्ये दाखवल्यानुसार सुमारे २२%, म्हणजे एकूण पैकी ३२५ शेतकरी कुटुंबांकडे साडेसात एकरांहून अधिक बागायती शेती असूनही त्यांनी मृत्यूला कवटाळले आहे. ही बाब गंभीर आहे आणि तिचे अधिक स्पष्टीकरण हवे होते. त्याच आलेखात

दाखवल्यानुसार ३४% कुटुंबांकडे, म्हणजे ५१४ कुटुंबांकडे बिनशेतीची जमीन आहे. म्हणजे ते शेती करत नाहीत किंवा करू शकत नाहीत असे म्हणणे भाग आहे. ही समजूत बरोबर असेल तर त्यांचे वर्गीकरण शेतकरी कुटुंब असे कसे काय करण्यात आले?

१०) पान ५८ वर आलेख ९ मध्ये एकूण ४२ निरनिराळे पीकगट शेतकरी कुटुंबांनी कसे स्वीकारले ते टक्केवारीत मांडले आहे. पण ती माहिती कशी वाचायची, त्यातून नेमका बोध काय घ्यायचा आणि शेतकरी आत्महत्यांशी तो कसा काय संबंध दाखवतो ते अस्पष्टच राहते. उदा. आलेखातील माहितीनुसार एकूणपैकी ९५.४९ टक्के शेतकरी बाजरी + हरभरा अशी पिके घेत होते. अशी प्रत्येक स्तंभाची टक्केवारी एकत्र केली तर ती १०० टक्क्यांपेक्षा कितीतरी पटीने जास्त भरते. लेखक पान ५७ वर म्हणतात की ५४.९६% कुटुंबांच्या पीक रचनेत कापूस पिकाचे प्राबल्य आहे. पण हे विधान आलेख ९ मधील माहितीशी जुळत नाही. असे ४२ पीक गट देण्यापेक्षा प्रथम प्राधान्य दिलेले नगदी पिके, तृणधान्य, कडधान्य, तेलबिया, इतर असे सरळ वर्गीकरण का दिले नाही ?

११) पान ६०, आलेख ११ : भांडवली गुंतवणूक कर्जे शून्य असताना त्यासाठी सुमारे ४ को. रू. पातळी दाखवणारा स्तंभ कसा काय दाखवला ? तसेच भांडवली गुंतवणूक कर्जे शून्य असताना आलेख १२ मध्ये त्याची ९% परतफेड व ९१% थकबाकी कशी काय दाखवली?

१२) पान ६३ ते ६६ या दरम्यान पिकाचे प्रत्यक्ष व्ययमूल्य, किमान आधारभूत किंमत व बाजार किमतीनुसार मोबदला याची -2 + FL या सूत्राद्वारे आकडेवारी देऊन शेतकऱ्यांचा कसा तोटा होतो ते दाखवले आहे. येथे उत्पादन खर्च प्रति एकर आणि उत्पन्न प्रति क्विंटल अशा विजातीय आकडेवारीतून तोट्याचे गणित मांडलेले दिसते. उत्पादन खर्च प्रति क्विंटल आणि उत्पन्न प्रति क्विंटल अशी आकडेवारी अधिक सोपी, शास्त्रशुद्ध, अर्थवाही आणि तुलनायोग्य झाली असते असे वाटते. शिवाय स्वामिनाथन आयोगाने -२व FL यांच्या बरोबरीने C2 अशी अंतिम संकल्पनाही मांडली आहे. ( C2 åhUOo -ll comprehensive costs + interest, rent on the land etc.) शेतकऱ्याचे उत्पन्न म्हणजे C2 + ५०% वाढावा असे आयोगाने सुचवले आहे. त्याचा संदर्भ लेखकाने घेऊन तीही आकडेवारी मांडली असती तर त्या शेतीचे अधिक वास्तव चित्र दिसले असते. आत्महत्येमागील खऱ्या कारणापर्यंत पोचण्यास त्यामुळे मदत झाली असती.

१३) पान ७० : (वरील मुद्दा क्र. १२ पुढे चालू) : कापसाचा उत्पादन खर्च प्रति एकर रु., उत्पन्न प्रति क्विंटल रु. .... यातून प्रति एकरी तोटा कसा काय मोजला? असाच तोटा त्या पानावर तूर, ज्वारी, बाजरी, गहू, हरभरा, करडई या पिकांचाही दाखवला आहे. असा तोटा मोजण्याच्या सूत्रात आणि त्यानुसार मांडणीत सुधारणा हवी असे वाटते.

१४) पान ७१ वर म्हटले आहे की . . . ५५.१९% आपद्ग्रस्त शेतकरी कुटुंबांना सावकारी छळाचा त्रास सहन करावा लागला. पण पान ६२ वरील आलेख १७ अनुसार फक्त २८.३८% लोकांनीच सावकारी कर्ज घेतले आहे. जर बाकीच्यांनी सावकारी कर्ज घेतलेच नाही तर सावकारी छळाचा अनुभव कसा काय आला?

१५) वरील मुद्दा १० पाहावा. आलेख ९ प्रमाणे पान ६६ वरील आलेख २० मध्ये देखील तशी समस्या जाणवते असे दिसते. उदा. एकूण प्रतिसादक शेतकऱ्यांपैकी ९५.४६% व्यक्तींनी शेजाऱ्याशी वाद हा आत्महत्येचा कारणीभूत घटक दिला आहे. तसेच कुटुंबातील इतर व्यक्तीचा मृत्यू असे कारण ९३.८१% शेतकऱ्यांनी दिले आहे. ही उत्तरे खरी असणारच. पण याचा अर्थ शेतकऱ्यांनी एकापेक्षा जास्त कारणे उत्तरात दिली आहेत. येथे टक्केवारीची बेरीज केली तर ती १००च्या कितीतरी पटीत दिसेल. यासाठी कारणांना

प्राधान्य क्रमांक देऊन सर्वांत महत्त्वाचे कारण कोणते ते विचारून त्याचा तक्ता करता आला असता. यामुळे आत्महत्येमागील थेट प्रभावी कारण प्राधान्यानुसार शोधता आले असते.

वरील मुद्यांच्या आधारे विचार केल्यास सदरहू शोध निबंधातील मांडणी सुस्पष्ट, नि:संदिग्ध आणि पारदर्शी होण्यास मदत होईल असे वाटते. वरील मुद्दे म्हणजे अंतिम शब्द आहे असा माझा दावा नाही. पण अधिक चर्चेने हा अभ्यास अधिक नेटक्या स्वरूपात वाचकांसमोर येईल आणि त्यातून वाचकांचे आकलन अधिक सोपे होईल असे वाटते. हा विषय अतिशय गंभीर आहे यात वाद नाही. त्यामुळे याचा अभ्यास तितक्याच गांभीर्याने होईल असा विश्वास वाटतो.

◆


## निवेदन : अर्थसंवाद वर्गणी

अर्थसंवाद अंकाचे वर्गणीदार होऊ इच्छिणाऱ्या महाविद्यालय / शैक्षणिक संस्था / व्यावसायिक संस्था/ग्रंथालये यांच्यासाठी **त्रैवार्षिक वर्गणी रु. २०००/- तर पंचवार्षिक वर्गणी रु. ३०००/-** आहे. ही वर्गणी कृपया 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने राष्ट्रीयीकृत बँकेच्या डिमांड ड्राफ्टद्वारे किंवा संपादकांशी संपर्क साधून NEFT (मराठी अर्थशास्त्र परिषद, बँक ऑफ इंडिया, राजारामपुरी, कोल्हापूर. खाते क्र. : 094720110000368, IFSC : BKID0000947) द्वारे पाठवावी. **मनिऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.** सदर वर्गणी कृपया प्रमुख संपादकाच्या पुढील पत्त्यावर कव्हरिंग लेटरसह पाठवावी.

**डॉ. राहुल शं. म्होपरे**

'सर' निवास, री.स.नं. ३३/क/२, प्लॉट नं. १८, लेक व्ह्यू कॉलनी, दीपा गॅस गोडावूनच्या पाठीमागे, उजळाईवाडी, ता. करवीर, जि. कोल्हापूर - ४१६ ००४ भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**


''नियोजन करा नाहीतर नष्ट व्हा.''

***- सर एम. विश्वेश्वरअय्या***

# सावधान..! माल्थस जागा झालाय या लेखावरील प्रतिक्रिया - प्रतिवाद

**भरतकुमार सोलापुरे** †

एप्रिल- जून २०२१ च्या अर्थसंवाद (खंड ४५, अंक १) अंकातील विजय मारुती कुंभार यांनी अभ्यास करून लिहिलेला 'सावधान..! माल्थस जागा झालाय ...' हा लेख वाचला. त्यामध्ये मांडलेल्या मुद्यांवर प्रतिक्रिया द्यावीशी वाटली. माझ्या वाचण्यानुसार ''केवळ लोकसंख्या वेगाने वाढत गेल्यानेच आजची महामारी व नैसर्गिक आपत्ती ओढवली असून याचा इशारा माल्थस यांनी इ. स. १७६६ मध्येच दिला होता, किंबहुना त्या इशाऱ्यानुसारच हे घडते आहे.'' असा एकंदर या लेखाचा सारांश आहे. आणि वाढती लोकसंख्या जर नियंत्रित केली असती तर कदाचित असे संकट उद्भवले नसते असाही दुसरा अर्थ त्यातून ध्वनित होतो.

याचा जर विचार केला तर जगाची लोकसंख्या अतिशय कमी असतानाही अशा अनेक महामाऱ्या येऊन प्रचंड जीवित व वित्तहानी झाल्याचे दिसून येते, मग त्याचे विश्लेषण कसे करता येईल? उदा. हडप्पा संस्कृती कशी नष्ट झाली? डायनासोरसारख्या प्रजाती कशा नष्ट झाल्या? तेही जगाची लोकसंख्या तुरळक असताना हे सर्व कसे घडले याचेही विवेचन करावे लागेल.

याचा अर्थ, आजच्या नैसर्गिक आपत्ती व प्रश्नांना केवळ वाढती लोकसंख्या हा एकच घटक कारणीभूत आहे, असे म्हणता येणार नाही, तर त्याबरोबरच माणसाची वाढलेली आर्थिक हाव (Greed) त्याला जास्त कारणीभूत असल्याचे दिसून येते. माणसाच्या या आर्थिक हावेला माणसाची पारंपरिक अर्थ विचारसरणी (मर्यादित साधनांद्वारे अमर्यादमधील अधिकाधिक गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न) की ज्याला 'नफा व ऐशआरामी भांडवली अर्थविचार' कारणीभूत असल्याचे दिसून येईल. म्हणूनच जगात सर्वांत कमी लोकसंख्या असणाऱ्या अमेरिका व युरोपियन लोकांचा जागतिक उपभोगात सर्वाधिक वाटा आहे आणि त्याचेच अनुकरण इतर सर्व देश करत असल्याने नैसर्गिक साधन-संपत्तीची हानी/प्रदूषण होऊन नैसर्गिक आपत्तींची मालिका सुरू झाली आहे.

थोडक्यात, केवळ वाढती लोकसंख्या नव्हे, तर लोकांच्या वाढत्या गरजा (की हाव?) याला कारणीभूत आहेत, असे माझे मत आहे. या संदर्भात मनोविकास प्रकाशन प्रकाशित गुरुदास नूलकर यांचे अनर्थशास्त्र आणि अच्युत गोडबोले लिखित अनर्थ विकासनीती : सर्वनाशाच्या उंबरठ्यावर? ही पुस्तके वाचण्यासारखी आहेत.

◆

† सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख, लोकनेते गोपिनाथजी मुंडे महाविद्यालय, मंडणगड, जि. रत्नागिरी. आजीव सभासद क्र. ८७३, भ्रमणध्वनी: ९५५२४२६६३५ ई-मेल : bharatsolapure@gmail.com

# मराठी अर्थशास्त्र परिषद

**• मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महिला ग्रंथ पारितोषिक**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने महिला लेखिकेने लिहिलेल्या सर्वोत्कृष्ट अर्थशास्त्रीय संदर्भग्रंथास ₹११०००/-, प्रमाणपत्र व मानचिन्ह देण्यात येते. १ जानेवारी, २०१९ ते ३१ ऑक्टोबर, २०१९ या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या मराठीतील अर्थशास्त्रीय संदर्भग्रंथांच्या महिला लेखिका यांना स्पर्धेत सहभागी होता येईल. नमुन्यातील अर्ज, संबंधित ग्रंथाच्या चार प्रती कार्यवाहांकडे ३० नोव्हेंबर, २०२१ पर्यंत पोहचतील या बेताने पाठवावे.

**• डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने मराठी भाषेत प्रकाशित झालेल्या अर्थशास्त्रीय ग्रंथास ₹ १०००/- चे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक प्रतिवर्षी देण्यात येते. १ जानेवारी, २०१९ ते ३१ ऑक्टोबर, २०२१ या कालावधीतील मराठीतील अर्थशास्त्रीय ग्रंथाच्या लेखकांना स्पर्धेत सहभागी होता येईल. नमुन्यातील अर्ज, संबंधित ग्रंथाच्या चार प्रती कार्यवाहांकडे ३० नोव्हेंबर, २०२१ पर्यंत पाठवाव्यात.

**• डॉ. सौ. अरुणा रारावीकर आर्थिक लेख पुरस्कार**

मराठी अर्थशास्त्र परिषदेतर्फे २०११ पासून हा पुरस्कार सुरू केला आहे. परिषदेच्या आजीव सदस्यांनी आर्थिक विषयांवर सतत वाचन-मनन करून त्यावर जिल्हा व राज्यपातळीवरील मराठी दैनिक वृत्तपत्रासाठी वैचारिक व प्रबोधनात्मक लेख लिहिण्यास उद्युक्त व्हावे हा त्यामागील हेतू आहे. त्यांच्या अशा प्रसिद्ध झालेल्या व निवड समितीने शिफारस केलेल्या लेखांना दोन पुरस्कार दिले जातील. प्रथम पुरस्कार ₹ १०००/- चा व द्वितीय पुरस्कार ₹ ५००/- याप्रमाणे आहे. या पुरस्कारासाठी १ जानेवारी, २०१९ ते ३१ ऑक्टोबर, २०१९ या कालावधीतील लेख विचारात घेतले जातील.

एक सदस्य जास्तीतजास्त आपले तीन लेख (चार प्रती) पाठवू शकतील. त्यासाठी प्रसिद्ध झालेले लेख, वृत्तपत्रांचे नाव व दिनांकासह झेरॉक्स करून ३० नोव्हेंबर, २०२१ पूर्वी कार्यवाह, मराठी अर्थशास्त्र परिषद यांच्याकडे पाठवावेत. दिनांक ७, ८ व ९ जानेवारी ,२०२२ रोजी गो. सी. टोम्पे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चांदूरबाजार, जि. अमरावती येथे संपन्न होत असलेल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४४ व्या राष्ट्रीय अधिवेशनात हे पुरस्कार प्रदान केले जातील.

**• पत्रव्यवहारासाठीचा पत्ता-** कार्यवाह-खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद, डॉ. मारोती तेगमपुरे, 'संगाई', घर क्रमांक २२, भालचंद्र पेट्रोल पंपाच्या मागे, शहीद भगतसिंग नगर, पारनेर रोड, अंबड जि. जालना ४३१२०४ (भ्रमणध्वनी : ९४२३९९३१३७)

**- डॉ. मारोती तेगमपुरे**

कार्यवाह-खजिनदार,

मराठी अर्थशास्त्र परिषद.

# शोध निबंधासाठी टिपण

७, ८ व ९ जानेवारी, २०२२ रोजी गो. सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चांदूरबाजार, जि. अमरावती येथे होत असलेल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या राष्ट्रीय अधिवेशनात शोधनिबंधासाठीचे विषय पुढीलप्रमाणे आहेत. शोधनिबंध ३० नोव्हेंबर, २०२१ पर्यंत मा. अध्यक्ष- मराठी अर्थशास्त्र परिषद यांना पोहचतील या बेताने पाठवावेत.

१. नोबेल पारितोषिकप्राप्त अभिजात बॅनर्जी यांचे योगदान.

२. भारतातील वर्तमान दशकातील आर्थिक स्थित्यंतरे.

३. अण्णा भाऊ साठे यांचे आर्थिक विचार.


**पत्रव्यवहारासाठी पत्ता**

**प्राचार्य डॉ. अनिल बाबुराव सूर्यवंशी**

'गोदाई' शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजी नगर,

बार्शी, जि. सोलापूर- ४१३४११. मो. ८८०५६९१४०६

**महाराष्ट्र शासन**

# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

(स्थापना : १९ नोव्हेंबर, १९६०)

**रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई – ४०० ०२५**

दूरध्वनी : ०२२-२४३२५९२९/३१ फॅक्स : ०२२-२४३२ ५९३१ ई-मेल : secretary.sblc-mh@gov.in

संकेतस्तळ : https://msblc.maharashtra.gov.in


**मंडळाच्या योजना**

१. पुस्तक प्रकाशन योजना-विविध विषयांवरील बृहद्ग्रंथ प्रकाशित करणे
२. महाराष्ट्राचे शिल्पकार चरित्रमाला योजना
३. उत्कृष्ट ग्रंथांची भाषांतरे योजना
४. ललित व ललितेतर वाङ्मयाच्या प्रकाशनार्थ अनुदान योजना
५. नवलेखक पुस्तक प्रकाशनासाठी उत्तेजनार्थ अनुदान योजना
६. नवलेखक कार्यशाळा अनुदान योजना
७. नियतकालिकांना अनुदान योजना
८. स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना, विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार योजना, श्री.पु. भागवत पुरस्कार योजना
९. अन्य मराठी साहित्य संमेलनांना अनुदान योजना.

**मंडळाची निवडक प्रकाशने**

१. मृगपक्षिशास्त्र (मूळ संस्कृतासह) हंसदेव विरचित-संपा. मारुती चित्तमपल्ली. पं. नरसिंशास्त्री भातखंडे
२. खगोलशास्त्राचे विश्व - डॉ. जयंत विष्णू नारळीकर
३. कलेची मूलतत्त्वे (R.G.Collingwood यांच्या The Principles of Art या पुस्तकाचे भाषांतर) – स.गं. मालशे, डॉ. मिलिंद मालशे
४. मराठी चित्रपटसृष्टीचा समग्र इतिहास-रेखा देशपांडे.
५. महाराष्ट्राचा खाद्यसंस्कृतीकोश - संपा. डॉ. अनुपमा उजगरे
६. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास खंड पहिला- के.के. चौधरी
७. श्री. चांगदेव पासष्टी (अर्थ व विवरणासहित) – स्वामी नित्यबोधानंदतीर्थ
८. आधुनिक संत आणि समाज - श्री. रवींद्र गोळे

**मंडळाची निवडक ४४४ पुस्तके ई-बुक स्वरुपात मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहेत.**

**मंडळाच्या पुस्तकांचे जिल्हानिहाय वितरक**

१. मॅजेस्टिक बुक स्टॉल, गिरगाव, मुंबई
२. आयडियल पुस्तक, दादर, मुंबई
३. लोकवाङ्मयगृह, प्रभादेवी, मुंबई.
४. लक्ष्मी बुक डेपो, शिवाजी पेठ, ठाणे.
५. अक्षर साहित्य , चिपळूण, जि. रत्नागिरी.
६. अशोक एजन्सीज्, कणकवली, जि. सिंधुदुर्ग
७. ज्योती स्टोअर्स बुकसेलर, नाशिक.
८. अक्षय लॉ बुक सेलर्स, देवपूर, धुळे.
९. मे. शारदा प्रकाशन आणि बुक डेपो, जळगाव
१०. शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, जि. अहमदनगर
११. मॅजेस्टिक बुक स्टॉल, पुणे.
१२. बलशेटवार बुक सेलर्स, सातारा.
१३. गजानन बुक स्टोअर्स, सोलापूर.
१४. मे. अजब पुस्तकालय, कोल्हापूर.
१५. मेहता बुक सेलर्स, कोल्हापूर.
१६. मे. धारा (साकेत) प्रकाशन, औरंगाबाद
१७. दीपाली बुक एजेन्सी, जालना.
१८. देबडबाड पुस्तक भांडार, नांदेड.
१९. शारदा बुक डेपो, अकोला.
२०. भारतीय पुस्तकालय, लातूर.
२१. मेसर्स प्रकाश बुक डेपो, अकोला.
२२. सरस्वती बुक्स अँड स्टेशनर्स, अमरावती.
२३. स्वराज्य भांडार महिला सेवा मंडळ, वर्धा
२४. मे. साहित्य प्रसार केंद्र, चंद्रपूर
२५. साहित्य वितरण केंद्र, चंद्रपूर
२६. मुद्रा बुक डेपो, पालघर
२७. मावळे बुक डेबो, कर्जत, जि. रायगड
२८. सुशांत बुक डेपो, नंदूरबार
२९. रत्नाकर बुक सेलर्स, मिरज, सांगली
३०. पूजा ग्रंथ वितरण, परभणी
३१. गोपाल बुक सेलर, हिंगोली
३२. अनुराग पुस्तकालय, अंबाजोगाई, बीड.
३३. टिकार बुक एम्पोरिअम, जि. बुलढाणा
३४. बालाजी बुक डेपो, वाशिम.
३५. गणेश पुस्तकालय, यवतमाळ.
३६. व्हीजन बुक शॉप, भंडारा.
३७. सनी स्टोअर्स, गोदिंया.
३८. राहुल ट्रेडिंग कंपनी ॲन्ड बुक डेपो, गडचिरोली

**शासकीय ग्रंथागारांचे पत्ते**
**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची पुस्तके मिळणाऱ्या शासकीय ग्रंथागारांचे पत्ते**

१. संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, नेताजी सुभाष मार्ग, चर्नीरोड, मुंबई ४०० ००४.
दूरध्वनी : (०२२) २३६३२६९३ २३६३०६९५, २३६३११४८, २३६३४०४९

२. व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार, फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी.पी.ओ. नजीक, पुणे ४११ ००१.
दूरध्वनी : (०२०) २६१२५०८०८

३. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, सिव्हिल लाईन्स, नागपूर - ४४० ००१.
दूरध्वनी : (०७१२) २५६२६१५

४. सहायक संचालक, शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार, शहागंज, गांधी चौकाजवळ, औरंगाबाद ४३१००१.
दूरध्वनी : (०२४०) २३३११०९७

५. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६ ००३.
दूरध्वनी : (०२३१) २६५०३९५ २६५०४०२

**मंडळाकडून प्रकाशित ५२४ ग्रंथांवर २५२ अधिकृत वितरकांना ४० टक्के सूट मिळेल. जास्तीत जास्त पुस्तक वितरकांनी अधिकृत वितरणासाठी सहभागी व्हावे, असे आवाहन सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी मंडळाच्या https://msblc.maharashtra.gov.in संकेतस्थळाला भेट द्या.**

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452

# अर्थसंवादसाठी

## हार्दिक शुभेच्छा

- डॉ. डी. डी. चौधरी, अहमदपूर
- डॉ. स्नेहा देशपांडे, नागपूर
- डॉ. मारोती तेगमपुरे, अंबड
- डॉ.जी.के.सानप, संगमनेर
- डॉ.श्रीनिवास खांदेवाले, नागपूर
- डॉ. के. के. पाटील, परभणी
- डॉ. अरुण पिसे, धुळे
- डॉ. विजय भोपाळे, नांदेड
- डॉ. मंगल भाटे/धोरण, अमरावती
- डॉ. दिनकर टकले, जालना
- डॉ. सुहास आव्हाड, संगमनेर
- डॉ. अशोक खाचने, जळगाव
- डॉ. तुकाराम मुंडे, मानवत
- डॉ. अनिल सूर्यवंशी, अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद
- डॉ. राहुल शं. म्हापरे, अर्जुननगर
- डॉ. जनार्दन काकडे, चंद्रपुर
- प्रा. शिवाजी काकडे, गढी
- डॉ. मृणालिनी फडणवीस, मा. कुलगुरू, सोलापूर
- डॉ. राजू पाटील, सोलापूर
- प्राचार्य डॉ. भारत खंदारे, जालना
- डॉ. ए. डी. गोस्वामी, भुसावळ
- डॉ. विष्णू एकनाथ घुमटकर, खामगाव
- डॉ. माधव शिंदे, अहमदनगर
- डॉ. सुरेश ढाके, धुळे
- डॉ. राजू शिंदे, धुळे
- डॉ. दि. व्य. जहागिरदार, अमरावती
- डॉ. रामकृष्ण टाले, नागपूर
- डॉ. विद्या आर. पाटील, धुळे
- डॉ. मोहन सदामते, कुंडल
- डॉ. सुभाष पाटील, पुणे
- डॉ. मनीषकुमार कायरकर, बल्लारपूर
- डॉ. निजवंती आर. टेंभुरणे, मोर्शी
- डॉ. भाऊसाहेब देशमुख, राजूर
- डॉ. अजय देरेकर, बारामती
- डॉ. सुमित्रा विजय पवार, जळगाव
- डॉ. चंद्रकांत रा. जाधव, वारणानगर
- डॉ.एस.एम. भोसले, सातारा
- डॉ. प्रशांत हरमकर, अमरावती
- डॉ. युगंधरा शै. टोपरे (देशपांडे), औरंगाबाद
- डॉ. वैशाली ल. देशमुख (नाईक), औरंगाबाद
- डॉ. संतोष दास्ताने, पुणे
- डॉ. आर. बी. भांडवलकर, यवतमाळ
- डॉ. गणेश मांगडे, दापोली
- प्राचार्य डॉ.जे.एस. पाटील, सातारा
- प्रा. चारुदत्त गोखले, अमरावती
- डॉ. जयवंत इंगळे, विटा
- डॉ.जे.एफ.पाटील, कोल्हापूर

मूल्य : रु. १०/- (सभासदांकरिता विनामूल्य)